संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित,

दिग्रस विभागीय शिक्षण प्रसारक मंडळ, दिग्रस द्वारा संचालित,

बापूरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालय,

दिग्रस जि. यवतमाळ

(नॅक मानांकित - 'A' दर्जा, CGPA 3.16)

आजादी का अमृत महोत्सव

प्रबोधन विशेषांक

75

ज्ञानतुषार

वार्षिकांक २०२३-२४



दिग्रस विभागीय शिक्षण प्रसारक मंडळ, दिग्रस - कार्यकारिणी





श्री. विजयकुमारजी बंग
अध्यक्ष



श्री. श्याम महिन्द्रे (पाटील)
सचिव



डॉ. श्री. अभय पाटील
सचिव





डॉ. श्री. प्रदीप मेहता
उपाध्यक्ष



डॉ. श्री. चंद्रशेखर भोंगाडे
उपाध्यक्ष



श्री. पांडूरंग महिन्द्रे पाटील
उपाध्यक्ष



श्री. रघुराजसिंह चौहान
कोषाध्यक्ष



डॉ. श्री. श्रीकांत महल्ले
सभासद



श्री. कैलास बाजोरिया
सभासद



श्रीमती मीनाताई पाटील
सभासद



श्री. अजय ढोले
सभासद



श्री. शेखर टाके
सभासद



श्री. विवेक बुटले
सभासद



डॉ.श्री. राजेश अग्रवाल
सभासद

येथे कर अमुचे जुळती

आमच्या संस्थेचे दिवंगत आधारस्तंभ



स्व.श्री.बापूसाहेब बुटले



स्व.श्री.नानासाहेब भट



स्व.श्री.बापूसाहेब पाटील



स्व.श्री.मारोतीराव पाटील



स्व.प्राचार्य एस.यू.चौहान



स्व.प्राचार्य एम.एम.महल्ले



स्व.श्री.सुधाकरराव पाटील



स्व.डॉ.एस.एस.भोंगाडे



स्व.श्री.एम.व्ही.ढोले



स्व.श्री.माधवराव पाटील



स्व.श्री.ईश्वरमलजी मेहता



स्व.श्री.प्रकाशराव बुटले



स्व.श्री.ज्ञानेश्वर पाटील



स्व.श्री.दिनेश भट



स्व.श्री.भगवानसा टाके

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित,
दिग्रस विभागीय शिक्षण प्रसारक मंडळ, दिग्रस द्वारा संचालित,

बापूरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालय दिग्रस,

जि. यवतमाळ
नॅक मानांकीत अ दर्जा (CGPA 3.16)

अर्पण पत्रिका

ज्ञानतुषार

वार्षिकांक २०२३-२४

शिक्षण महर्षी, लोकमहर्षी, कृषीरत्न, संविधान सभेचे जेष्ठ सदस्य, सहकारमहर्षी

डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख

- जन्म -
दि. २७.१२.१८९८
पापळ (अमरावती)



- मृत्यु -
दि. १०.०४.१९६५
(दिल्ली)

बहुजनांच्या हाती ज्ञानरुपी उजेडाची फुले देणाऱ्या डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२५ व्या शतकोत्तर रौप्य जयंती महोत्सवी वर्ष २०२३ निमीत्त त्यांच्या कार्य, कर्तुत्वाला हा ज्ञानतुषार वार्षिकांक २०२३-२४ अर्पण....

हार्दिक शुभेच्छा...!



बापूरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालय, दिग्रस या आपल्या महाविद्यालयाच्या 'ज्ञानतुषार २०२३-२०२४' या वार्षिक विशेषांकाची निर्मिती परिश्रमपूर्वक संपादक मंडळाने केलेली आहे. यावर्षीच्या वार्षिकांकाची मुख्य संकल्पना **'आजादी का अमृत महोत्सव प्रबोधन विशेषांक'** पल्लेदार सुंदर शिर्षकांअतर्गत महाविद्यालयातील तिन्ही शाखांच्या विद्यार्थ्यांकडून मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तीनही भाषेमधील दर्जेदार लेख, कविता व अनुभव कथन यांची उत्कृष्ट अशी बौद्धिक मेजवाणी आपणास आस्वादायला मिळणार आहे. त्याचा वाचक-रसिकांनी आस्वाद घ्यावा, हीच अपेक्षा !

या वार्षिकांकाचे प्रकाशक प्राचार्य डॉ. ए.आर. लाडोळे तसेच प्रमुख संपादक प्रा. निलेश गायकवाड, सहसंपादक प्रा.डॉ. अपर्णा पाटील आणि सर्व संपादक मंडळ यांनी प्रामाणिकपणे परिश्रम घेतले. सदर वार्षिकांक सर्वांगसुंदर, दर्जेदार अत्यंत वाचनीय व रसिकप्रिय व्हावा यासाठी 'ज्ञानतुषार' या वार्षिकांकाला माझ्याकडून अगदी मनापासून

हार्दिक शुभेच्छा !

मा.श्री रघुराजसिंह चौहान
व्यवस्थापक मंडळाकडून नियुक्त सदस्य
'ज्ञानतुषार' वार्षिकांक २०२३-२०२४

प्रमुख सल्लागार समिती



डॉ. ए.आर. लाडोळे
प्राचार्य तथा प्रकाशक
'ज्ञानतुषार वार्षिकांक'



श्री रघुराजसिंह सु. चौहान
व्यवस्थापक
मंडळाकडून नियुक्त सदस्य



प्रमुख संपादक
प्रा. निलेश गायकवाड



सहसंपादक
प्रा. डॉ. सौ. अपर्णा पाटील

वरिष्ठ महाविद्यालय भाषानिहाय संपादक मंडळ

मराठी विभाग



डॉ.व्ही.एस.पचगाडे



डॉ.सौ.अपर्णा पाटील

हिन्दी विभाग



प्रा.पी.व्ही.गावंडे



प्रा.पी.व्ही.गडकर

इंग्रजी विभाग



प्रा.कु.पी.डी.भट



प्रा.डॉ.एम.एन.भगत

विद्यार्थी संपादक मंडळ

मराठी विभाग



कु. अक्षदा पवार
बी.ए. भाग–३



दुर्गादास चव्हाण
बी.ए. भाग–३

हिन्दी विभाग



मिसबा शेख शफी
बी.एस्सी. भाग–१



कु. साक्षी खंडारे
बी.ए.भाग–३

इंग्रजी विभाग



कु.रुपाली जयस्वाल
बी.ए. भाग–२



तुषार चौरे
बी.कॉम.भाग–२

हार्दिक अभिनंदन



प्राचार्य डॉ.अरविंद लाडोळे यांची अॅकॅडमीक कॉन्सिलवर निवड

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या अॅकॅडमीक कॉन्सीलवर प्राचार्य या संवर्गातुन निवड करण्यात आली. या यशाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....! पुढील वाटचालीस शुभेच्छा....!



प्रा.डॉ. प्रविण चांडक यांची भौतिकशास्त्र अभ्यास मंडळावर निवड

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या भौतिकशास्त्र शाखेच्या अभ्यास मंडळावर स्विकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या यशाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....! पुढील वाटचालीस शुभेच्छा....!



प्रा.डॉ. मनोज भगत यांची विज्ञान भाषा अभ्यास मंडळावर निवड

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या विज्ञान इंग्रजी भाषा अभ्यास मंडळावर स्विकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या यशाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....! पुढील वाटचालीस शुभेच्छा....!

प्रा.डॉ.दिपक निलावार यांना उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून पुरस्कार प्राप्त



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करियर कट्टा या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीच्या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत आपल्या महाविद्यालय मधील करिअर कट्टा समन्वयक डॉ दीपक दत्तात्रय निलावार यांना उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून अमरावती येथे प्रशस्तीपत्र व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....! पुढील वाटचालीस शुभेच्छा....!



प्रा.डॉ.रुपेश कऱ्हाडे यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर मराठी भाषा व साहित्य विभागातील प्रा.डॉ.रुपेश कऱ्हाडे संपादित 'साहीत्य समिक्षा आणि समाज चिंतन' हे अत्यंत उपयोगी असणारे संदर्भ पुस्तक प्रकाशित झाले. हे पुस्तक डॉ. प्रकाश खरात गौरव समिक्षाग्रंथ यावर आधारित आहे.

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!



प्रा.डॉ. प्रविण चांडक यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातील प्रा.डॉ.प्रविण चांडक संयुक्तरित्या संपादित **'Physics'** हे बी.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयोगी असणारे संपादित पाठ्यपुस्तक प्रकाशित झाले..

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!



प्रा.डॉ. संजय देवस्तळे यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील जीवशास्त्र विभागातील प्रा.डॉ.संजय देवस्थळे संयुक्तरित्या लिखित **'Botany Cell Biology, Genetics & Plant Breeding'** हे बी.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयोगी असणारे संपादित पाठ्यपुस्तक प्रकाशित झाले..

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!



प्रा.कु. प्रेमलता सोनपरोते यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.कु.प्रेमलता सोनपरोते संयुक्तरित्या लिखित **'Chemistry'** हे बी.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयोगी असणारे पाठ्यपुस्तक प्रकाशित झाले..

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!



सौ. कु. संजिवनी पराते यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातील प्रा.डॉ.कु. संजिवनी पराते संयुक्तरित्या लिखित **'Genetics & Ecology'** हे बी.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयोगी असणारे पाठ्यपुस्तक प्रकाशित झाले..

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!



डॉ. संजय मोटे यांचे पुस्तक प्रकाशित

महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.संजय मोटे संयुक्तरित्या लिखित **'An Introduction to Analytical Chemistry'** हे बी.एस्सी. भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयोगी असणारे संदर्भपुस्तक प्रकाशित झाले..

या ग्रंथ प्रकाशनाबद्दल डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग आणि डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन....!

सेवानिवृत्ती.....!

प्रा.कॅप्टन विनोद एल.खळतकर



वरिष्ठ महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख तसेच राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख प्रा.कॅप्टन विनोद एल. खळतकर नियत वयोमर्यादेनुसार दि. ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. ते आपल्या महाविद्यालयामध्ये दि. ०७/०२/१९९० रोजी इंग्रजी विषयाचे अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. दि. ७ फेब्रुवारी १९९० ते ३१ मे २०२४ या कालावधीत ३४ वर्ष ३ महिने २४ दिवसांची प्रदिर्घ सेवा त्यांची महाविद्यालयाला मिळाली. या सेवे अंतर्गत त्यांनी महाविद्यालयामध्ये असलेल्या राष्ट्रीय छात्र सेनेची जबाबदारी दि. १ नोंव्हेंबर १९९२ ते ३१ मे २०२० पर्यंत जवळजवळ कम्पनी कमांडर म्हणून कॅप्टन या पदावर २८ वर्ष ५ महिने जबाबदारी सांभाळली व या कालावधीत राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली व ३०० विद्यार्थ्यांची भारतीय सेनेत व महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली तसेच उत्कृष्ट एन.सी.सी. अधिकारी म्हणून अमरावती विभागीय स्तरावर गौरविण्यात आले. तसेच महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य म्हणून १ जून २०२० ते ९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत जबाबदारी सांभाळली. त्यांच्या प्राचार्यपदाच्या कारकिर्दीत महाविद्यालयाला नॅक चे 'अ' दर्जाचे मानांकन प्राप्त झाले. तसेच करिअर कट्टा या मोहिमेमध्ये महाविद्यालयाला अमरावती विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाले.

नियत वयोमर्यादेनुसार निवृत्त तर व्हावेच लागते. परंतु निवृत्तीनंतरचा काळ आनंददायी, सुखमय आणि आरोग्य संपन्न जावो हिच मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, सर्व कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची मनापासूनची सदिच्छा, शुभकामना !



प्राचार्यांच्या लेखणीतून....

'ज्ञानतुषार' हा महाविद्यालयीन वार्षिकांक शैक्षणिक सत्र 2023 - 24 मध्ये प्रकाशित करताना मला मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयातील विविध विभागांच्या कर्तुत्वाचा, प्रबोधनात्मक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक कार्यांचा थोडक्यात आढावा या वार्षिकांकाच्या निमित्ताने वाचकांसमोर ठेवण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. वार्षिकांकाच्या माध्यमातून आपणा सर्वांशी हितगुज करण्याची मिळालेली ही सुवर्णसंधी आहे. आयुष्यात येणारा प्रत्येक क्षण हा आपले आगळे - वेगळे स्थान घेऊन प्रत्येकाच्या जीवनात पदार्पण करीत असतो आणि आपली छाप नकळतपणे पाडून जातो. अशाच काही विविध छटा साहित्याच्या रूपाने **'ज्ञानतुषार'** वार्षिकांकात पाहायला मिळाल्या. यातील उमलते भावविश्व म्हणजे विद्यार्थ्यांचे अंतरंग आहेत. वार्षिकांकात अंतर्भूत विविध विषयाच्या माध्यमातून लेखकाच्या सृजनशीलतेला वाव मिळावा तसेच वाचकांच्या ज्ञानात भर पडून त्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा त्यासोबतच त्यांच्या अंतर्मनात मौलिक मूल्यांची रुजवण व्हावी हाच उद्देश समोर ठेवून या वार्षिकांकाची निर्मिती संपादक मंडळांनी केलेली आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदा अग्रेसर असणारे डी.व्ही.एस.पी.एम.चे व्यवस्थापक मंडळ, तसेच **'ज्ञानतुषार'** या वार्षिकांकाच्या संपादनासाठी अविरत परिश्रम घेणारे संपादक मंडळ आणि ज्यांच्या लेखणीतून हा वार्षिकांक साकारलेला आहे असे माझे लाडके विद्यार्थी (उभरते साहित्यिक) तसेच संचालक मंडळ, मीना प्रिंटर्स, दिग्रस या सर्वांचे मनस्वी आभार.

सर्वांच्या मेहनतीतून साकारलेला **आजादी का अमृत महोत्सव** हा **'ज्ञानतुषार'** वार्षिकांक 2023-24 **शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख** यांच्या **125 व्या शतकोत्तर रोप्य जयंती महोत्सवी वर्ष 2023** निमित्त त्यांच्या कार्य कर्तुत्वाला समर्पित करीत आहोत. या वार्षिकांकात अंतर्भूत असलेल्या उभारत्या साहित्यिकांच्या लेखणीतून भावी आयुष्यात अनेक विषयांना उजाळा मिळावा हीच सदिच्छा!

धन्यवाद !

डॉ. अरविंद लाडोळे
प्राचार्य, प्रकाशक 'ज्ञानतुषार' वार्षिकांक २०२३–२४
बापूरावजी बुटले कला, नारायणराव भट वाणिज्य व
बापूसाहेब पाटील विज्ञान महाविद्यालय, दिग्रस



संपादकीय दृष्टिक्षेपातून....

दिग्रस परिसरामध्ये गेल्या 59 वर्षापासून हे महाविद्यालय आपल्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख अत्यंत दिमाखदारपणे आणि सातत्याने उंचावत ठेवत असून या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक असे अनेक कार्यक्रम, उपक्रम, प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्यापैकीच एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे महाविद्यालयातर्फे दरवर्षी प्रकाशित होणारा **'ज्ञानतुषार'** हा वार्षिकांक होय.

महाविद्यालयाचा **'ज्ञानतुषार वार्षिकांक 2023-24'** ची निर्मिती करताना त्याची रूपरेखा आणि मुख्य विषय नेमका कोणता असावा यावर जेव्हा चिंतन सुरू झाले तेव्हा विद्यार्थी मनावर ज्ञानाचे तुषार सिंचन करुन त्यांच्या व्यक्तिमत्वाला बहुआयामी व सृजनशील बनवण्याची संधी उपलब्ध करून द्यावी हा विचार पुढे आला. आजच्या तरुण पिढीला राष्ट्रीय आदर्शाची ओळख व्हावी आणि प्रेरणा मिळावी हिच मनीषा बाळगून **'आजादी का अमृत महोत्सव विशेषांक'** असे यावर्षीच्या वार्षिकांकाचे नाव ठेवण्यात आले. या मुख्य विषयाअंतर्गत, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम, देशभक्ती, राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये थोर, महात्मे, समाज सुधारक, राजकीय नेते, क्रांतीकरक इत्यादींचे विचार आणि योगदान, तसेच आजपर्यंत भारताने केलेली प्रगती आणि वाटचाल. हर घर तिरंगा घर घर तिरंगा, मेरी माती मेरा देश, अमृत कलश योजना, पंचत्रण, माती को नमन-विरो को बंदन यासारख्या विविध उपक्रमांची आजच्या काळातील गरज आणि महत्व अशा या मुख्यभागांवर आधारित, दर्जेदार असे लेख, लघुलेख,संकलन, समीक्षण, स्वरचितकविता, निबंध, ठळक घटनाक्रम इत्यादी स्वरूपात माहिती मागविण्यात आली. त्याची व्यवस्थितरित्या रचना व मांडणी करून खऱ्या अर्थाने कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेतील विद्यार्थ्यांच्या सृजनशील चिंतनातून साकार झालेला **'ज्ञानतुषार वार्षिकांक 2023-24'** हा वर्षिकांक मोठ्या उत्साहाने प्रकाशित करीत आहोत. कृपया आपल्यासारख्या चोखंदळ वाचक-रसिकांनी मोठ्या हर्षोल्हासाने यातील ज्ञानतूषारांचा मनापासून आस्वाद घ्यावा हीच सस्नेह अपेक्षा.....

ज्याप्रमाणे 'जमिनीवर तुषार सिंचन झाल्यास मातीतून मोती उगवून येतात अगदी तसच विद्यार्थी व्यक्तिमत्त्वावर देखील ज्ञान तुषाराचे सिंचन झाल्यास त्याच्या व्यक्तिमत्त्वालाही बहर येतो' हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून या वार्षिकांकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रहितासाठी राष्ट्रीय जाणीवेचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 15 ऑगस्ट 2022 रोजी भारतीय स्वातंत्र्याला पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाली आहे. या राष्ट्रीय सणाला उत्सवाचे स्वरूप आले पाहिजे म्हणून भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी भारतीय स्वातंत्र्याचा हा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करावा अशी घोषणा केली. त्यानुसार 15 ऑगस्ट 2022 ते 15 ऑगस्ट 2023 या दरम्यान देशभरात विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये ध्वज्यारोहन, हर घर तिरंगा-घरघर तिरंगा, शीला फलक,मेरी माटी-मेरा देश, माती को नमन-वीरो को वंदन, पंचप्राण प्रतिज्ञा, अमृत कलश, अमृत वाटिका इत्यादी. वरील कार्यक्रमाच्या माध्यमातून दीडशे वर्षाच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी भारतीयांनी केलेला संघर्ष आणि बलिदानाच्या इतिहासाची ओळख करून देणे, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा जागर करणे,स्वातंत्र्यानंतरच्या 75 वर्षातील देशाची कामगिरी आणि उपलब्धीची जाणीव करून देणे, तसेच पुढच्या पंचवीस वर्षाचे व्हीजन तयार करणे, देशवासीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना आणि आपल्या राष्ट्राबद्दल आपुलकी निर्माण करणे असा विविध उद्देश साध्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अशा प्रकारे वरील ह्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पुढच्या 25 वर्षात म्हणजेच 2047 पर्यंत या भारत भूमीला विश्वगुरु बनविण्याच्या राष्ट्रीय कार्यामध्ये आपल्याकडून भर पडावी या शुद्ध हेतूने हा वार्षिकांकरुपी वाचनीय साहित्याचा अमूल्य ठेवा रसिकार्पण करीत आहोत. मुख्य संपादक म्हणून जबाबदारी सांभाळत असताना आमच्या बीएनबी परिवारातील सर्वांनीच प्रेमळ सल्ला, समर्थ पाठबळ, योग्य प्रेरणा आणि सकारात्मक ऊर्जा देण्याचे काम केल्यामुळेच ही जबाबदारी मी समर्थपणे पेलू शकलो असे मला या क्षणी वाटत आहे. त्यांच्या या स्नेहपूर्ण सहकार्याबद्दल व्यवस्थापक मंडळाचे सर्व पदाधिकारी, मा. श्री विजयकुमारजी बंग (अध्यक्ष, डी.व्ही.एस.पी. मंडळ), मा. श्री श्यामभाऊ महिन्द्रे-पाटील व डॉ. अभयजी पाटील (सचिव, डी.व्ही.एस.पी. मंडळ), मा.डॉ. प्रदीपजी मेहता आणि डॉ. चंद्रशेखर भोंगाडे (उपाध्यक्ष, डी.व्ही.एस.पी. मंडळ), मा.श्री रघुराजसिंह चौहान ('ज्ञानतुषार' वार्षिकांकाचे व्यवस्थापन मंडळाकडून नियुक्त सल्लागार सदस्य), तसेच महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ. ए.आर.लाडोळे, या वार्षिकांकाचे माजी प्रमुख संपादक डॉ. रुपेश कन्हाडे, विद्यमान सहसंपादिका प्रा. डॉ. सौ. अपर्णा पाटील तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या संपादक मंडळातील सर्व सन्माननीय प्राध्यापक सदस्य, विद्यार्थी संपादक मंडळ सदस्य, सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी तसेच मीना प्रिंटर्स, दिग्रस या सर्वांचे मी मुख्य संपादक या नात्याने अगदी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो आणि हा अमूल्य ठेवा आपल्या सुपूर्द करतो....

प्रा. निलेश शंकरराव गायकवाड
प्रमुख संपादक 'ज्ञानतुषार २०२३-२४'
सहाय्यक प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी भाषा व साहित्य विभाग

धन्यवाद !



सहसंपादकीय...

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर नेमका कोण कोणता वैचारिक वारसा ठेवला पाहिजे त्याचा विचार करुनच या वर्षीच्या 'ज्ञानतुषार' वार्षिकांचा विषय ठरविलेला आहे. भारतीय स्वातंत्र्याला नुकतीच ७५ वर्ष पुर्ण झाली. १५० वर्षाच्या गुलामगिरीनंतर अगदी फिनिक्स पक्षी राखेतुन झेपावतो तशी या ७५ वर्षात स्वतंत्र्य भारताने प्रगती केलेली आहे. या आधुनिक भारताला आणखींनही नवनव्या प्रगतीच्या उंच क्षितीजाकडे झेपावयाचे आहे. त्यासाठी भारतीय तरुणांचा त्यात महत्वाचा सहभाग असणार आहे. अशा या तरुणांच्या विचारांची बैठक तयार व्हावी, त्यांना नवी दृष्टी प्राप्त व्हावी तसेच भारतीयांनी सोसलेली गुलामगिरी, स्वतंत्र लढा, भारत मातेच्या थोर सुपूत्रांचे बलीदान या सर्वांचे स्मरण होवून महाविद्यालयीन तरुणांमध्ये स्फुरण येण्यासाठीच या वर्षीच्या 'ज्ञानतुषार' वार्षिकांकाचा विषय ठरविण्यात आलेला आहे. अशा या शुध्द हेतूने आणि बहुमूल्य विषयावर आधारित असलेला 'आझादी का अमृत महोत्सव' हा ज्ञानतुषार वार्षिकांक २०२३-२४ आपल्या हाती देतांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

आमच्या सादाला योग्य प्रतिसाद दिल्यामुळे तिनही शाखेच्या विद्यार्थीनी विविध लेख, कविता, संकलन, साहित्य, चारोळ्या, घटनाक्रम, चरित्र, कथाकथन अशा विविध पाकळ्यांनी सजवलेला एक सुगंधीत फुलांचा गुलदस्ताच आम्ही आपणा समोर साकार करु शकलो. त्यामुळे सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि चोखंदळ रसिक वाचकांनी या साहित्याचा सकारत्मतेने आस्वाद घ्यावा हिच अपेक्षा !

धन्यवाद !

प्रा. डॉ. अपर्णा अ. पाटील
सह-संपादक, 'ज्ञानतुषार २०२३-२४'



वरिष्ठ महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील
प्रयोगशाळा सहाय्यक

स्व. शरीफुर रहेमान अ.जलील पटेल

यांना विनम्र श्रद्धांजली...!

मृत्यु दि. ०५/१०/२०२३

सेवानिवृत्ती.....!



श्री पुंडलिक बळीराम इंगळे

महाविद्यालयातील कार्यालय अधिक्षक श्री पी.बी. इंगळे हे दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांची नियुक्ती आपल्या महाविद्यालयामध्ये दि. २४ डिसेंबर १९९२ रोजी झाली होती. श्री पी.बी.इंगळे यांची आपल्या महाविद्यालयामध्ये सुमारे ३० वर्षापेक्षा जास्त सेवा संपन्न झालेली आहे.

नियत वयोमर्यादेनुसार निवृत्त तर व्हावेच लागते. परंतु निवृत्तीनंतरचा काळ आनंददायी, सुखमय आणि आरोग्य संपन्न जाण्यासाठी व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, सर्व कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून मनापासून शुभेच्छा व शुभकामना !

पदोन्नत्ती.....!



श्री उत्तम विष्णू सोनटक्के

हे आपल्या महाविद्यालयामध्ये दि. ०१.०७.२००३ रोजी सेवक या पदावर नियुक्त झाले होते. आता दि. ०१.०९.२०२३ रोजी त्यांची कनिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नती झाली. त्याबद्दल व्यवस्थापन मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, सर्व कनिष्ठ व वरिष्ठ प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा...!

Digras Vibhagiya Shikshan Prasarak Mandal's

BAPURAOJI BUTLE ARTS, NARAYANRAO BHAT COMMERCE & BAPUSAHEB PATIL SCIENCE COLLEGE, DIGRAS DIST. YAVATMAL



REACCREDITED WITH GRADE A NAAC (CGPA 3.16)

ADMISSIONS OPEN 2024-2025

B.A.	**B.Com.**	**B.Sc.**
M.A. (Marathi & (Home Economics)	**M.Com.** (Marathi Medium)	**M.Sc.** (Botany, Chemistry & Physics)
Ph.D Botany, Chemistry Marathi, English Home Economics Physical Education	**11th & 12th** (Arts, Commerce Science & Vocational)	**YCMOU** (Study Center)

महाविद्यालयाची वैशिष्ट्ये –

- उच्चविद्याविभूषित अनुभवी प्राध्यापक वृंद
- स्मार्ट क्लास रुम
- संगणकीकृत सुसज्ज ग्रंथालय
- आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळा
- विविध विषयांचे संशोधन केंद्र
- सी.सी.टी.व्ही कॅमेरा नियंत्रित परिसर
- शासनाच्या सर्वप्रकारच्या स्कॉलरशीप उपलब्ध
- विद्यार्थी सुविधा केंद्र
- राष्ट्रीय सेवा योजना
- वनस्पतीशास्त्र उद्यान
- उपहार गृह सुविधा
- राष्ट्रीय छात्र सेना
- महिला सामान्य कक्ष
- बुक बँक सुविधा
- करियर कट्टा द्वारा रोजगार मार्गदर्शन व प्लेसमेंट संधी
- विविध खेळासाठी साहित्य, सुविधा व प्रशस्त मैदान
- सुसज्ज संगणक प्रयोगशाळा

Dr. A.R. Ladole
Principal

विशेष सुचना :-

- सर्व प्रथम वर्षचे प्रवेश नविन शैक्षणिक धोरणानुसार (NEP-2020) होतील.
- **M.Sc.** (Chemistry & Physics) **&** **M.A.** (Home Economics) मध्ये किमान १५ प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित अभ्यासक्रम सुरु करण्यात येईल.
- **B.A. English Literature** मध्ये किमान २० प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यास विषय सुरु करण्यात येईल.

Contact For Admission :-

Prof. V.D. Jadhao	Shri H.R. Deshpande	Shri P.M. Dive	Dr. M.N. Bhagat
Admission Coordinator (Sr. College)	Supervisor (Jr. College)	Vocational In-charge	YCMOU Coordinator
9421770128	9405947625	9421771159	7972877639

HSC Results 2024 Arts - 81.88% Commerce - 95.60% Science - 98.32% HSCVc - 68.96%

अंतरंग

* मराठी विभाग *

ज्ञानतुषार
२०२३-२०२४

अ.क्र.	लेखांचे / कवितांचे शिर्षक	विद्यार्थ्यांचे नांव	वर्ग	पृष्ठ क्र.
१	स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव	कु. प्रिती उत्तम राठोड	बी.ए. भाग १	१
२	माझी मातृभुमी माझा प्राण	कु. कोमल बबन डाखोरे	बी.ए. भाग १	३
३	राष्ट्रीय एकात्मता	कु. पायल भारत खंडारे	बी.ए. भाग १	४
४	क्रांतीकारक भगतसिंग	मो. अली सलीम मलनस	बी.एस्सी. भाग १	४
५	माझी माती माझा देश	कु. पुजा विजय तुपसुंदरे	बी.ए. भाग १	६
६	क्रांतीकारकांचे बलीदान	कु. गायत्री विनोद चव्हाण	बी.कॉम. भाग १	६
७	राष्ट्रीय एकात्मता	कु. लक्ष्मी अनील जाधव	बी.ए. भाग १	८
८	कवीता	कु. पुजा सु. आडे	बी.ए. भाग १	८
९	आपला राष्ट्रध्वज	कु. रुपाली राजेंद्र मेहेत्रे	बी.कॉम. भाग ३	९
१०	देशभक्तीचे महत्व	कु. पायल पुरुषोत्तम भुजाडे	बी.ए. भाग १	१०
११	राष्ट्र गीताचा मराठी अर्थ	पृथ्वीराज दादाराव कांबळे	बी.ए. भाग २	११
१२	झेंडा उंचा रहे हमारा	कु. अर्चना किशोर राठोड	बी.ए. भाग १	११
१३	नेताजी सुभाषचंद्र बोस	कु. रुपाली राजेंद्र मेहेत्रे	बी.कॉम. भाग ३	१२
१४	राणी लक्ष्मीबाई	विकास किशोर परांडे	बी.एसस्सी. भाग ३	१३
१५	भारत माझा देश आहे	मुस्कान परवीन साबीर खान	बी.ए. भाग १	१४
१६	भारत भूमी	कु. प्राची बुट्टीकर	बी.कॉम. भाग २	१४
१७	विजयालक्ष्मी पंडीत यांचे योगदान	कु. साक्षी विठ्ठल काळे	बी.कॉम. भाग ३	१५
१८	माती को नमन वीरों को वंदन	गुलशन सिताराम बिडवाळ	बी.ए. भाग १	१६
१९	मेरी माती मेरा देश	प्रणित रमेशराव गावंडे	बी.एसस्सी. भाग ३	१६
२०	भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी	कु. मनिषा अरुण डफडे	बी.कॉम. भाग ३	१७
२१	तीरंगा हमारी शान	कु. दामिनी गजानन गाडगे	बी.कॉम. भाग २	१९
२२	मेरा भारत महान	कु. चंचल संजय देवकते	बी.कॉम. भाग ३	२०
२३	स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधीचे योगदान	कु. अक्षदा सुभाष पवार	बी.ए. भाग ३	२१
२४	लाला लजपतराय यांची भुमीका	कु. काजल सुधाकर कांबळे	बी.कॉम. भाग ३	२२
२५	ईस्ट इंडीया कंपनी ते स्वातंत्र्य : घटनाक्रम	दुर्गादास रोहीदास चव्हाण	बी.ए. भाग ३	२३
२६	मेरी झांसी नहीं दूंगी	कु. ऋतुजा राधेशाम सोळंके	बी.कॉम. भाग ३	२६
२७	मी का लढलो ? - भगतसिंग	कु. अस्मिता पांडूरंग चव्हाण	बी.ए. भाग ३	२७
२८	तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आजादी दुंगा	कु. श्वेता संतोष राठोड	बी.ए. भाग ३	२८
२९	भारतीय राष्ट्रीयवादाचा उदय	कु. सेजल गोपाल राठोड	बी.ए. भाग ३	३०
३०	आद्यक्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके	कु. पल्लवी ज्ञानेश्वर परांडे	बी.ए. भाग ३	३१
३१	आजाद हिंद सेना	कु. रुपाली जयस्वाल	बी.ए. भाग २	३३
३२	भारताची राष्ट्रीय प्रतिज्ञा	कु. श्रृती सुनिल बेहरे	बी.ए. भाग २	३४
३३	उचललेस तु मीठ मुठभर साम्राज्याचा खचला पाया	कु. पायल उल्हास राठोड	बी.ए. भाग ३	३६
३४	नामदार गोपाळ कृष्ण गोखले	कु. तृप्ती गणेश काळे	बी.ए. भाग ३	३७
३५	राष्ट्रवाद	कु. वर्षा सुदाम पवार	बी.ए. भाग ३	३८
३६	राष्ट्रीय गीत : वंदे मातरम्	यश हिवराळे	बी.ए. भाग २	३९

* हिन्दी विभाग *

१	मेरी माटी मेरा देश	कु. प्राची बुट्टीकर	बी.कॉम. भाग २	४०
२	हमारी मिट्टी, हमारा देश	मुनवर फातेमा अ. मन्नान	बी.एस्सी. भाग १	४१
३	माटी को नमन, वीरों को वंदन	मीसबा शेख शफी	बी.एस्सी. भाग १	४१
४	भारतीय स्वातंत्रता संग्राम : महत्वपूर्ण घटनाए	कु. श्रृती सुनिल बेहरे	बी.ए. भाग २	४२
५	मेरी माटी मेरा देश	प्रितीश तानाजी जाधव	बी.एस्सी. भाग १	४४
६	आझादी का अमृत महोत्सव	कु. पुजा सुखदेव आडे	बी.ए. भाग १	४४
७	अमोढा की वीरांगणी : राणी तलाश कुंवरी	कु. प्रिती उत्तम राठोड	बी.ए. भाग १	४५
८	आझादी का अमृत महोत्सव के अभियान के महत्ता	कु. अर्चना किशोर राठोड	बी.ए. भाग १	४५
९	मेरी माटी मेरा देश	कु. पायल पुरुषोत्तम भुजाडे	बी.ए. भाग १	४६
१०	देशभक्ती	कु. श्रावणी राजेंद्र पुरी	बी.ए. भाग १	४७
११	हर घर तिरंगा, घर घर तिरंगा	कु. सेजल गोपाल राठोड	बी.ए. भाग ३	४८
१२	हमारा भारत देश	सानिया ईब्राहीम खान	बी.ए. भाग १	४८
१३	मेरी माटी मेरा देश अभियान एकता का प्रतिक	कु. योगीता राठोड	बी.ए. भाग १	४९
१४	स्वतंत्रता सेनानी गांधीजी की शिक्षा	कु. प्रियंका भोला जाधव	बी.ए. भाग १	५०
१५	मेरे देश की अमृत माटी	कु. धनश्री नंदकिशोर ढाले	बी.एस्सी. भाग २	५१
१६	मेरी माटी मेरा देश :	कु. साक्षी रमेश खंडारे	बी.ए. भाग ३	५१
१७	भगतसिंग	कु. नेहा अशोक काळे	बी.एस्सी. भाग ३	५२
१८	चंद्रशेखर आझाद	बाहार ईब्राहीम खान	बी.ए. भाग २	५२
१९	यह देश है मेरा	कु. अक्षदा सुभाष पवार	बी.ए. भाग ३	५४

English Section

1	Meri Mati Mera Desh Campaign	Ku. Rupali Mehetre	B.Com. III	55
2	Tiranga Meri Jaan	Ku. Nita Balaji Sasane	B.Com. III	56
3	Shaheed Bhagat Singh	Ku. Pooja sukhdev Ade	B.A. I	56
4	Har Ghar Tiranga	Ku. Komal Shivaji Salunke	B.Com. III	57
5	Mahatma Gandhi	Ku. Diksha Prakash Rathod	B.A. I	57
6	I Love My India	Ku. Payal P. Bhujade	B.A. I	58
7	Azadi ka Amrit Mahotsav	Ku. Manisha Sunil Rathod	B.Com. III	58
8	Jhansi ki Rani	Saniya Ibrahim Khan	B.A. I	58
9	Bhagat Singh As a Freedom Fighter	Ku. Sakshi Ravindre Choure	B.Com. III	59
10	India : My Pride	Saniya Sadaf Fakir M. Khan	B.Com. III	59
11	Veeron ko Naman	Ku. Rupali Prakash Jaiswal	B.A.II	60
12	Meri Mati Mera Desh : I Love My India	Rushikesh Gajanan Chirde	B.Sc. III	61
13	History of Indian National Flag	Ku. Damini Gajanan Ghadge	B.Com. II	61
14	TriColour	Ku. Sakshi Ramesh Khandare	B.A. III	62
15	Shaheed Bhagat Singh	Ku. Tanisha Ajay Jadhao	B.A. I	62
16	Netaji Subhash Chandra Bose	Ku. Tushar Dipak Choure	B.Com. II	63
17	Har Ghar Tiranga	Ku. Poonam Kishor Rathod	B.A. II	63
18	Azadi Ka Amrut Mahotsav	Ku. Ujwala Sudhakar Sarkate	B.Com. III	64
19	Har Ghar Tiranga	Ku. Akshada Sudhakar Pawar	B.A. III	64
20	Freedom Fighter Bhagat Singh	Pranit Gawande	B.Sc. III	64
21	Freedom Fighter Chandrashekhar Azad	Yash Hiwrale	B.A. II	65

महाविद्यालयातील विविध उपक्रम आणि महाविद्यालयाचे यश ..... पृष्ठ क्र. ६६ ते ७४

या अंकात प्रकाशित झालेल्या साहित्यातील मतांशी संपादक, सहसंपादक व प्रकाशक (प्राचार्य) सहमत असतीलच असे नाही.

वरिष्ठ महाविद्यालय
मराठी विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



कु. प्रिती उत्तम राठोड
बी.ए. भाग १

स्वातंत्र्य ही आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची अनमोल देणगी आहे. चला हा आझादी का अमृत महोत्सव एकत्र साजरा करुया. स्वातंत्र्यचा अमृत महोत्सव म्हणजे देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पुर्ण करण्याचा उत्सव होय. हे तुम्हाला माहीतच आहे.

१५ ऑगस्ट १९४७ हा ऐतिहासिक दिवस होता. जेव्हा आपल्या देशाला ब्रिटीशांच्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्यासाठी अनेक शुर स्वातंत्र्यसैनिकांनी नेत्यांनी बलिदान दिले होते. त्यामुळे या वर्षी भारत आपला स्वातंत्र्याचा ७५ वा वर्धापन दिन साजरा करीत आहे. त्या सोबतच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणूनही साजरा केला जात आहे. १२ मार्च २०२१ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी दांडी यात्रेला ९१ वर्षे पुर्ण झाल्यामुळे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव घोषणा केली होती. १५ ऑगस्ट २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहे. त्यामुळे या स्वातंत्र्य दिनाला उत्सवाचे स्वरुप आले पाहिजे अशी आशा त्यांनी व्यक्त केली होती. हा महोत्सव १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत सुरु राहणार आहे. स्वातंत्र्याचा हा अमृत महोत्सव साजरा करण्याचे उदिष्ट्ये २०४७ मध्ये भारतासाठी एक व्हिजन तयार करणे हे आहे.

याशिवाय हा महोत्सव तरुण पिढीला ७५ वर्षातील देशाच्या कामगिरीची, कृतीची, संकल्पाची जाणीव करुन द्यावी लागते. जेणेकरुन त्यांना पुढे जाण्याची आणि स्वातंत्र्य भारताची स्वप्ने साकार करण्यासाठी प्रेरणा मिळेल. आझादी का अमृत महोत्सव ही आपल्या स्वातंत्र्य सैनिकांनी आणि स्वातंत्र्य चळवळीला दिलेली श्रध्दांजली आहे. चला या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदाने साजरा करुया या निमीत्याने मातृभुमीच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या देशाच्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना आणि नेत्यांना नमन करुया.

''भारत देशाची वाढवा शान आणि मान
कारण आपला भारत देश आहे महान''

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य झाला. आज आपला भारत देश १५ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याच अमृत महोत्सव आनंदाने साजरा करीत आहे. ही गोष्ट प्रत्येक भारतीयांसाठी खुप गौरवांची व अभिमानाची आहे. आपला भारत देश सुमारे १५० वर्षे पारतंत्र्यात होता. त्यातून मुक्ततेसाठी त्याने केलेला संघर्ष खुप मोठा आहे व कठीण होता. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महान स्वातंत्र्य सैनिकांनी आपले अमुल्य योगदान दिले. आज या अमृत महोत्सवी वर्षात आपल्या देशाने खुप काही यश मिळवले आहे.

''उत्सव तीन रंगाचा....
आभाळी आज सजला,
नतमत्सक मी त्या सर्वांसाठी....
ज्यांनी भारत देश घडविला !!''

आपल्या देशाने सध्या विज्ञान–तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण आरोग्य, संशोधन, क्रिडा, संरक्षण अशा असंख्य क्षेत्रात लक्षणीय यश मिळवले आहे. दिवसेंदिवस देश प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. आज आपल्या देशाकडे जगाला कवेत घेण्याची क्षमता आहे. आज आपण सर्वांनी नवनिर्माणाच्या अनेक नव्या दिशा शोधल्या आहेत.

आज आपण खुप भाग्यवान आहोत की, आपण लोकशाही भारतात आनंदाने व एकोप्याने राहत आहेत. अनेक जाती धर्माचे, भाषांचे लोक भारतात एकोप्याने व गुण्या गोविंदाने एकत्र राहत आहेत. अमृत महोत्सवी वर्षे हा आपल्या देशासाठी खुप मोठा टप्पा आहे.

या निमित्य भारत सरकारनेही अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आपल्या देशाच्या गौरवासाठी व तिरंगा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी, जन–जागृतीसाठी या वर्षी 'हर घर तिरंगा' हे अभियान १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबविले गेले आहे.

''स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, चला करु साजरा
देऊ हर घर तिरंगा, घर घर तिरंगाचा नारा''

स्वातंत्र्यानंतर आपला देश सातत्याने स्वावलंबनाच्या मार्गावर पुढे जात आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्य सुरु झालेला 'आजादी का अमृत महोत्सव' हे स्वावलंबनाच्या दिशेने उचलेले एक महत्वाचे पाऊल आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी भारतातील हजारो शुरवीरांना अथक संघर्ष करावा लागला होता.

''गुंज रहा है दुनिया में भारत का नगाडा,
चमक रहा आसमान में देश का सितारा,
आजादी के दिन आओ मिलकर करें दुआ
बुलंदी पर लहराता रहे तिरंगा हमारा !''

देशातील हजारो शुरवीरांनी देशासाठी प्राणांची आहुती दिली. या अन्यायाच्या व अत्याचाराच्या विरोधात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी पंडित जवाहरलाल नेहरू, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, वीर सावरकर अशा अनेक शुरवीरांनी आपले प्राण पणाला लावले.

मंगल पांडे, सुभाषचंद्र बोस, राजगुरु, सुखदेव, लाला लजपतराय, झाशी ची राणी लक्ष्मीबाई व अनेक महिला क्रांतीकारक अशा हजारो शुर वीरांनी, क्रांतीकारंकांनी देशासाठी खुप मोठे योगदान दिले आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वातंत्र्य झाला.

''दे सलामी.... या तिरंग्याला,
ज्यामुळे तुझी शान आहे.
तिरंगा नेहमी उंच राहु दे....
जोपर्यंत तुझ्यात प्राण आहे...''

आपण सर्वजण खुप नशीबवान आहोत की स्वातंत्र्य अशा भारत देशामध्ये आपला जन्म झाला आहे. त्या शुर वीरांच्या बलिदानामुळेच आपण आज शांत आणि सुंदर आयुष्य जगु शकत आहोत. आजचा हा सुवर्णकाळ आपण इथे आनंदाने उत्साहाने साजरा करत आहोत. कारण आपल्या देशाचा वीर जवान तिकडे सीमेवरती स्वतःचा जीव धोक्यात घालून शत्रुशी सामना करीत आहे. त्या सैनिकांना माझा सलाम.

दिवसेंदिवस देश प्रगतीपथावर जात आहे. परंतू समाजात गुन्हेगारी, भ्रष्टाचार, गरिबी आणि अस्वच्छता यांचे प्रमाण वाढत आहे. भारताचे एक नागरिक म्हणून देशाच्या विकासासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे.

वाईट लोकांपासून आणि वाईट गोष्टींपासुन आपल्या देशाचे संरक्षण केले पाहिजे. एकजुटीने काम करुन भारत देश जगातील सर्वोत्कृष्ट देश बनवने हे आपले कर्तव्य आहे.

''आठवण स्मरावी त्यांची,
बलिदान ते केले
क्रांतीसाठी झटले,
अन क्रांतीवीर जे झाले''

''किती आक्रोश तो जाहिला
किती रक्त्यांच्या नद्या पाहिल्या
सडा पडला मृतदेहांचा तेव्हा
स्वातंत्र्यदिन उदयास आला''

जय हिंद,
जय महाराष्ट्र,
जय भारत

माझी मातृभूमी माझा प्राण



कु. कोमल बबन डाखोरे
बी.ए. भाग १

आपल्या मातृभुमीसाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या वीरांप्रती असलेली अत्यंत आदराची व अभिमानाची भावना व्यक्त करण्यासाठी भारत सरकार द्वारा 'मेरी माटी मेरा देश' अर्थात 'माझी माती माझा देश' हे अभियान सुरु करण्यात आले आहे.

हे अभियान देशव्यापी आणि लोकाभिमुख आहे. या अभियानामध्ये पंच प्रण, माती को नमन वीरों को वंदन केले जाणार आहेत. दि. ९ ते १४ ऑगस्ट या कालावधीत ग्रामस्तरावर विविध कार्यक्रम राबविले जाणार आहेत तसेच महापालिका स्तरावर दि. १६ ते २० ऑगस्ट या कालावधीत वीरों को नमन, मिट्टी को नमन, मातीचे दिवे व माती हातात घेवून पंचप्राण प्रतीज्ञा करायची आहे.

तसेच ७५ देशी वृक्षांची लागवड करीत अमृत वाटीका निर्माण करायची आहे. तसेच राष्ट्रध्वजारोहण व राष्ट्रगाण करायचे आहे. 'माझी माती माझा देश' या उपक्रमामुळे भावी पिढीमध्ये देशभक्तीची ज्योत प्रज्वलित होण्यास मदत होईल. या माध्यमातून देशभक्तीचा ध्येयवाद रुजविला जाईल.

आपला भारत देश हा जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेला देश आहे. आज आपल्या देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. पण आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी, समाजसुधारकांनी तसेच अनेक ज्ञात–अज्ञात देशवासीयांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आज त्या सर्व शुर वीरांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्य आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली आहेत. त्यानिमीत्त स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमीत्त केंद्र सरकारच्या सुचनेनुसार 'मेरी माटी मेरा देश' अर्थात माझी माती माझा देश या अभियानाची सुरुवात होत आहे. हे अभियान दि. ९ ऑगस्ट २०२३ ते दि. ३० ऑगस्ट २०२३ अखेर देशात राबवले जाणार आहे.

आपल्या देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी



घोषीत केलेल्या मेरी माटी मेरा देश या अभियान माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या सर्वस्व गमावलेल्या बलिदान दिलेल्या त्या सर्व देशवीरांव्रती नतमस्तक होण्याची, अभिवादन करण्याची संधी प्रत्येकाला मिळणार आहे.

या अभियानांतर्गत संपूर्ण देशात एकाच कालावधीत उपक्रम राबवले जाणार आहेत, यामध्ये शिला फलक, वसुधा नमन, स्वातंत्र्य सैनिक वीरांना वंदन, पंचप्रण, ध्वजारोहण व राष्ट्रगान या पाच उपक्रमातुन क्रांतीकारक व आपल्या मातीविषयी जनजागृती केली जाणार आहे.

माझी माती, माझा देश अभियान सर्व भारतीयांना प्रेरक ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व नागरिकांना या अभियानात सहभागी करुन घेतल्याने प्रत्येकाला हे अभियान आपले वाटणार आहे.

राष्ट्रीय एकात्मता



कु. पायल भारत खंडारे
बी.ए. भाग १

राष्ट्रीय एकात्मता ही शक्ती आहे. ज्यावर एक देश समाज, समुदाय वाढतो आणि समृध्द होतो. अनेक राष्ट्र ऐक्याच्या बळावर बांधले जातात. ऐक्यात एक महान शक्ती ऐक्य ही आहे. त्या राष्ट्राच्या सुक्ष्म आणि व्यापक भावनेचे नावे आहे. जी विशिष्ट प्रदेश आणि तेथील रहिवाश्यांच्या मनामध्ये विविधतेत एकता टिकवून ठेवण्यास मदत करते. या दोघांना प्रत्यक्षात राष्ट्रीय एकता म्हणतात.

अनेक धर्म जाती आणि भाषेचे लोक भारतात राहतात. विविधेतील एकता हे भारताचे मुख्य वैशिष्टय आहे. या देशात सर्व धर्म, जाती आणि भाषेचे लोक एकत्र राहतात.

देशातील ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी देशातील नागरिक आपल्या आवडीचा कोणताही धर्म स्विकारु शकेल असा हक्क भारतीय राज्यघटनेने प्रदान केला आहे. प्रत्येकजण आपल्या विश्वासाने धर्माचे अनुसरण करण्यास स्वातंत्र्य आहे.

हे राष्ट्रीय ऐक्य टिकवण्यासाठी या देशात राहणाऱ्या लोकांमध्ये समजुतदारपणा, सहिष्णू आणि उदर हृदय आवश्यक आहे. देश कायम राहीला पाहिजे हे प्रत्येक वर्गाने कधिही विसरु नये. राष्ट्रीय ऐक्यासाठी एकतेची भावना ही पहिली आणि आवश्यक अट आहे.

बऱ्याच भाषा आणि पोटभाषा भारतात बोलल्या आणि लिहील्या जातात.अन्न–वस्त्र–निवारा यामध्येही विविधता आहे. जवळजवळ सर्व धर्माचे लोक देशाला आपले घर मानतात आणि त्यांच्या धर्मांचे काटेकोरपणे पालन करतात. त्यांचे सण साजरा करण्याचा आणि त्यांना बंधूत्वाने राहण्याचा हक्क आहे.

आज भारतात राष्ट्रीय एकतेचा आवाज बनण्यास सुरुवात झाली आहे. रक्षण करण्यासाठी राष्ट्रीय भावनेची तीव्र गरज आहे. म्हणून आपण जाती, धर्म किंवा प्रादेशिकता यासारख्या क्षुल्लक विचारसणीपासून दूर राहून विघटनकारी घटकांना दडपले पाहिजे.

क्रांतीकारक भगतसिंग



मो.अली सलीम मलनस
बी.एस्सी. भाग १ (बायो.)

भगतसिंग हे एक महान भारतीय क्रांतीकारी होते. ब्रिटीश साम्राज्याविरुध्दच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यामुळे वयाच्या तेविसाव्या वर्षी इंग्रजांनी त्यांना फ ाशीची शिक्षा दिली. भगतसिंग यांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ ला पंजाबच्या ल्यालपुर जिल्ह्यातील बंगा या छोटाश्या गावी झाली. त्यांच्या आईचे नाव विद्यावती तर वडिलांचे नांव किसनसिंग होते. भगतसिंग यांचे वडील आणि काका सरदार अजित सिंग हे दोघे त्याकाळचे लोकप्रिय स्वातंत्र्य सेनानी होते. दोघी गांधीजींच्या विचारांचे समर्थक होते. आपले वडील आणि काकांच्या कार्याने भगतसिंग खुप प्रभावित झाले. लहानपणापासून त्यांच्या देशाविषयी निष्ठा आणि भारताला इंग्रजांच्या तावडीतुन मुक्त करणे ही इच्छा निर्माण झाली. दि. १३ एप्रिल १९१९ ला जेव्हा अमृतसर मध्ये जालीयवाला बाग हत्याकांड प्रकरण घडले. तेव्हा भगतसिंग हे बारा वर्षाचे होते. या घटनेचा खोल प्रभाव त्यांच्या मनावर पडला. भगतसिंग यांच्या नसानसात देश प्रेम पळू लागले. १३ वर्षाच्या वयात शाळा सोडून भगतसिंग यांनी लाहोरच्या नॅशनल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्या काळात त्यांची ओळख अनेक राजकीस नेत्यांशी झाली. याच कॉलेजमध्ये त्यांनी युरोपीयन क्रांतीकारी आंदोलनाचा अभ्यास केला. या अभ्यासातुन त्यांना खुप प्रेरणा मिळाली. १९२९ साली जेव्हा गांधीजींनी असहकार आंदोलन केले. तेव्हा भगतसिंग त्या आंदोलनात सामील झाले. परंतू चोरीचोरा येथील घटनेने व्यथित होवून गांधीजींनी आपले आंदोलन थांबवले. हे सर्व पाहुन भगतसिंग निराश झाले. त्यांनी विचार केला की अहिंसेच्या मार्गाने स्वतंत्र मिळवणे कठीण आहे. म्हणून त्यांनी सशस्त्र क्रांतीने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा निश्चय केला.

सायमन कमिशनच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनात लाला लजपत राय यांच्या मृत्यु झाला. त्यांच्या मृत्युचा सुड घेण्यासाठी भगतसिंग व राजगुरु यांनी पोलीस अधिकारी सँडर्स ची गोळी मारुन हत्या केली. या घटनेनंतर इंग्रजांनी त्यांना पकडण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती लावली. परंतू भगतसिंग व चंद्रशेखर आजाद हे दोघेही

शिक्षेपासुन वाचण्यासाठी रुप पालटून हावडा येथे गेले. त्याच्या काही काळानंतर इंग्रजांना भारतीयांची शक्ती दाखवून देशवासीयांना जागृत करण्यासाठी त्यांनी विधानसभेत बॉम्ब टाकण्याचा निर्णय घेतला. ठरलेल्या योजनेप्रमाणे ते आपले सहकारी बटूकेश्वर दत्त यांच्या सोबत विधान सभेच्या सत्रात पोहोचले व त्यांनी बॉम्ब फेकला. या हल्यात कोणीही ठार होणार नाही यांची त्यांनी काळजी घेतली. बॉम्ब फुटल्यानंतर त्यांनी इंकलाब जिंदाबाद चे नारे दिले.. यानंतर त्यांनी स्वतःला पोलीसांच्या ताब्यात दिले. इंग्रजांनी त्यांना आजीवन कारावासाची शिक्षा ठोठावली. परंतू जेव्हा इंग्रजांना कळाले की भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांनीच पोलीस अधिकारी सौंडर्सची हत्या केली. तेव्हा तिघांना फाशीची शिक्षा सुनावली. दि. २३ मार्च १९३१ ला आपल्या फाशीच्या दिवशी हे तिघे वीर इंकलाब जिंदाबाद, भारत माता की जय हे नारे देत जात होते. महान क्रांतीकारक भगतसिंग यांना शहीद ए आजम अशी पदवी देखील मिळाली होती. भगतसिंग यांचे विचार सामान्य माणसापेक्षा खुप वेगळे होते. आता ज्या नाती धर्मावरुन वाद विवाद चालु आहे. त्यामुळे भगतसिंग यांच्या मते माणसामध्ये जाती धर्मा वरुन कोणत्याही प्रकारचा अडथळा येवू नये. तसेच त्यांच्या मते या समाजातील प्रत्येक घटकाला त्यांचे स्वातंत्र्यमध्ये जीवन जगण्याचा अधिकार आहे. या समाजातील प्रत्येक घटकाचे वेगळे विचार वेगळे मत असावे. कोणाचंही शोषण होवू नये तसेच कोणाकडूनही त्यांचे अधिकार हिरावून घेतले जावू नये. त्याचप्रमाणे आपण कोणावरही आपले अधिकार लादू शकत नाही. भगतसिंग हे लहानपणापासुनच हुशार होते. लहानपासुन त्यांनी एक क्रांतीकारक बनण्याचा स्वप्न मनात ठेवलं होत लहानपासुन ते स्वतःला तयार करु लागले होते. भगतसिंग हे लहानपणी शाळेमध्ये नाही जायचे कारण त्यांच्या आजोबांना शाळेतील लोकांची इंग्रज सरकारसाठी असलेली निष्ठा मान्य नव्हती.

युध्द कला राजकारण या सगळ्या गोष्टीमध्ये ते प्रशिक्षण घेत होते. भगतसिंग यांचे शिक्षण लाहोर येथील नॅशनल कॉलेजमध्ये चालु होते. परंतू क्रांतीकारक आणि देश प्रेमापुढे त्यांनी शिक्षण सोडून नवजवान भारत सभेची स्थापना केली. खरंतर भगतसिंग यांना शिक्षणाची गरजच लहानपणापासुनच क्रांती घडवणाऱ्या लोकांसोबत त्यांचा वावर होता. भगतसिंग यांच्या प्रतिमेचा उपयोग दडपशाही विरुध्दचा प्रतिकाराचे आणि स्वतःच्या तत्वांप्रती दृढ



वचनबध्दचे शक्तीशली प्रतिक म्हणून केला गेला आहे. ब्रिटीश राजवटीला थेट कृतीतुन आव्हान देण्याचा त्यांचा अविचल निश्चय त्यांना प्रतिकुल परिस्थितीह धैर्याचे प्रतिनिधीत्व करणारा बनला आहे. भगतसिंग यांनी देशासाठी परम त्याग करण्याची इच्छा बाळगल्याने त्यांना देशभक्ती आणि निःस्वार्थीपणाचे एक मार्मीक प्रतिक बनले आहे. इंकलाब जिंदाबाद हे त्यांचे प्रसिध्द कोट केवळ भारतातच नव्हा तर जागतिक स्तरावर अन्यायाविरुध्द लढणाऱ्यासाठी एक रॅलींग रड बनले आहे. हा वाकप्रचार प्रतिकाराची भावना आणि अधिक न्याय जगाची इच्छा अंतर्भूत करतो. यांचा वारसा इतिहासाच्या पुस्तकापुरता मर्यादित राहु नये. ते प्रेरणाचे जिवंत स्त्रोत म्हणून काम केले पाहिजे. भारत आधुनिक जगाच्या गुंतागुंतीमधुन मार्गक्रमण करत असतात. त्यांचा न्याय समानता आणि धैर्य या तत्वांचे स्मरण करणे आणि त्यातुन प्रेरणा होणे आवश्यक आहे. भगतसिंग यांचे जीवन सकारात्मक बदल घडवू पाहणाऱ्यांसाठी एक रोडमॅप होते. त्यांच्या संदेश अधिक न्याय आणि सर्वसमावेशक समाजाला आकार देण्यासाठी सामुहीक कृतीच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींशी प्रतिध्वनित होतो. त्यांचा आदर्शाचे स्मरण करुण आणि अंतर्भुत करुन, आपण त्यांच्या बलीदानाचा सन्मान करु शकतो आणि चांगल्या भारतासाठी आणि चांगल्या जगासाठी चालु असलेल्या संघर्षात योगदान देवू शकतो. सरदार भगतसिंग हे देशाच्या महान क्रांतीकारी नेत्यापैकी एक होते. देशाच्या स्वातंत्र्यात दिलेले बलीदान खरोखर प्रशंसनीय आहे. आज जरी भगतसिंग आपल्या सोबत नाही तरी त्यांची देशभक्तीची भावना आणि बलीदान सर्वांना प्रेरणा देत असते.

माझी माटी माझा देश



कु. पुजा विजय तुपसुंदरे
बी.ए. भाग १

''मातीला नमन, वीरांना वंदन,
स्वातंत्रसैनिक, वीरांना वंदन करणारे
मेरी माटी, मेरा देश, अभियान''

देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असतानांच आगामी काळात देशाची वाटचाल कशी असावी. भविष्याचा वेध घेतांना स्वातंत्र्यासाठी बलीदान दिलेल्या वीरांचेही स्मरण व्हावे आणि २०४७ पर्यंत आपला देश विकसीत देश म्हणून नावारुपात यावा. यासाठी सर्वांच्या योगदानाची गरज आहे. 'मिट्टी को नमन, वीरों को वंदन' या घोषवाक्यासह देशात 'माझी माती माझा देश' अभियान दि. ०९ ऑगस्ट २०२३ पासुन सुरु करण्यात आले आहे.

भारत देश आज जगात मोठी लोकशाही असलेला महासत्ता देश आहे. या देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. मात्र स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतीकारक, स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक देशवासियांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या त्यागामुळेच स्वातंत्र्याची पहाट उगवली. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेल्या अभियानाच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या, बलिदान दिलेल्या त्या सर्व देशवीराप्रती नतमस्तक होण्याची संधी आपल्या मिळाली आहे.

भारताला विकसीत देश बनविणे, गुलामगिरीची मानसिकता दुर करणे, आपल्या समृध्द वारशाचा अभिमान बाळगणे, एकता व बंधूता टिकवून ठेवणे असे अनेक हेतू आहेत. संपूर्ण देशात, राज्यात एकाच कालावधीत हे अभियानांतर्गत शिलाफलक, वसुधा वंदन, स्वातंत्र्यसैनिक, वीरांना वंदन, पंचप्रण घेणे, ध्वजारोहण व राष्ट्रगान अशा पाच उपक्रमांतून क्रांतीकारक व आपल्या माती विषयी जनजागृती प्रेम आहे.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली आहेत. त्यानिमीत्ताने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमीत्त केंद्र सरकारच्या सुचनेनुसार 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती माझा देश' या अभियानाची सुरुवात केली. हे अभियान दि. ०९ ऑगस्ट २०२३ ते ३० ऑगस्ट २०२३ अखेर देशात राबविले आहे.

क्रांतीकारकांचे बलिदान



कु. गायत्री विनोद चव्हाण
बी.कॉम. भाग १

२३ मार्च १९३१ मध्यवर्ती कारागृह लाहोर तसे पाहता नेहमी प्रमाणेच आजही सुर्य पूर्वेकडूनच उगवला होता. पण सुर्योदयाच्या लालीत वाढत जाणाऱ्या तेजा ऐवजी अस्ताला जाणाऱ्या सुर्याची काळीमा पसरली होती. कारागृहात सर्वदूर जाणवणारी नीरव शांतता येणाऱ्या भीषण वादळाच्या संकटाला सुचित करत होती. कारागृहात कंटाळवाण्या वातावरणात मनाला बैचेन करणारी स्तब्धता, उद्वेग दाटून आला होता. तरीही बराक क्रमांक १४ मधील बंदी भगतसिंग आणि त्यांच्या जवळच्याच कोठडीतील बंदी राजगुरू व सुखदेव हे तिघेही शारिरीक आणि मानसिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम, खंबीर, अतिशय शांत आणि तणावमुक्त वाटत होते. २४ मार्च रोजी सकाळी ७ वाजता त्यांच्या फाशीची वेळ निर्धारित करण्यात आलेली आहे. त्यांचा अपराध होता आपल्या मातृभुमीच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटीश सरकार विरुध्द केलेल बंड !

फाशीपूर्वी आपल्या नातलगांची शेवटची भेट घेण्याचा प्रघात पूर्वीपासुन सुरु आह ही अशी भेट असते जेथे भावनांचा महापूर लोटतो, शब्द मुके होवून कंठातच अडकुन राहतात आणि अविरतपणे ओघळत असतात. तो केवळ अश्रुच. ज्यामुळे शेवटच्या क्षणीही आपल्या आप्तांना नीटपणे पाहता येत नसत. दुपारी आपल्या या लाडक्या सुपूत्रांना भेटण्यासाठी भगतसिंगाचे आजोबा सरदार अर्जुनसिंग वडील सरदार किशनसिंग, त्यांची पत्नी आणि भावजया यांच्या समवेत राजगुरुची विधवा आई त्याच्या मुलीसोबत आणि सुखदेवची विधवा आई आपल्या मोठ्या दीरासोबत आलेले होते. या क्रांतीकारांवरील खटला निकाली निघाला होता. त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. या तिन्ही क्रांतीकारकांच्या माता–पित्यानांच फक्त या अंतीम भेटीची परवानगी कारागृह अधिकाऱ्यांनी दिली होती. या अन्यायापूढे या तिन्ही वीरमाता न झुकण्याच्या निश्चय केला. विद्यावती (भगतसिंगची आई), पार्वतीबाई (राजगुरुची आई), रल्लीदेवी (सुखदेवची आई).

भगतसिंग, राजगुरु, सुखदेव हे तिघेही महान भारतीय क्रांतिकारक होते. ब्रिटीश साम्राज्याविरुध्द त्यांनी सशस्त्रलढा पुकारल्यामुळे तरुण वयातच इंग्रजांनी त्यांना फ ाशीची शिक्षा दिली. पंजाब प्रांतात सायमन कमिशनच्या विरोधात आंदोलन करतांना लाला लजपतराय ब्रिटींशांनी त्यांच्या लाठीमार केला. या मारहाणीमुळे त्यांची मृत्यू झाला. त्यांच्या मृत्युचा आणि ब्रिटीशांच्या या जुलूमशाहीचा सुड उगवण्यासाठी पंजाबमधील तरुणांनी उठाव केला. लालाजींच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी भगतसिंग व चंद्रशेखर आझाद यांनी पोलीस अधिकारी सँडर्स गोळ्या मारुन वध केला. या घटनेनंतर इंग्रजानी त्यांना पकडण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती पणाला लावली. तेव्हा त्यांचा ससेमिरा चुकवण्यासाठी भगतसिंग व चंद्रशेखर आझाद दोघेही हावडा येथे गेले. यांच्या काही काळानंतर इंग्रजांना भारतीयाची शक्ती दाखूवन देशवासियांना जागृत करण्यासाठी या क्रांतीकारांनी विधानसभेत बॉम्ब टाकण्याचा निर्णय घेतला. ठरलेल्या योजनेनुसार ते आपले सहकारी बटूकेश्वर दत्त यांच्यासोबत विधानसभेच्या सत्रात पोहचले व त्यांनी बॉम्ब फेकला. या हल्यात कोणीही ठार होणार नाही यांची त्यांनी काळजी घेतली. बॉम्ब फु टल्यानंतर त्यांनी 'इंकलाब जिंदाबाद' च्या घोषणा दिल्या. यानंतर स्वतः पोलीसासमोर हजर झाले. या कृत्याबद्दल त्यांच्या खटला चालवून आजीवन कारावारासाची शिक्षा ठोठावली गेली. परंतू जेव्हा इंग्रजांना कळले की भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांनीच पोलीस अधिकारी साँडर्सचा वध केला तेव्हा तिघांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

ते तिघेही देशभक्त देशासाठी एक दिलाने लढत होते. त्यांच्या शिक्षेसाठी २४ मार्च हा दिवस ठरविण्यात आला होता परंतू जनक्षोम एवढा होता ब्रिटीशांनी त्यांना आदल्या दिवशी फाशी देण्याचे ठरविले .आपल्या फाशीच्या दिवशी हे तिघे क्रांतीवीर इंकलाब जिंदाबाद, भारत माता की जय, वंदे मातरम असा घोषणा देत होते. लाहोरच्या मुख्य तुरुगांत २३ मार्च १९३१ रोजी तिघांना एकत्र फाशी देण्यात आली. फाशी दिल्यानंतर तिघांनाही एकाच चित्तेवर अग्नी देण्यात आल्या.

अशाप्रकारे हे तिघेजण देशभक्त अंतीम क्षणी देखील एकाच चित्तेवर एकरुप होत भारतमातेच्या चरणी विलीन झाले. हुसैनीवाला, पंजाब येथे त्यांना अग्नि देण्यात आली. आज या ठिकाणी राष्ट्रीय हुतात्मा स्मारक उभारलेले आहे. त्यांच्या बलीदानाची आठवण म्हणून २३ मार्च हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून पाळला जातो.



चारोळ्या...



कु. पुजा सु. आडे
बी.ए. भाग–१

तिरंग्याचे तीन रंग....
खूप काही सांगून जातात....
भारत देशाची खरी ओळख,
आसंमती झळकून जातात !

उत्सव तीन रंगांचा...
आभाळी आज सजला,
नतमस्तक मी त्या सर्वांचा
ज्यांनी भारत देश घडविला !

तिरंगा आमुचा मान आहे....
पराक्रमाचे गान आहे,
भारताची शान आहे....
तिरंगा आमुचा प्राण आहे !

भारतीय इतिहासात .....
तो दिवस अमर झाला,
१५ ऑगस्टला....
आमुचा भारत स्वातंत्र्य झाला !

ना जातीसाठी लढले....
ना धर्मासाठी लढले,
शुर भारतीय वीर....
फक्त देशासाठी लढले...!

राष्ट्रीय एकात्मता



कु. लक्ष्मी अनिल जाधव
बी.ए. भाग १

आमचे वेद, आमचा इतिहास आमची परंपरा उच्चतम आहे; याची जाणीव आम्हा भारतीयांस असली पाहिजे, भारताच्या ऐक्यासाठी प्रत्येक भारतीयाने जागरूक असले पाहिजे. देशाच्या ऐक्यास बाधा येईल असे वर्तन कोणाही नागरिकाच्या हातून होता कामा नये. या प्रवृत्तीसच 'राष्ट्रीय एकात्मता' असे म्हणतात. भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी अनेक वीरांनी बलिदान केले, जीवनसर्वस्व स्वातंत्र्यासाठी खर्च केले. त्यांच्या रोमारोमांत राष्ट्रीय एकात्मता भिनली होती. आज स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे होऊन गेली आहेत.

आज राष्ट्रीय एकात्मता टिकविण्याची वेगळीच जबाबदारी आपणावर आहे. हा वारसा आपण पुढे चालविला पाहिजे. विविधतेत ऐक्य साधणाऱ्या आमच्या या संस्कृतीत अनेक उज्ज्वल गोष्टी घडलेल्या आहेत. आर्य संस्कृती, ऋषि-मुनी, महाकाव्ये यांची थोर परंपरा आपल्या देशास आहे. रामायण, महाभारतातूर नीतिबोधाचे तत्त्वज्ञान आचारविचार यांचे दर्शन होते. निरनिराळ्या राजांच्या पराक्रमांची वर्णने बखरी, पोवाडे आजही सांगतात.

निरनिराळ्या नद्यांचा परिसर, संस्कृती, तीर्थक्षेत्रे ही आमच्या चालीरीतींचे, धार्मिक रीतीरिवाजांचे जिवंत दर्शन घडवितात. राष्ट्रीय एकात्मतेस बाधा आणणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. या देशात अनेक धर्माचे लोक राहतात. प्रत्येक धर्माचे तत्त्वज्ञान हे चांगले आहे; परंतु तत्त्वज्ञान आणि आचार यामध्ये फारकत होते. धार्मिक मतभेद लागतात. कधी कधी ते विकृत, विध्वसक रूप घेतात. मारामारी, खून, दंगे अशा स्वरूपात ते उजेडात येतात. यासाठी सामंजस्याने कोणताही प्रश्न सोडविला पाहिजे.

समाजाच्या पर्यायाने देशाच्या विकासाच्या दृष्टीने हातभार कसा लावता येईल हेच उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवले पाहिजे. निरनिराळे प्रादेशिक बाद निर्माण होतात, सीमा, तटा, भाषावाद बगैरे. त्यामधून निर्माण होणारे तणाव हानिकारक ठरतात. आपले स्वातंत्र्य हे अज्ञात हुतात्म्यांच्या त्यागाचे प्रतीक आहे. हे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी तत्पर राहणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे. यासाठी राष्ट्रीय वृत्ती अंगी बाणणे जरूर आहे.

आपले राष्ट्र अधिक वैभवशाली सामर्थ्यसंपन्न कसे होईल याचा प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे विध्वंसक कार्य करणाऱ्या ऐक्याला बाधा आणणाऱ्या पाशवी शक्तींचा निःपात केला पाहिजे.

सामाजिक बंधने झुगारणे, कायदेकानून न जुमानणे, जातीयतेच्या लहानसहान गोष्टींना भीषण स्वरूप देणे. आपापसांतील मतभेद विकोपास नेणे या गोष्टी राष्ट्रीय एकात्मतेस विचालक आहेत. त्या टाळल्या पाहिजेत. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही तत्त्वे देशात रुजली पाहिजेत. यासाठी सर्वांनी जागरूक राहिले पाहिजे. मानवतावादी दृष्टीने इतरांशी वागले पाहिजे. सौजन्याने सर्वांशी वागले पाहिजे. मानवतावादी ध्येयवादाने जीवनाकडे पाहिले जावे. स्वार्थी वृत्ती, फसवेगिरी, लाचलुचपत, साठेबाजी, काळाबाजार, भ्रष्टाचार या गोष्टी नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, बुरसटलेली मते नष्ट केली पाहिजेत. अस्पृश्यतेसारख्या भयंकर रोगांवे उच्चाटन केले पाहिजे. सर्व समाज वैभवशाली करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेचे शिक्षण प्रत्येक भारतीयास मिळणे जरूर आहे.

कविता



कु. पुजा सु. आडे
बी.ए. भाग–१

देऊनिया आहुती प्राणांची,
वाचविले आपल्य भारतभूमीला
संकटे सारी स्वतःची झेलुनी,
स्वतःच्या तनाच्या चिंधड्या होऊनी,
जीवन आपुले त्यागले या कर्मभूमीला

मनी ध्यानी नसतांना,
अचानक आलेला शत्रुंचा झेलुनी,
कवटाळले ज्या देशवीरांनी मृत्यूला....

सदैव असेन प्रणाम माझा,
शहीद झालेल्या देशभक्तांना.....
भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या,
शुर वीरांना....

आपला राष्ट्रध्वज



कु. रुपाली राजेंद्र मेहत्रे
बी.कॉम. भाग ३

भारताचा राष्ट्रीय ध्वज हे आडव्या आयताकृती आकारात बनवलेले राष्ट्रीय चिन्ह आहे. गडद भगवा (वर), पांढरा (मध्यभागी) आणि हिरवा (तळाशी) अशा तीन रंगांच्या मदतीने ते सजवले जाते. पांढऱ्या रंगाच्या मध्यभागी एक निळे अशोक चक्र (म्हणजे कायद्याचे चाक) आहे, ज्यामध्ये 24 प्रवक्ते आहेत. 22 जुलै 1947 रोजी झालेल्या बैठकीत भारताच्या संविधान सभेने राष्ट्रध्वजाचे सध्याचे स्वरूप स्वीकारले होते. सध्याचा राष्ट्रध्वज अधिकृतपणे भारताच्या राज्यकर्त्यांनी स्वीकारला होता. तीन रंग असल्यामुळे त्याला तिरंगा असेही म्हणतात. तो स्वराज ध्वजावर आधारित आहे (म्हणजे पिंगली व्यंकय्या यांनी डिझाइन केलेला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा ध्वज).

भारतीय ध्वजाचा अर्थ आणि महत्त्व :

भारतीय ध्वज तीन रंगात असल्यामुळे त्याला तिरंगा असेही म्हणतात. खादी फॅब्रिक, मध्यभागी एक वर्तुळ आणि तीन रंगांचा वापर करून भारतीय ध्वज तयार केला आहे. त्याची लांबी आणि रुंदी यांचे गुणोत्तर अनुक्रमे 2 : 3 आहे. स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाचे प्रतीक म्हणून भारतीय ध्वज तयार केला आणि स्वीकारला गेला.

भारतीय ध्वज आपल्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन इत्यादी भिन्न विचारधारा आणि धर्म असूनही, ते सर्व धर्मांना एकाच मार्गावर घेऊन जाते आणि आपल्यासाठी एकतेचे प्रतीक आहे. त्यात असलेले तीन रंग आणि अशोक चक्र यांचा स्वतःचा अर्थ आहे जो खालीलप्रमाणे आहे.

केशरी रंग :

राष्ट्रध्वजाचा वरचा भाग केशरी आहे; जे त्यागाचे प्रतीक आहे, देशाप्रती धैर्य आणि निस्वार्थीपणा दर्शवते. हिंदू, बौद्ध आणि जैन या धर्मांसाठी हा अतिशय सामान्य आणि धार्मिक महत्त्वाचा रंग आहे. भगवा रंग वेगवेगळ्या धर्मातील लोकांची अहंकारापासून मुक्तता, त्याग दर्शवतो आणि लोकांना एकत्र करतो. केशरी रंगाचे स्वतःचे महत्त्व आहे जे आपल्या राजकीय नेतृत्वाला आठवण करून देते की त्यांच्याप्रमाणेच आपणही काही वैयक्तिक फायद्यासाठी पूर्ण समर्पण ठेवून राष्ट्रहितासाठी कार्य केले पाहिजे.

पांढरा रंग :

राष्ट्रध्वजाच्या मध्यवर्ती भागाची रचना पांढऱ्या रंगाने करण्यात आली आहे जी राष्ट्राची शांतता, पवित्रता आणि प्रामाणिकपणा दर्शवते. भारतीय तत्त्वज्ञानानुसार पांढरा रंग देखील शुद्धता आणि ईमानदारी दर्शवतो. राष्ट्राला मार्गदर्शन करण्यासाठी ते सत्याच्या मार्गावर प्रकाश टाकते. हे भारतीय राजकीय नेत्यांना शांतता राखून मुख्य राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने देशाचे नेतृत्व करण्याची आठवण करून देते.

हिरवा रंग :

हिरवा हा तिरंग्याच्या तळाशी असलेला रंग आहे, जो विश्वास, सुख, समृद्धी आणि प्रगती दर्शवते. भारतीय तत्त्वज्ञानानुसार हिरवा हा उत्सव आणि दृढतेचा रंग आहे जो जीवन आणि आनंदाचे प्रतिनिधित्व करतो. संपूर्ण भारताच्या मातीतली हिरवाई दाखवतं. हे भारतातील राजकीय नेत्यांना आठवण करून देते की त्यांना भारताच्या मातीचे बाह्य आणि अंतर्गत शत्रूंपासून संरक्षण करायचे आहे.

अशोक चक्र आणि 24 प्रवक्ते :

हिंदू धर्मानुसार पुराणांमध्ये 24 क्रमांकाचे खूप महत्त्व आहे. अशोक चक्र हे धर्म चक्र मानले जाते, ज्याला वेळ चक्र देखील म्हणतात. अशोक चक्राच्या मध्यभागी 24 प्रवक्ते आहेत जे दिवसाच्या 24 मौल्यवान तासांचे प्रतिनिधित्व करतात. हे हिंदू धर्मातील 24 धर्म ऋषी देखील प्रदर्शित करते.

भगवान गौतमबुध्दाच्या शिकवणूकीचे प्रतिनिधीत्व २४ प्रवक्ते करतात. जैन धर्माचे २४ तिर्थंकर याचे देखील प्रतिनिधीत्व २४ प्रवक्ते करतात.

अशोक चक्र निळ्या रंगाचे का?

राष्ट्रध्वजाच्या पांढऱ्या पट्टीच्या मध्यभागी असलेला अशोक चक्राचा निळा रंग विश्वाचे सत्य दर्शवतो. हे आकाश आणि समुद्राचे रंग देखील दर्शवते.

24 तीळ काय दर्शवतात?

प्रेम, शौर्य, संयम, शांती, उदारता, चांगुलपणा, विश्वास, सौम्यता, निःस्वार्थता, आत्मसंयम, आत्मत्याग, सत्यता, धार्मिकता,न्याय, दयाळूपणा, आकर्षकता, नम्रता, सहानुभूती, करुणा, धार्मिक शहाणपण, नैतिक मूल्ये, धार्मिक समज, देवाचे भय आणि विश्वास (विश्वास किंवा आशा).

देशभक्ती चे महत्व



कु. पायल पुरुषोत्तम भुजाडे
बी.ए. भाग १

ज्या गोष्टीचे महत्व व्यक्तिगत स्वार्थापेक्षा आपल्याला अधिक जाणवते अशा गोष्टीप्रती आपण आपली भक्ती व्यक्त करत असतो. देव असो वा देश असो. भक्ती हा आपल्या देशवासीयांसाठी एक जीवनाचा मार्ग ठरलेला आहे. त्यामुळे खरी देशशक्ती ही संपूर्ण देशाचा आणि येथील नागरिकांचा विकास घडवून आणु शकते.

एका विशिष्ट अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक आधारावर उभा असलेला आपला भारत देश आणि त्याबद्दल आपल्याला वाटणारा कमालीचा आदर आणि अशा सांस्कतिक मुल्यांच्या वृध्दीसाठी देशाप्रती केली जाणारी कृती म्हणजेच प्रत्येक नागरिकासाठी देशभक्ती होय.

कोणत्याही जाती धर्म आणि पंथाच्या नावाखाली देश विभागला जात असतो. या बाबी व्यक्तिगत स्तरावर सांभाळून देशाच्या विकासात बाधा असू नयेत यासाठी ठोस कायदे–नियम सर्वासाठी सारखेच लागू असावेत. अशा काही गोष्टी सामाजिक स्तरावर व्यवस्थित राबवल्यास देशभक्तीसाठी पाया तयार होवू शकतो.

देश हा फ क्त सीमेवर निर्धारित न होता तेथील लोकांच्या क्षमतेवर आणि त्यांच्या कर्तुत्वावर निर्धारित केला गेला पाहिजे. तसेच आपली देशभक्तीची संकल्पना ही हिंसाचार नसली पाहिजे. येथील नागरिकांसाठी जगण्यास एक स्वस्थ सामाजिक वातावरण निर्मिती करणे म्हणजेच देशभक्ती होय.

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी आपला देश एकत्र आला होता तेव्हा जी देशभक्ती जाणवली होती. त्या पध्दतीची देशभक्ती सध्या गरजेची नाही. आपल्याला कोणाशी लढायचे नाही तर देशातीलच व्यक्ती सक्षम बनवुन त्यांना देश विकासात जोडायचे आहे.

भारतीय संस्कृतीला हजारो वर्षांचा इतिहास आहे. ती संस्कृती जपून आत्मिक उन्नती साधणे हे भारताचे वैशिष्ट्ये ठरलेले आहे. त्या संस्कृतीचे पाईक म्हणून प्रत्येक पिढीत कायदे प्रणालीवर प्रत्येक व्यक्ती देशाबद्दल असलेल्या जबाबदारीची जाणीव करुन दिली गेली पाहिजे.

देशाचे नागरिक घडवतांना लहानपणापासून देशाबद्दल आत्मियता जागृत करणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षण, कला, क्रिडा, व्यवसाय, राजकारण अशा सर्व स्तरांवर देशाला प्रथम प्राधान्य असायला हवे. त्यातूनच प्रत्येक पिढी प्रेरणा प्राप्त करले आणि जीवनाची दिशा ही देशाप्रती ठरवू शकेल.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अन्य शत्रुंचे आक्रमण होवू नये आणि सामाजिक स्थैर्य लाभावे म्हणून भारतात सुरक्षा प्रणाली खुपच मजबुत करण्यात आली. त्यामुळे आज देशभक्ती म्हणजे कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा यंत्रणेत सामील होवून देशसेवा करणे असाही एक अर्थ तयार झालेला आहे.

देश हा तेथील व्यक्तींमुळे मोठा होत असतो.त्यामुळे प्रत्येक बालक, तरुण हे भारताच्या उज्वल भविष्यासाठी कटिबध्द असले पाहिजेत. व्यक्तीमध्ये नैतिक मूल्यांची वाढ होत गेली तर देशभक्ती काही वेगळी शिकण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे साक्षर भारताची आज खुपच आवश्यकता आहे.

देशभक्ती ही फक्त स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनादिवशीच न दाखता प्रत्येक क्षणी ती आपल्या कृतीतून दिसायला हवी. जगण्याच्या व्यक्तिगत उद्देश असला तरी सामुहिक स्तरावर एक उदात्त हेतू म्हणून आपण आपल्या देशासाठी छोटे–मोठे कार्य करु शकतो.

उज्वल आणि विकसित भारताच्या निर्माणासाठी सामाजिक आणि नैतिक मुल्यांची जोपासना करत येथील प्रत्येक नागरिकाने व्यक्तिगत स्वातंत्र्य अनुभवले पाहिजे. अशी दुरदृष्टी देशभक्ती जागृत करायला हवी.

अशा प्रगत देशाचे स्वप्न पूर्ण करण्याच्या हेतूने सर्व देशवासीय अंतर्गत कलह मिटवून देशाच्या विकासासाठी निर्मळ मनाने आणि देशभक्ती भावनेने एकत्र आले पाहिजेत. तेव्हा त्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या पध्दतीला खरी देशभक्ती म्हणता येईल.



राष्ट्र गीताचा मराठी अर्थ



पृथ्वीराज दादाराव कांबळे
बी.ए. भाग २

जन-गण-मन अधिनायक जय हे
भारत भाग्य विधाता....

हे राष्ट्रगीत भारताला स्मरुण लिहीले आहे. पहिल्या ओळीत असे लिहीले आहे की, हे भारत देशा ! इथल्या भारतीयांचा इथल्या जनामनाचा तु अधिनायक म्हणजेच ईश्वर, सर्वस्व, सेनापती सर्वकाही तुच आहेस आमचे भाग्य घडवणारा विधाताही तुच आहेस.

पंजाब, सिंध, गुजरात, मराठा, द्राविड उत्कल बंग...

या ओळीमध्ये रविंद्रनाथ टागोरांनी भारताच्या विविधतचे दर्शन घडवले आहे. ज्यामध्ये पंजाब, सिंध, गुजरात, महाराष्ट्र, द्राविड म्हणजे दक्षिण भाग, उत्कल म्हणजे आताचा ओडीसा, बंगाल या प्रांताचा उल्लेख केला आहे.

विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा, उच्छल जलधितरंग...

या ओळीमध्ये भारताला लाभलेल्या दैवी सौंदर्याचा उल्लेख केला आहे. ज्यामध्ये विंध्य पर्वत आणि हिमाचल, यमुना आणि गंगा नदी आणि उसळी घेणाऱ्या समुद्राच्या लाटांचे वर्णन त्यांनी लिहीले आहे.

तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे,
गाहे तव जय गाथा । जन-गण मंगलदायक जय हे
भारत भाग्य विधाता, जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय जय हे

या शेवटच्या चरणात ते लिहीतात भारताचे हे सर्व प्रांत ही विविधता हे सौंदर्य असे सगळे मिळून तुझ्या नामाचा गजर करत आहोत. तुझ्यापुढे नतमस्त होवून आशिर्वाद मागत आहो, तुझी किर्ती सागत आहोत, हे सर्वांचे मंगल करणाऱ्या भाग्य विधात्या भारत देशा तुझा जयजयकार असो.

हे राष्ट्र गीत जेष्ठ साहित्यीक महाकवी नोबेल पारितोषीक विजेते रविंद्रनाथ टागौर यांनी रचले आहे. या गीतात बंगाली व काही संस्कृत शब्द आहे.

झेंडा उंचा रहे हमारा



कु. अर्चना किशोर राठोड
बी.ए. भाग १

तीरंगा हा आपल्या भारताचा राष्ट्रध्वज आहे. १५ ऑगस्ट १९४७ साली आपला भारत देश स्वतंत्र झाला. त्यानंतर आपल्या देशात सर्वत्र इंग्रजांचा युनियन जॅक खाली उतरवण्यात आला आणि त्या ठिकाणी आपला राष्ट्रध्वज स्वतंत्र असलेला प्रत्येक राष्ट्राला त्याचा राष्ट्रध्वज असतो. हा राष्ट्रध्वज म्हणजे त्या राष्ट्राच्या गौरवाचे, सन्मानाचे आणि अस्मितेचे प्रतिकच असते. स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेस भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी ध्वजारोहण केले होते. तेव्हापासुन आजपर्यंत राष्ट्राच्या प्रतिष्ठेचे प्रतिक असलेला हा ध्वज फडकत आहे.

आपला राष्ट्रध्वज केशरी, पांढरा आणि हिरवा या तीन रंगाचा बनला आहे. या झेंड्याच्या मध्यभागी निळ्या रंगाचा चक्र बनला आहे. या तीनही रंगंना विशेष अर्थ आहे. केशरी रंग हा जोश आणि शौर्याचे प्रतिक आहे आणि पांढरा रंग हा पावित्र्य आणि मांगल्यांचे प्रतिक आहे. हिरवा रंग वैभव आणि समृध्दी यांचे प्रतिक आहे.

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दोन दिवशी समारंभपूर्वक ध्वजवंदन केले जाते. दोन्ही दिवशी ध्वजाला २१ तोफांची सलामी दिली जाते. सैन्याच्या पलटणी ध्वजा ला अभिवादन करतात. सर्व राज्यांत तेथील मुख्यमंत्री किंवा राज्यपाल यांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. तर नवी दिल्ली येथे माननीय पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण होते.

खरोखर, आपण आपल्या ध्वजाचे रक्षण प्राणपणाने केले पाहिजे. ध्वज कधी, कुधी आणि कसा लावावा याचे काही नियम आहेत. ते नियम जर मोडले तर शिक्षा होवू शकते. पुर्वी स्वातंत्र्य दिनाच्या आणि प्रजासत्ताक दिनाच्या वेळेस फे रीवाले कागदाचे राष्ट्रध्वज किंवा बिल्ले विकत असते. तो दिवस संपला की हे सगळे कागदी राष्ट्रध्वज कचऱ्यात जमा झालेला दिसते. आपल्या राष्ट्रध्वजाचा हा अपमान आहे तो कदापी चालू देता कामा नये. असा आहे आपला राष्ट्रध्वज आणि असे आहे आपल्या राष्ट्रध्वजाचे महत्व.



नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य लढ्यात प्रवेश व कार्य



कु. रुपाली राजेंद्र मेहत्रे
बी.कॉम. भाग ३

सुभाष बोस यांचा जन्म ओरिसातील एका मोठ्या बंगाली कुटुंबात झाला होता.

नेताजी असे त्यांना प्रथम १९४२ च्या सुरुवातीस जर्मनीमध्ये भारतीय सैनिकांनी आणि बर्लिनमधील भारताच्या विशेष ब्यूरोमधील जर्मन आणि भारतीय अधिकाऱ्यांनी म्हणायला सुरू केले होते. आता संपूर्ण भारतात त्यांना नेताजी म्हटले जाते. कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची, दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून, त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

रविंद्रनाथ ठाकूर ह्यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधींजी मणिभवन नामक वास्तु मध्ये वास्तव्य करत. तेथे जुलै २०, १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.

गांधींजीनी देखिल कोलकत्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्याला आले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी, गांधींजीनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये ह्या आंदोलनाचे नेतृत्व करत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले.

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी, कोलकाता महापालिकेची निवडणूक, स्वराज पक्षाने लढवून, जिंकली. स्वतः दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून, त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली.

लवकरच, सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरूंसह, सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. १९२८ साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले, तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते. कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी, काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरू ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरू रिपोर्ट सादर केला.

१९२८ साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कोलकात्यात झाले. ह्या अधिवेशनात सुभाषबाबूंनी खाकी गणवेश घालून, पंडित मोतीलाल नेहरूंना लष्करी पद्धतीने सलामी दिली. गांधींजी त्याकाळी पूर्ण स्वराजच्या भूमिकेशी सहमत नव्हते. ह्या अधिवेशनात त्यांनी इंग्रज सरकारकडून वसाहतीचे स्वराज्य मागण्यासाठी ठराव मांडला होता. मात्र, सुभाषबाबू व पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांना, पूर्ण स्वराजच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देण्याचे ठरले. जर एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, तर काँग्रेस पूर्ण स्वराजची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे, १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली लाहोरला झाले, तेव्हा असे ठरवले गेले की जानेवारी २६ हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जाईल.

राणी लक्ष्मीबाई





विकास किशोर परांडे
बी.एस्सी. भाग ३

''चमक उठी सन सत्तावन में,
वह तलवार पुरानी थी,
खुब लडी मर्दानी वह तो,
झाशी वाली रानी थी ।''

झाशीची राणी यांचा जन्म झाँसी येथे ११ नोव्हेंबर १८२८ मध्ये झाला होता. राणी लक्ष्मीबाई यांचे जीवन देश स्वातंत्रता साठी बलीदान केले. राणी लक्ष्मीबाई स्त्रियांचे प्रेरणास्थान आहे. राणी लक्ष्मीबाईच्या वडीलांचे नांव मोरोपंत तांबे, आई भागीरथी असे होते.

राणी लक्ष्मीबाईचे खरे नांव मणिकर्णिका असे होते. मनुताई तीन चार वर्षाची असतांनाच त्यांच्या आईचे निधन झाले. त्यानंतर दुसऱ्या बाजीराव पेशवाच्या आश्रयाला गेले.

राजवाड्यातील नानासाहेब पेशवे यांच्या बरोबर राहुन म्हणता युध्दकलेचे शिक्षण घेवू लागल्या तलवार, भाला, गोळाफेक, तीर कमान चालवणे, बंदूक चालवणे, घोडेस्वार होणे अशा प्रकारचे शिक्षण घेवू लागल्या. मनुताई अत्यंत हुशार होत्या. सर्वप्रकारच्या युध्दकलेचे शिक्षण त्यांनी घेतले होत व लेखन, वाचन च्या कलेत निपूण झाल्या.

मनुताईचे विवाह झाशी चे महाराज यांच्यांशी झाला. विवाह झाल्यानंतर त्यांचे महाराज गंगाधर नेवाळकर यांनी म्हणून त्यांचे विलक्षण तल्लक बुद्धी व तत्परता पाहून त्यांचे नाव लक्ष्मणा ठेवले. सर्वजन त्यांना लक्ष्मीबाई म्हणून संबोधित करुन लागले.

इ.स.सन १८५१ मध्ये राणी लक्ष्मीबाई यांना मुलगा झाला. झाशीला वारस मिळाला म्हणून सर्वत्र प्रजेमध्ये आनंदाचा वातावरण निर्माण झाले. आपल्या गादीला वारस मिळाल्याने गंगाधरराव खुप आनंदी होते. काळाच्या ओघाने दोन–तीन महिण्यातच बाळाचा मृत्यु झाला.

पुत्रवियोगाचे दुःख गंगाधररावांना सहन झाला नाही, त्यामुळे काही दिवसांनी त्यांचे निधन झाले. गादीला वारस म्हणून त्यांनी घराण्यातील मुलाला दत्तक घेतले. त्यांचे नांव आंनदराव नेवाळकर होते. दत्तक विधानानंतर त्याचे नांव दामोधरराव ठेवण्यात आले. लक्ष्मीबाईवर एका मागे एक संकल आली. पुत्रवियोगाच्या नंतर १८ व्या वर्षी वैधव्य प्राप्त झाले.

इंग्रजांनी डावपेचांनी झाशी ताब्यात घेतली व ब्रिटीशांच्या झाशीच्या प्रजेवर अत्याचार करण्यास सुरुवात केली. अन्यायामुळे लक्ष्मीबाई वाघिणी प्रमाणे चवताळून उठली आणि घोषणा केली 'मै मेरी झांशी नहीं दुंगी' अशा प्रकारे संभव्य हल्यापासुन झाशीचे संरक्षण करत राहील्या.

ब्रिटीशांनी लक्ष्मीबाईला जिवंत पकडण्यासाठी सेनापती ह्यु रोज यांची नेमणुक केली. ह्यु रोज ने झाशी जवळ छावनी लावली. त्यांच्या सैन्याचे लक्ष्मीबाईला निरोप पाठविला शरण येण्यासाठी. पण राणी लक्ष्मीबाई तठस्त राहील्या. शरणागती न पत्कारता आपल्या पुत्राला पाठीवर बांधून लढाई करत राहील्या. त्यांनी एका क्षत्रीय राणीप्रमाणे असामान्याप्रमाणे ब्रिटीशांना चकीत केले. अशा असामन्य स्त्रीचे चरित्र महिलांचे प्रेरणा देणारे आहे.

देश स्वातंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाईने आपले बलिदान दिले. म्हणतात ना, ''खुब लडी मर्दानी, झाशीवाली राणी'' आजच्या आधुनिक युगातही राणी लक्ष्मीबाई स्त्रियांना प्रेरणा देणारी आहे. स्त्री हे माता, पत्नी, भगिनी प्रमाणेच वेळ आली तर दुष्टाचा संहार करणारी माँ दुर्गाचे रुप आहे. राणी लक्ष्मीबाई यांच्या तिसाव्या वर्षी विरमरण स्विकारले. त्या शुर राणीला रणांगणात वीरमरण आले.

भारत माझा देश आहे



मुस्कान परवीन साबीर खान
बी.ए. भाग १

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य झाला. आज आपला भारत देश १५ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आनंदाने साजरा करत आहे. ही गोष्ट प्रत्येक भारतीयांसाठी खुप गौरवाची व अभिमानाची आहे.

आपला भारत देश सुमारे १५० वर्षे पारतंत्र्यात होता. त्यातुन मुक्ततेसाठी त्याने केलेला संघर्ष खुप मोठा व कठीण होता. भारताला स्वातंत्र्य मिळूण देण्यासाठी अनेक महान क्रांतीकारकांनी आपले अमुल्य योगदान दिले. आज या अमृत महोत्सवी वर्षात आपल्या देशाने खुप काही यश मिळविले आहे.

आपल्या देशाने सध्या विज्ञान तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण आरोग्य, संशोधन, क्रिडा, संरक्षण अशा असंख्य क्षेत्रात लक्षणीय यश मिळवले आहे. दिवसेंदिवस देश प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. आज आपल्या देशाकडे जगाला कवेत घेण्याची क्षमता आहे. आज आपण सर्वांनी नवनिर्माणाचा अनेक नव्या दिशा शोधल्या आहेत.

आज आपण खुप भाग्यवान आहोत की, आपण लोकशाही भारतात आनंदाने व एकोप्याने राहत आहेत. अनेक जाती धर्माचे, भाषांचे लोक भारतात एकोप्याने व गुण्या गोविंदाने एकत्र राहत आहेत. अमृत महोत्सवी वर्षे हा आपल्या देशासाठी खुप मोठा टप्पा आहे.

या निमीत्य भारत सरकारनेही अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आपल्या देशाच्या गौरवासाठी व तिरंगा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी, जन–जागृतीसाठी या वर्षी 'हर घर तिरंगा' हे अभियान १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवले जात आहे.

स्वातंत्र्यानंतर आपला देश सातत्याने स्वावलंबना च्या मार्गावर पुढे जात आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमीत्य सुरु झालेला 'आजादी का अमृत महोत्सव' हे स्वावलंबनाच्या दिशेने उचलेले एक महत्वाचे पाऊल आहे.

आपला भारत देश हा संतांची पावन भुमी असलेला देश आहे. तो नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द असा सुंदर देश आहे. आपण सर्वांनी मिळून या देशाला अधिक सामर्थ्यशाली देश बनवण्याचा प्रण करुया जगातील एक आदर्श देश म्हणून भारत देशाला कसे गौरवले जाईल हे पाहूया...

''देश माझा, मी देशाचा,
अभिमान वाढवेन भारताचा''

भारत भूमी

– स्वयंरचित कविता



कु. प्राची बुट्टीकर
बी.कॉम. भाग २

इथली माती आहे पावन,
इथे आहे सुख शांती,
इथेच पडले, भगवे रक्त,
इथेच घडली क्रांती....

हि भूमी आहे शुरांची,
हि भूमी आहे विरांची,
इथेच जन्मीले शिवबा,
आणि इथेच जन्मले ज्योती,
हि भूमी आहे शुरांची....

या भूमीत आहे प्रेमाचा गंध,
या भूमीत आहे आपलीच माणसं,
अशी हि विभीन्न भूमी आपली,
आहे हि भारत भूमी.....

करुया अर्पण या भूमीला,
करुणा समर्पण या भूमीला,
तुमचे, माझे जीवन सारे.....

या भूमीत आहे गंध प्रेमाचा,
जगात नाही दुसरा कुणाला,
या भूमीला करुया अर्पण
आपले हे देह, प्राण....



भारतीय स्वतंत्र लढ्यात विजयालक्ष्मी पंडीत यांचे योगदान



कु. साक्षी विठ्ठल काळे
बी.कॉम. भाग ३

पंडित जवाहरलाल नेहरू यांची बहीण विजयालक्ष्मी पंडित यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. १८ ऑगस्ट १९०० रोजी त्यांचा जन्म गांधी-नेहरू कुटुंबात झाला. त्यांचे बरेचसे शिक्षण घरीच झाले. त्यांनी १९२१ मध्ये काठियावाडचे प्रसिद्ध वकील रणजित सीताराम पंडित यांच्याशी विवाह केला. गांधीजींच्या प्रभावाखाली त्यांनी स्वातंत्र्य चळवळींना सुरुवात केली.

प्रत्येक कृतीत ती आघाडीवर असायची, तुरुंगात जायची, सुटका करायची आणि मग त्यात पुन्हा सामील व्हायची. भारतीय स्वातंत्र्य चळवळींना पाठिंबा दिल्याबद्दल त्यांच्या जोडीदाराला लखनौमध्ये पकडण्यात आले आणि तुरुंगात टाकण्यात आले आणि १ डिसेंबर १९९० रोजी त्यांचा मृत्यू झाला. ती भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांची धाकटी बहीण होती, ज्यांची मुलगी इंदिरा गांधी यांनी पंतप्रधान म्हणून काम केले. १३ वर्षे. १९५२ मध्ये, श्रीमती विजय लक्ष्मी यांनी ग्रामीण सभ्यता आणि संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी राजस्थानच्या बाडमेर जिल्ह्यातील बिसानिया या सांस्कृतिक गावात **'मालानी देलुओ की धानी'** या ऐतिहासिक दौऱ्याचे नेतृत्व केले.

विजयालक्ष्मी पंडित यांचे राजकीय जीवन :

विजयालक्ष्मी पंडित यांच्याप्रमाणेच राजकीय कुटुंबातून आल्या होत्या, त्यामुळे श्रीमती पंडित, त्यांना राजकारणातही रस होता. त्यामुळे त्या राजकारणात सक्रिय झाल्या. भारत सरकार कायदा, १९३५ देशात अस्तित्वात आला तेव्हा श्रीमती विजय लक्ष्मी पंडित यांची उत्तर प्रदेशच्या कॅबिनेट मंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली (संयुक्त प्रांत).

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी भारतीय संविधान सभेतही काम केले. याव्यतिरिक्त, १९५२ मध्ये, त्यांनी चीनला सदिच्छा मिशनचे नेतृत्व केले. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी राज्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९६२ ते १९६४ या काळात महाराष्ट्राच्या राज्यपाल म्हणून काम पाहिले. १९६४ मध्ये त्या फुलपूर लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आल्या.

विजयालक्ष्मी पंडित यांचे स्वातंत्र्य योगदान :

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनी त्यांच्या पतीसह भारतमुक्ती लढ्यात भाग घेतला, ज्यासाठी त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. राजकीय घडामोडींमध्ये त्यांचा नेहमीच सहभाग असायचा. १९४० ते १९४२ या काळात त्या अखिल भारतीय महिला परिषदेच्या अध्यक्षा होत्या.

महिलांसाठी काम :

विजयालक्ष्मी पंडित यांच्या पतीचे १९४४ मध्ये निधन झाले, तरीही त्यांना आणि त्यांच्या मुलींना त्यांचे घर सोडावे लागले. त्यांच्या पतीचा भाऊ संपूर्ण मालमत्तेवर राहत होता. सौ.विजय लक्ष्मी पंडित यांनी महिलांच्या हक्कांसाठी अतोनात लढा दिला, आणि स्वतःच्या कष्टातून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महिलांना त्यांच्या पतीचा वारसा आणि वडिलांची मालमत्ता मिळाली.

विजयालक्ष्मी पंडित विधानसभा सदस्य :

१९३७ च्या निवडणुकीत विजयालक्ष्मी उत्तर प्रदेश विधानसभेवर निवडून आल्या. शपथ घेतल्यानंतर त्या भारताच्या पहिल्या महिला मंत्री ठरल्या. भारतातील कॅबिनेट पदावर नियुक्त झालेल्या त्या पहिल्या महिला होत्या. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर मंत्रिपद सोडल्यानंतर विजयालक्ष्मी पंडित यांना पुन्हा एकदा तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगातून सुटल्यानंतर १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांना पुन्हा तुरुंगात टाकण्यात आले, परंतु आजारपणामुळे नऊ महिन्यांनंतर त्यांची सुटका झाली. १४ जानेवारी १९४४ रोजी रणजीत सीताराम पंडित या त्यांच्या पत्नीचे निधन झाले.

विजयालक्ष्मी पंडित यांचा मृत्यू:

विजयालक्ष्मी पंडित यांचा भारत आणि परदेशातील अनेक महिला गटांमध्ये सहभाग होता. गेल्या काही दिवसांपासून त्यांनी केंद्रातील काँग्रेस सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. विजयालक्ष्मी पंडित यांचे १९९० मध्ये निधन झाले.

माती को नमन वीरो को वंदन



गुलशन सिताराम बिडवाळ
बी.ए. भाग १

जन्म घेतला जिच्या पोटी
आई समान ही माय माती.

जन्मले येथे, वीर अनेक
रचल्या ज्यांनी वीर गाथा !
हीच आमची वीर भुमी
म्हणता हीला भारत माता !

डच आले, इंग्रज आले,
सत्ता गाजवत होते मुस्लीम
गांधी, सुखदेव, राजगुरु लढले,
समान कायदा देणारे भीम !

देशाची आमच्या मोठी थाट !
धर्मनिरपेक्षतेची पक्की गाठ,
सोनेरी किरणाची येथे पहाट,
भारतभूमी नटली जशी,
इंद्रधुनची रंगे सात !



मेरी माटी मेरा देश



प्रणित रमेशराव गावंडे
बी.एस्सी. भाग ३

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या अमृत महोत्सवाची सांगता सोहळ्याच्या निमीत्ताने 'माझी माती माझा देश' हे अभियान सुरु केले होते.

'मिट्टी को नमन–वीरों को वंदन' या घोषवाक्यासह 'मेरी माटी मेरा देश' या अभियानाची सुरवात भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते करण्यात आली आहे.

भारत छोडा अभियानाच्या वर्धापन दिनापासून म्हणजे ९ ऑगस्ट पासुन या मोहिमेची सुरुवार करण्यात आली असुन १५ ऑगस्ट पर्यंत राबविण्यात आले होते.

देशासाठी बलीदान दिलेल्या जवानांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी आणि त्यांना वंदन करण्यासाठी हे अभियान राबवण्यात आले होते.

माझी माती माझा देश या मोहिमेंतर्गत भारतातील विविध राज्यांतून ७५०० कलशांमध्ये माती आणली गेली असुन या मातीचा उपयोग दिल्लीच्या राष्ट्रीय युध्द स्मारकाजवळ अमृत वाटिका विकसी करण्यासाठी केला जाणार आहे. त्याचबरोबर दिल्लीत शिलाफलकाची स्थापना करण्यात येणार असून त्यावर देशातील शहीद जवानांची नावे कोरण्यात येणार आहेत.

आपल्या स्वातंत्र्यासाठी अनेक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहूती दिली. त्यापैकी काही स्वातंत्र्य सैनिक असे आहेत की, त्यांच्याबद्दल देशातील नागरिकांना माहिती नाही, अशा सर्व स्वातंत्र्य सैनीकांची माहिती या कार्यक्रमाद्वारे लोकांना दिली गेली

या अभियानामध्ये शिलाफलक, वसुधा वंदन, स्वातं –त्र्यवीर सैनिकांना वंदन, पंचप्राण प्रतिज्ञा, ध्वजारोहण, राष्ट्रमान यासारख्या अनेक उपक्रमांतुन क्रांतीकारण व आपल्या मातीविषयी जनजागृती केली गेली. अशाप्रकारे हे अभियान संपूर्ण देशभर राबवण्यात आले. या अभियानातील महत्वाचे उपक्रम थोडक्यात खालीलप्रमाणे विश्लेषित केले आहे.

१) शिलाफलक :

या उपक्रमांतर्गत शहर/गावातील संस्मरणीय अशा ठिकाणी महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपंचायत /शाळा/ कॉलेज इ.) शिलाफलकाची उभारणी करण्यात येणार आहे.

२) वसुधा चंदन :

यामध्ये शहरातील योग्य ठिकाण निवडून वसुधा चंदन म्हणून ७५ देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करून अमृत वाटिका करण्यात येत आहे.

३) स्वातंत्र्यसैनिक, वीरांना वंदन :

स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ज्यांनी देशासाठी स्वातंत्र्यासाठी व मातृभूमीच्या सुरक्षेसाठी बलिदान केलेल्या सेवानिवृत्त जवान, पोलीस दल, स्वातंत्र्यसैनिक यांच्या परिवारातील सदस्य यांचा कार्यक्रमावेळी स्थानिक पध्दतीनुसार सन्मान करण्यात येणार आहे.

(४) पंच प्रण (शपथ घेणे) :

स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेच्या स्तरावरील लोकप्रतिनिधी, सर्व अधिकारी व कर्मचारी, तसेच शहरवासिय पंच प्रण/शपथ घेतील. हातात दिवे लावून शपथ घेण्यासाठी दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत असलेल्या बचतगटाच्या माध्यमातून तयार केलेल्या मातीचे दिवे खरेदी करण्यात येणार आहेत.

५) ध्वजारोहण कार्यक्रम :

स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील (अमृत सरोवर / शाळा/कार्यालय) यापैकी एका योग्य ठिकाणी कार्यक्रम घेऊन राष्ट्रगीत गायन व तिरंगा फडकविण्यात येणार आहे. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, युवक मंडळ, महिला बचत गट, सर्व नागरिक यांचा सहभाग घेण्यात येणार आहे.

या अभियानात जनसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी https://merimaatimeradesh.gov.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून, नागरिक माती किंवा मातीचा दिवा हाती धरून काढलेला सेल्फी या संकेतस्थळावर अपलोड करता येणार आहे. या कृतीतून भारताला विकसित देश बनविणे, गुलामगिरीची मानसिकता दूर करणे, आपल्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगणे, एकता व बंधुता टिकवून ठेवणे, आदर्श नागरिकाची कर्तव्ये पार पाडणे आणि देशाचे रक्षण करणाऱ्याप्रती आदर व्यक्त करणे असे अनेक हेतू आहेत.

भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी



कु. मनिषा अरुण डफडे
बी.कॉम. भाग ३

एखाद्या घटनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्यास अमृत महोत्सव साजरा केला जातो. हे आपणांस माहितच आहे. भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि २०२२ मध्ये स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाले. त्यामुळे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला गेला. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' चा अधिकृत प्रवास १२ मार्च २०२१ रोजी सुरु झाला. आपल्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापण दिनाच्या ७५ आठवड्यांच्या काउंटडाऊनला सुरवात झाली आणि एक वर्षानंतर १५ ऑगस्ट २००२३ रोजी हा सोहळा संपन्न झाला. देशातील तमात जनतेच्या मनात देशाबद्दल आदर आणि अभिमान जागृत होण्यासाठी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. देशातील समस्या आणि कार्यक्षमता जनतेसमोर ठेवण्यासाठी यावेळी अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

एकेकाळी आपल्या देशात पतंजली, शंकराचार्य यांसारखे महान विचारवंत. चरक, सुश्रुत यासारखे वैद्यकीय चिकीत्सक, आर्यभट, विरामीहिर यासारखे महान गणितज्ञ होवून गेले. एकेकाळचा विश्वाचा गुरु असलेला आपला देश, त्याचा वैभवशाली संपन्न असा वारसा समजुन हा स्वातंत्र्याच्या महाउत्सव आपण साजरा केला आहे. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रवादाचा उदय झाला. महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, वीर सावरकर अशा महान नेत्यांच्या नेतृत्वाखाली आपल्या देशाचा स्वातंत्र्य लढा लढला गेला. हजारो स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रयत्नामुळे आणि बलीदानामुळे स्वातंत्र्य साकार झाले. भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या रोमांचक इतिहासा बद्दल जाणून घेण्यासाठी आणि नव्या भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण हा आपल्या देशाचा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवा निमीत्त अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.२ लाखांहून

अधिक कार्यक्रम राबविण्यात आले. त्यापैकी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या कार्यक्रमाची सांगता म्हणून 'मेरी माटी, मेरा देश' या मोहिमेची कल्पना करण्यात आली. 'मेरी माटी मेरा देश' अभियानाला ९ ऑगस्ट २०२३ रोजी सुरुवात झाली. या अंतर्गत देशाच्या स्वातंत्र्य दिनापर्यंत म्हणजेच १५ ऑगस्ट पर्यंत नियोजीत कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. यानंतर १६ ऑगस्टपासुन आयोजित केले दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० ऑगस्ट रोजी कर्तव्य पथावरील आझादी का अमृत महोत्सवाच्या समारोपाच्या निमीत्ताने एका भव्य कार्यक्रमाला संबोधित केले. या कार्यक्रमात ७५०० गावातील माती खास कलशात आणली गेली.

भारत देश आज जगात सर्वात मोठी लोकशाही असलेला महासत्ता देश आहे. देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेकांनी बलीदान दिले. स्वातंत्र्यलढ्यात अनेक क्रांतीकारी स्वातंत्र्य सैनिक समाजसुधारक ज्ञात–अज्ञात देशवासियांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या त्यागामुळेच स्वातंत्र्याची पहाट उगवली.

आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत असतांनाच त्यांच्या या त्यागाचे स्मरण करणे आपले सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांनी घोषित केलेल्या 'मेरी माटी मेरा देश' या अभियानाच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या सर्वस्व गमावलेल्या बलिदान दिलेल्या त्या सर्व ज्ञात–अज्ञात देशविरांप्रती नतमस्तक होण्याची, अभिवादन करण्याची संधी आपल्या प्रत्येकाला मिळाली आहे. स्वातंत्र्य सैनिकांचे बलीदान व्यर्थ जाऊ न देता त्यापासुन प्रेरणा घेऊन देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्यासाठी प्रत्येक भारतीयाला उदयुक्त करणारा हा उपक्रम आहे. ज्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणांची आहुती दिली, त्यांचे स्मरण करण्याचा हा उपक्रम आहे. ज्यांनी मिळालेले स्वातंत्र्य अखंड, अबाधित ठेवण्यासाठी प्राण खर्चिले त्यांना सलाम वंदन प्रणाम करण्याचा त्यांच्या प्रति नतमस्तक होण्याचा त्याचबरोबर भावी पिढीमध्ये देशभक्तीची ज्योत प्रज्वलित होण्यास मदत होईल. या माध्यमातुन देशभक्तीचा ध्येयवाद रुजविला जाईल.

सरकारने 'एक भारत, श्रेष्ठ भारत' या भावनेने दिल्ली आणि ७५०० गावांमध्ये देशी आणि स्थानिक



वनस्पतींचे उद्यान उभारण्यासाठी वसुधा चंदन यामध्ये शहरातील योग्य ठिकाण निवडून वसुधा चंदन म्हणून ७५ देशी वृक्षांच्या रोपांची लागवड करुन अमृत वाटीका करण्यात आली. ज्यांनी देशासाठी स्वातंत्र्यासाठी व मातृभुमीच्या सुरक्षेसाठी बलीदान केलेल्या सेवानिवृत्त जवान, पोलीस दर, स्वातंत्र्य सैनिक, शुरविरांना श्रध्दांजली 'मिट्टी को नमन, वीरों को वंद' हे मेरी माटी मेरा देश या अभियानाचे मुख्य घटक आहेत. गावांत एक युध्द स्मारक असले ज्यामध्ये सशस्त्र दल, निमलष्करी दल आणि पोलीसांच्या शहिदांची नावे कोरली गेली.

एकुणच भारतीय स्वातंत्र्याची गाथा भावी पिढीला माहिती होण्यासाठी हे अभियान राबविले गेले.

''मेरे देश की माटी मेरा अभिमान,
उसकी गलीयों में है अनोखा प्यार,
मेरा भारत मेरा सम्मान !!''

तिरंगा हमारी शान



कु. दामिनी गजानन घाटगे
बी.कॉम. भाग २

भारतात १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेस स्थापन झाली असली तरी तिने राष्ट्रीय निशान १९२१ सालापर्यंत स्विकारले नव्हते. मादाम कामा या राष्ट्रभक्त भारतीय महिलेने २२ ऑगस्ट १९०७ रोजी जर्मनी मध्ये स्टगार्ट येथे भरलेले समाजवाद्यांच्या जागतिक मेळाव्यात स्वकल्पनेने तयार केलेले एक तिरंगी निशाण भारताचा राष्ट्रध्वज म्हणून सादर केले.

या निशाणात हिरवा, केशरी व तांबडा असे तीन आडवे पट्टे होते. भारताचे राष्ट्रीय फुल समजल्या जाणाऱ्या कमळाची आठ चित्रे हिरव्या पट्ट्यात, वंदे मातरम् ही अक्षरी केशरी पट्ट्यात आणि हिंदू मुस्लिमांची प्रतीके म्हणून अनुक्रमे सुर्य व चंद्र यांची चित्रे तांबड्या पट्यात, असा या ध्वजाच्या एकूण साज होता. अशा प्रकारच्या ध्वज खुद भारतात मात्र कधीच वापरला गेला नाही.

१९१६ साली होमरुल चळवळीचे भूखंड म्हणून ॲनी बेझंट, लोकमान्य टिळक आदींना अटकेत ठेवले असतांना त्यांनी पाच तांबडे व चार हिरवे पट्टे असलेला वरच्या डाव्या कोपऱ्यात युनियन जॅक, त्याखाली सात तारे व उजवीकडे चाँद अशी चिन्हे धारण करणारा राष्ट्रध्वज तयार करुन फ डकविला. सरकारी अधिकाऱ्यांनी अर्थातच तो फ ाडून टाकला.

१९१७ सालच्या कलकत्ता काँग्रेसमध्ये अधिकृत राष्ट्रध्वज ठरविण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. त्यानंतर १९२० पर्यंत काँग्रेसच्या अधिवेशनात ध्वजा बद्दल चर्चा होऊनही निश्चित निर्णय झाला नाही. त्यानंतर गांधीजींच्या पुढाकाराने या प्रश्नाला निश्चित चालना मिळाली. यंग इंडिया, हरिजन या नियकालीकातून त्यांनी वेळोवेळी लेख लिहून राष्ट्रध्वजाबाबत मतप्रदर्शन केले.

राष्ट्रध्वजातील रंगांचा अर्थ :–

मच्छलीपटनम् शहरातील एक प्राध्यापक पी. व्यंकय्या यांनी गांधीजीच्या सुचनेप्रमाणे ध्वज तयार केला. जलदंरने लाला हंसराज यांनी सदर ध्वजावर चरखा असावा अशी केलेली सुचना गांधीजींना व इतरांना अर्थपूर्ण वाटली. हा तिरंगी ध्वज खादीचा असुन त्यात तांबडा, हिरवा, पांढरा या रंगाचे आडवे पट्टे व त्यावर गर्द निळ्या रंगाचा चरखा होता.

सर्व धर्मीयांच्या एकतेचे प्रतीक असा हा झेंडा असा त्याच्या अर्थ लावण्यात आला. हिंदूचा तांबडा, मुसलमानांचा हिरवा आणि इतरांच्या पांढरा अशी रंगांची वाटणी होती. रंगांना जातीय स्वरुप आल्याने शिखांनी आपला प्रतिनिधी म्हणून काळ्या रंगांचाही पट्टा असावा अशी जाहीर मागणी केली, ती मान्य मात्र झाली नाही.

१९२१ पासून ध तिरंगा स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय निशाण म्हणून पुढे आला. नागपूर व इतरत्र झालेले ध्वज सत्याग्रह खुप गाजले. १९३१ साली केशरी, पांढरा, हिरवा हे रंगपट्टे धर्माचे द्योतक नसुन ते त्याग–धैर्य, सत्य शांतता, प्रेम विश्वास या गुणांची प्रतिके आहेत, असे जाहीर करण्यात आले.

अशोक चक्राचा अर्थ :–

भारताचा राष्ट्रध्वज संविधान समितीने २२ जुलै १९४७ रोजी निश्चित केला. त्या संबंधीचा ठराव पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मांडला. एकाला एक लागुन असलेल्या आडव्या समान प्रमाणाच्या तीन पट्यांचा तो आहे. वरती गर्द केशरी, मध्यभागी पांढरा आणि खालच्या बाजूला गर्द हिरवा, अशा क्रमाने हे तीन रंग आहेत.

मधल्या पांढऱ्या पट्ट्यांवर निळ्या रंगांचे धर्मचक्र असुन ते सारनाथ येथे आढळलेल्या सिंहमुद्रेवर असलेल्या अशोक चक्रासारखे आहे. चक्राला २४ आरे आहेत. डॉ. एस. राधाकृष्णन यांनी भारतीय राष्ट्रध्वजाच्या एकूण रचनेचे महत्व चांगल्या प्रकारे विशद केले आहे. त्यांच्या विवेचना प्रमाणे केशरी रंग किंवा भगवा रंग हा त्यागाचा द्योतक आहे. पांढरा प्रकाशचा आणि सत्यमार्गाचा प्रतिनिधी आहे. हिरवा रंग मानवाचे निसर्गांशी व भूमीशी असलेले नाते दर्शवितो.

धर्म आणि सत्य हे भारताच्या राष्ट्रध्वजाखाली काम करणाऱ्याचे रास्ते असावेत जीवन गतीमान असावे व भारतीयांनी शांततापूर्णतेने आगेकुच करावी. असे धर्मचक्र दर्शविते. मुलतः हे चक्र विश्वशांतीचा संदेश देणाऱ्या बौध्द धर्माचे धर्मचक्र आहे. त्याला अशोक चक्र या नावाने ओळखले जाते. त्यात भारतीय कला, तत्वज्ञान, इतिहास व संस्कृती यांचा सुरेख संगम झालेला दिसतो. धर्मचक्र प्रवर्तनाय हे घोषवाक्य भारतीय संसद सभापतीच्या स्थानाच्या शिरोभागी लिहीलेले आहे. राष्ट्रध्वजांना द्यावयाचा मान त्यांच्या वापराबद्दलचे नियम : राष्ट्रीय शोक आनंद स्वागतेप्रसंगी तो कसा उभारतात आदींबद्दलचे संकेतही निश्चित केले जातात.

मेरा भारत महान

''भारत देशाची वाढवा शान आणि मान
कारण आपला भारत देश आहे महान''



कु. चंचल संजय देवकते
बी.कॉम. भाग ३



जय घोष स्वातंत्र्यदिनाचा
अभिमान गौरवशाली भारताचा
सोहळा हा भारत देशाच्या स्वातंत्र्याचा
अमृत महोत्सवी वर्षाचा....

आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य झाला. आज आपला भारत देश १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आनंदाने साजरा करीत आहे. ही गोष्ट प्रत्येक भारतीयांसाठी खुप गौरवाची व अभिमानाची आहे. आपला भारत देश सुमारे १५० वर्षे पारतंत्र्यात होता व त्यातून मुक्तेसाठी त्याने केलेला संघर्ष खुप मोठा व कठीण होता. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महान स्वातंत्र्य सैनिकांनी आपले अमृत योगदान दिले. आज या अमृत महोत्सवी वर्षात आपल्या देशाने खूप काही यश मिळविले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रेरणेचे अमृत स्वातंत्र्यच्या अमृत महोत्सव साजरा करण्याचे उद्दिष्टये भारत २०४७ साठी एक व्हिजन तयार करणे आहे. भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य लढ्याची माहिती व्हावी या महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ही आपल्या स्वातंत्र्य सैनिकांना आणि स्वातंत्र्य चळवळीला दिलेली श्रध्दांजली आहे.

आपल्या देशाने सध्या विज्ञान–तंत्रज्ञान, कृषी, उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण, आरोग्य, संशोधन, क्रिडा, संरक्षण अशा असंख्य क्षेत्रात लक्षणीय यश मिळविले आहे. दिवसेंदिवस देश प्रगतीकडे वाटचाल करीत आहे.

आज आपण खुप भाग्यवान आहोत की, आपण लोकशाही भारतात आनंदाने व एकोप्याने राहत आहोत. अनेक जाती धर्माचे भाषांचे लोक भारतात एकोप्याने व गुण्या गोविंदाने एकत्र राहत आहेत. अमृत महोत्सवी वर्ष हा आपल्या देशासाठी खुप मोठा टप्पा आहे. यानिमीत्त भारत सरकारने ही अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. आपल्या देशाच्या गौरवासाठी व तिरंगा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी जन जागृतीसाठी या वर्षी 'हर घर तिरंगा' हे अभियान १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवले जात आहे.

स्वातंत्र्याचा ७५ व्या वर्धापन दिनानिमीत्त भारत सरकारद्वारे आयोजित केलेला कार्यक्रम आहे. या वर्धापन दिनानिमीत्त सुरु झालेला 'आजादी का अमृत महोत्सव' हे स्वालंबनाच्या दिशेत उचलेले एक महत्वाचे पाऊल आहे.

आपला भारत देश हा संताची पावन भूमी असलेला देश आहे. आपण सर्वांनी मिळून या देशाला नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द असा सुंदर देश आणि अधिक सामर्थ्यशाली देश बनवण्याचा प्रयत्न करु हा प्रण घेऊया.

जगातील एक आदर्श देश म्हणून भारत देशाला कसे गौरवले जाईल हे पाहूया.....

''गौरव हा भारताच्या अभिमानाचा
सोहळा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा''

''हुतात्म्यांना वंदन करुया...
स्वातंत्र्याचे जतन करुया...
भारत देशाला प्रगतीपथावर नेऊया
अमृत महोत्सव साजरा करुया...''

'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव चला करु साजरा
देऊ हर घर तिरंगा, घर घर तिरंगाचा नारा'



स्वातंत्र लढ्यातील महात्मा गांधीचे योगदान



कु. अक्षदा सुभाष पवार
बी.ए. भाग ३

मोहनदास महात्मा होवून या जगात झाले अमर
भारतभूच्या अस्तित्वासाठी लढले स्वातंत्रसमर....

भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून भारतमातेच्या यज्ञकुंडात अनेक महात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यापैकीच एक तेजस्वी आणि ओजस्वी व्यक्तीमत्व म्हणजे राष्टपिता महात्मा गांधी. सत्य आणि अहिंसा हाच माझा धर्म आहे. सत्य हा माझा देव आहे आणि अहिंसा ही त्या देवाची आराधना आहे असे म्हणणारे महात्मा गांधी खऱ्या अर्थाने सत्य आणि अहिंसेचे पुजारी होते. हाच विचार घेऊन महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उतरले. त्यांनी या लढ्यात अहिंसेला शस्त्र बनवले आणि सत्याला ढाल बनवली. या दोन शस्त्रांचा पाडाव ब्रिटीश शेवटपर्यंत करु शकले नाही.

गांधींजींचे देशांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदान महत्वपूर्ण आहे. नव्हे तर त्यांच्याशिवाय भारतीय स्वातंत्र्य लढा पूर्ण होऊच शकत नाही. त्यांनी स्वातंत्र्याचा लढा जनसामान्या पर्यंत नेवून पोहोचविला आणि जन आंदोलन उभे केले. म्हणून भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील व्यापक अशा जन आंदोलनाचे जनक गांधीजींना म्हणायला हरकत नाही. स्वातंत्र्य काळात सामान्य माणसांवर गांधीजींचा जितका प्रभाव होता तितका प्रभाव समकालीन कोणत्याही नेत्याचा नव्हता. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्याचे श्रेय गांधीजींनाच दिले जाते.

गांधीजींनी आपल्या वागण्यांतून बोलण्यातून सामान्य माणसात आपली प्रतिमा तयार केली. त्यांचे बोलणे सामान्य माणासाच्या हृदयाला भिडणारे होते. त्यामुळे त्यांचा प्रभाव सामान्यातील सामान्य माणसांवर पडला. एवढेच नव्हे तर अनेक देशातील स्वातंत्र्य चळवळींना गांधीजींच्या विचारांची प्रेरणा आहे. आजही जगभरातील विचारवंतांना गांधींजीच्या तत्वज्ञानाबद्दल प्रचंड उत्सुकता आहे. गांधीजींच्या चळवळीच्या केंद्रस्थानी सामान्य माणुस कायम राहीला. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या तीन गोष्टीच्या माध्यमातून सामान्या माणसाला अहिंसक लढ्यासाठी गांधीजीने तयार केले. गांधीजींनी आपल्या कार्याची सुरुवात दक्षिण अफ्रिकेत केली. त्या ठिकाणी त्यांनी गोऱ्या लोकांच्या वर्णद्वेष विरोधात सत्याग्रह केला. त्यानंतर गांधीजी १९१५ मध्ये भारतात आले. संपूर्ण भारतभर यात्रा केली. एकुण परिस्थितीचा अभ्यास केला आणि खऱ्या अर्थाने १९१७ मध्ये गांधीजींनी चंपारण्या सत्याग्रह करुन आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यास सुरुवात केली. बिहारमध्ये नील पिकवण्याऱ्या शेतकऱ्यांवर तेथील इंग्रज मळेवाले निळ लावण्याची सक्ती करत होते. चंपारण्यातील शेतमजुरावर इंग्रज मळेवाले अन्याय करत होते. या अन्यायाला वाचा फोडाण्याचे काम गांधीजींनी सत्याग्रह करुन केले. १९१८ मध्ये अहमादाबाद येथे गिरणी कामगारांवर खुप अन्याय करत होते. या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम गांधीजींनी केले.

त्याचबरोबर १९१८ मध्ये खेडा सत्याग्रह केला. गुजरातमधील खेडा गावी शेतकऱ्यांच्या शोषणांविरुध्द गांधीजींनी सत्याग्रह पुकारला त्यामुळे तेथील जुलमी लोकांनादेखील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण कराव्या लागल्या. इंग्रज सरकारने १९१९ मध्ये माँटेग्यु चेम्सफोर्ड अन्यायकारक कायदा भारतीय लोकांवर लादला. भारतीय जनतेची गळापेची करणारा हा अन्यायकारक कायदा रद्द केला पाहिजे. नव्हेतर रद्द करणारच अशी शपथ गांधीजींनी घेतली व या कायद्याचा विरुध्द सत्याग्रह केला. आपलय देशात हे कार्य करत असतांनाच गांधीजींनी देशा बाहेरील चळवळींना सहकार्य केले.

त्यामध्ये खिलापत चळवळीला पाठींबा दिला. यानंतर महात्मा गांधीनी एक देशव्यापी चळवळ उभी करण्याचे ठरवलं आणि इथुनच खऱ्या अर्थाने जनआंदोलनाला सुरुवात झाली. महात्मा गांधीजींनी असहकार चळवळ सुरु केली. या चळवळी अंतर्गत बिटीशांच्या शाळा, महाविद्यालय, न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. भारतीय लोकांनी ब्रिटींशांच्या नोकऱ्या सोडून देणे, परदेश मालावर बहिष्कार, स्वदेशीचा स्विकार अशा कितीतरी गोष्टीला असहकार चळवळीत प्राधान्य देण्यात आले. त्यातच उत्तर प्रदेशातील चौराचौरी या ठिकाणी ०५.०२.१९२२ रोजी एका मिरवणूकीवर गोळीबार केला. गोळीबार केल्यामुळे उठावाले संतप्त झाले. त्यांनी पोलीस कचेरीवर हल्ला करुन पोलीस स्टेशनला जाळून खाक झाले. ही बातमी महात्मा गांधींच्या कानी पडली तेव्हा गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतली. सोबतच या चळवळची शेवट झाला.



लाला लजपत राय यांची स्वातंत्र्य संग्रामातील भूमिका



कु. काजल सुधाकर कांबळे
बी.कॉम. भाग ३

आणि याच कारणावरून गांधीजींना ६ वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. सुटका झाल्यानंतर गांधीजींनी पुन्हा आपले कार्य जोमोने सुरु केले. कायदा मोडायचा आणि इंग्रजांचा विरोध करायचा म्हणजेच कायदा मोडून इंग्रजांना विरोध करणे. यासाठी कायदेभंग ही चळवळ सुरु केली. दि. १४.०२.१९३० रोजी राष्ट्रीय सभेने जनतेला सविनय कायदाभंग करण्यासाठी आदेश दिला. यात गांधीजींनी पुढाकार घेवूनप १२ मार्च १९३० या दिवशी साबरमती आश्रमातुन आपल्या ७८ निष्ठावंत कार्यकर्त्या सोबत दांडी यात्रा काढली. दि. ०५ एप्रिल रोजी दांडी येथे पोहोचले व त्याठिकाणी जावून मिठाचा कायदेभंग केला. अशा अनेक चळवळीतुन महात्मा गांधींनी भारतीय स्वातंत्र्याचा पाया भक्कम तयार केला. गांधीजी घराघरात जावून पोहोचले. गांधीजींनी १९४२ रोजी ब्रिटींशांनी हाकलून देण्यासाठी चले जाव हे आंदोलन सुरु केले. भारतीय जनतेला संदेश दिला की करा किंवा मरा. हा संदेश ऐकुण संपूर्ण भारत देश पेटून उठला सामान्य माणुस या आंदोलनात सहभागी झाला. चले जाव आंदोलन यशस्वी झाले. त्यानंतर काही दिवसातच भारतात स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटीशांनी कबुल केले. त्यातुनच दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला.

गांधीजीनी भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून स्वातंत्र्याची चळवळ जनसामान्यपर्यंत पोहचवली. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सामान्य माणुस पेटून उठला. मोठ्या प्रमाणात जनआंदोलने उभी केली. हा महात्मा भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आयुष्यभर चंदनाप्रमाणे झिजला. शेवटच्या क्षणापर्यंत राष्ट्रीय एकात्मतेसाठी लढला. अखंड भारत गांधीजींचे स्वप्न होते. राष्ट्रीय एकात्मता हे गांधीजींचे ध्येय होते. या ध्येयाचा पाठलाग गांधीजींनी शेवटच्या श्वासापर्यंत केला. आजही त्यांच प्रत्येक कृतीतुन सामान्य माणसाला जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. असा थोर महात्मा ३० जानेवारी १९४८ रोजी एका माथेफिरुच्या गोळीचा बळी ठरला.

आज महात्मा गांधी नसले तरी त्यांचे विचार आणि तत्वज्ञान आजही अमर आहे.

भारतभूमी ही नेहमी पासूनच वीरांची भूमी आहे. भारताच्या स्वतंत्र्य लढ्यात असे अनेक वीर होवून गेलेत ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणाची पर्वा न करता बलिदान दिले. असेच एक वीर होते पंजाबचे सिंह लाला लजपत राय. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लाला लजपत राय. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लाला लजपत राय हे असे स्वातंत्र्य सैनिक होते ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. लाला लजपत राय यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ रोजी पंजाब मधील धुडीके येथे झाला. जो आजच्या पाकीस्तानात आहे. त्यांचे वडील लाला राधाकृष्ण अग्रवाल हे प्राध्यापक आणि प्रसिध्द उर्दु लेखक होते. आणि त्यांची आई गुलाब देवी यांनी लहानपासूनच त्यांच्या मध्ये देशभक्ती आणि सामाजिक सुधारणेची मूल्ये रुजवली. लाला लजपत राय यांची लहानपासूनच वाचन व लेखनात रुची होती.

लाला लजपत राय यांच्या आयुष्यातील या प्रारंभिक वर्षांनी स्वातंत्र्य लढ्यातील त्यांच्या नंतरच्या सहभागाचा आणि भारतीय समाजाच्या सुधारणेसाठी त्यांच्या बांधिलकिचा पाया घातला. लाला लजपत राय यांचे प्रारंभिक शिक्षण लाहोरमध्ये झाले आणि ते इंग्लंड मध्ये कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी गेले. लंडनमधील त्यांच्या काळात त्यांना स्वातंत्र्य आणि लोकशाहीच्या कल्पना समोर आल्या ज्यामुळे त्यांच्या राजकीय विश्वासांवर खूप प्रभाव पडेल. भारतात परतल्यावर त्यांनी स्वतःला एक वकील म्हणून स्थापित केले आणि लवकरच भारतीय राष्ट्रवादाच्या चळवळीत सक्रियपणे भाग घेण्यास सुरुवात केली. नागरी–हक्क,शिक्षण आणि सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला.

लाला लजपत राय स्वातंत्र्य संग्रामातील भूमिका –

लाला लजपत राय यांचे भारतीय लढ्यातील योगदान बहु आयामी होते.ते एक विपूल लेखक, कुशल वक्ते आणि कटीबध्द राष्ट्रवादी होते. ज्यांनी बाल गंगाधर टिळक, बिपीन चंद्र पाल आणि महात्मा गांधी यांसारख्या प्रमुख नेत्यासोबत भारतीय स्वातंत्र्याचे ध्येय पुढे नेण्यासाठी काम केले.

लाला लजपत राय यांच्या जीवनातील सर्वात महत्वाची घटना म्हणजे १९२८ मध्ये सायमन कमिशनच्या विरोधात त्यांनी केलेला निषेध. घटनात्मक सुधारणांवर चर्चा करण्यासाठी ब्रिटीश सरकाने स्थापन केलेल्या आयोगामध्ये भारतीय सदस्य नव्हते. भारतीय प्रतिनिधीत्वाच्या या उघड अवहेलनामुळे राय चिडले. लाहोरमध्ये आयोगाच्या विरोधात आंदोलनादरम्यान पोलीसांनी निदर्शकांवर लाठीचार्ज केल्याने ते गंभीर जखमी झाले.

आपल्या लाडक्या नेत्याच्या अपमानाने लोक संतप्त झाले. त्याच दिवशी संध्याकाळी मोरी गेटबाहेर मोठी सभा झाली. लाला लजपत राय जखमी आणि वेदनेने ग्रासले असले तरी त्यांचे शब्द ऐतिहासिक ठरले. ते म्हणाले, 'माझ्यावर होणारा प्रत्येक प्रहार हा ब्रिटीश साम्राज्या–वादाच्या शवपेटीतील एक खिळा आहे. मी राहील की नाही हे मला माहीत नाही, परंतू तुम्ही कधीही काळजी करु नका, माझ्यानंतरचा माझा आत्मा तुम्हाला स्वातंत्र्यासाठी आणखी बलीदान देण्यास उपयुक्त करत राहील'.

त्याच्यावर झालेल्या जखमांचा परिणाम त्याच्या वृध्दत्वाच्या शरीरावर झाला. ताप आणि वेदनातून ते बरे झाले असले तरी त्यांच्या तब्येतीला कायमचा धक्का बसला होता. वसाहतवादी सरकारच्या वृत्तीने आगीत आणखीनच भर पडली. या धक्याने त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली. येणाऱ्या घटना आधी सावल्या टाकतात. असे खरच म्हटलं जातं. वसाहतवादी अधिकाऱ्यांनी बेदम मारहाण केल्यामुळे जवळ जवळ अडीच आठवड्यानंतर १७ नोव्हेंबर १९२८ रोजी लालाजींना आपला जीव गमवावा लागला. दूरदूरवरुन नेत्याला श्रध्दांजली वाहण्यात आली. या दुःखद घटनेच्या पाश्वभूमीवर लाला लजपत राय यांच्याशी संबंधित सर्वात प्रसिध्द नारेबाजीचा जन्म झाला.

राजकीय संघर्षातील त्यांच्या भूमिकेव्यतिरिक्त लाला लजपत राय हे सामाजिक सुधारणेचे कट्टर समर्थक होते. त्यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले. जातीय भेदभावाविरुध्द लढा दिला आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केले. ही तत्वे आणि विश्वास अनेकदा त्यांनी त्यांच्या भाषणात आणि लेखनात वापलेल्या घोषणांमध्ये अभिव्यक्ती आढळतात.

'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिल में है', 'सायमन गो बॅक', 'स्वदेश अपनाओं', 'देश प्रेम में खिलते है रंग, दुनिया तुमको करे बंग', लाला लजपत राय यांनी घोषणेचा उपयोग तरुणांना आणि जनतेला स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी केला.

घटनाक्रम ईस्ट इंडीया कंपनी ते स्वातंत्र्य



दुर्गादास रोहिदास चव्हाण
बी.ए. भाग ३

१६०० – ब्रिटीश ईस्ट इंडीया कंपनीची स्थापना
१६०८ – हेक्टर नामक पहिले जहाज सुरतमध्ये प्रवेश
१६११ – ब्रिटीशसांनी मछिलिपटनम येथे पहिला कारखाना स्थापन केला.
१६१२ स्वैलीच्या लढाईत ब्रिटीशांची पोर्तुगीजवर मात व व्यापारी चौकी स्थापन
१६१४ – सर थॉमस रो यांनी विस्तारीत व्यापार
१६१८ – हक्कांसाठी दबाव आणण्यासाठी जहाँगीरा च्या दरबारात मुक्काम
१६१५ – सर थॉमस रो यांनी जहाँगीरशी युरोपातील चैनीच्या वस्तुंच्या बदल्यात व पोर्तुगीज सागरी सामर्थ्यांपासून नौदलाच्या संरक्षणासाठी व्यावसायिक करार.
१६३८ – गुजरातमधील सुरत येथे ईस्ट इंडिया कंपनीचे ट्रेडींग पोस्ट मुख्य आस्थापना बनले.
१६४० – ईस्ट इंडिया कंपनीची मद्रासमध्ये व्यापारी चौकी स्थापन
१६६१ – पोर्तुगीजांनी व्यापाराच्या प्रवेशासाठी मुंबईला इंग्लडकडे सुपूर्द
१६६४ – फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन
१६६८ – इंग्लंडने बॉम्बे ईस्ट इंडिया कंपनीला १० पाऊंड प्रति वर्ष भाड्याने दिले.
१६७४ – फ्रेंचांनी बंगालच्या उपसागरात पाँडीचेरीची स्थापना केली.
१६८७ ईस्ट इंडिया कंपनीने मुख्यालय सुरतहून मुंबईत हलवले.
१६९० ईस्ट इंडिया कंपनीने कोल्याकत्याला व्यापारी चौकी स्थापली.
१६९७ भारतातून आयात केलेल्या कापडाच्या निषेधार्थ लंडनच्या विणकरांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या मुख्यालयावर हल्ला.

१७५१ – रॉबर्ट क्लाईव्हने दक्षिण भारतात अर्कोटचा नवाब आणि त्यांच्या फ्रेंच मित्रांचा पराभव केला.

१७५७ – प्लासीच्या लढाईन रॉबर्ट क्लाईव्हने बंगालच्या नवाबाचा पराभव केला.
ईस्ट इंडीया कंपनीने बंगालचा ताबा घेतला, लाखो विस्थापित.

१७७३ – वॉरेन हेस्टिंग्स भारताचे पहिले गव्हर्नर जनरल.

१७७५–१७८२ पहिले ॲंग्लो–मराठा युध्द, मराठ्यांनी इंग्रजांचा पराभव केला आणि सालबाईचा तह झाला आणि जमीन मराठा राज्याला मिळाली.

१७८० – टिपू सुल्तानने पोल्लिलूरच्या लढाईत ईस्ट इंडीया कंपनीच्या सैन्यांचा पराभव केला.

१७८६ – सर विल्यम जोन्स यांनी इंडो–युरोपियन भाषा कुटूंब ओळखले, जे उत्तर भारतीय आणि युरोपीय भाषांमधील समान मूळ दर्शविते.

१७८७ – वॉरेन हेस्टींगवर भ्रष्टाचारासाठी खटला चालवला गेला आणि महाभियोग चालवला गेला.

१७९९ – टिपू सुलतानचा श्रीरंगपट्टनम येथे ईस्ट इंडीया कंपनीच्या सैन्याचा पराभव केला.

१८०३–१८०५ दुसरा ॲंग्लो–मराठा युध्द, ब्रिटीशांनी मराठ्यांचा पराभव केला आणि ईस्ट इंडीया कंपनीने आणखी जमीन घेतल्या, दिल्ली आणि आग्रा समेत.

१८१३ – चार्टर ॲक्ट १८१३ ने ख्रिश्ती मिशनरींना भारतात प्रवेश. शिक्षण यंत्रणा पुरवल्या आणि चहा वगळता ईस्ट इंडीया कंपनीचे व्यापरावरील एकाधिकार संपवले.

१८१७–१८१८ तिसरे ॲंग्रो मराठा युध्द, ब्रिटीशांचा मराठ्यांवर विजय. मराठा साम्राज्याचा अंत, बहुतांश भारत ब्रिटींशांच्या ताब्यात.

१८२८ – राजाराम मोहन रॉय यांनी कोलकाता येथे ब्राम्हो समाजाचा स्थापना धार्मिक आणि सामाजिक सुधारण्यासाठी केली.

१८३५ – भारतीय नागरीकांसाठी सिवील सर्व्हिस नोकरी भारतात उघडली.
थॉमस मेकॉलेची शिक्षण व्यवस्थाने पारंपारिक शिक्षणाची जागा घेतली.

१८३७ – ब्रिटीश सरकारने भारतीय इंडेटर्स लेबर सिस्टिमला औपचारिक बनवले.

१८४३ – ईस्ट इंडीया कंपनीच्या सैन्याने सिंध प्रदेश जिंकला.

१८४५–१८४६ पहिले ॲंग्लो–शीख युध्द इंग्रजांनी शिखांचा पराभव करुन पंजाब आणि संपूर्ण काश्मिरामध्ये बरीच जमीन मिळवली.

१८४८–१८४९ दुसरे ॲंग्लो–शीख युध्द इंग्रजांनी शिखांचा पराभव केला आणि उर्वरित पंजाब आणि एनडब्ल्यु फ्रंटियर ताब्यात घेतले. काश्मिर जम्मुच्या महाराजांना विकले.

१८५७ – सिपाही बंड किंवा भारताचे पहिले स्वातंत्र्य युध्द

१८५८ – ईस्ट इंडिया कंपनी विर्सजित झाली. भारतात ब्रिटीश राजची सुरुवात

१८७५ – स्वामी दयांद सरस्वती यांनी वैदिक परंपरेतील हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आर्य समाजाची स्थापना

१८७६ – राणी व्हिक्टोरियाने भारतीची सम्राज्ञी ही पदवी धारण केली

१८८३ – आनंदी गोपाळ जोशी कदाचित अमेरिकेतील पहिल्या भारतीय महीला पेन्सिल्व्हेनियाच्या महिला वैद्यकीय महाविद्यालयता उपस्थित राहण्यासाठी न्यूयॉर्कला आल्या.

१८८५ – पहिल्या भारतीय काँग्रेची बैठक मुंबईत झाली.

१८८८ – गुरुमाई करमारकर यांनी पेन्सिल्व्हेनियाच्या महिला महाविद्यालयात शिक्षण घेण्यास सुरुवात केली.

१८९८ – बाळ गंगाधर टिळकांनी स्वराज्याची मागणी केली 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच'

१९०० – ब्रिटनला भारताची चहाची निर्यात दरवर्षी १३७ दशलक्ष पौंडापर्यंत पोहोचली.

१९०१ – मोहनदास गांधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बैठकीत सहभागी होण्यासाठी दक्षिण अफ्रिकेतून भारतात आले.

१९०५ – बंगालची फाळणी लॉर्ड कर्झनद्वारे
स्वदेशी चळवळ आणि ब्रिटीश मालावर बहिष्कार

१९०६ – ढाक्यामध्ये मुस्लिम लीगची स्थापना

१९११ – भारताची राजधानी कोलकात्याहून दिल्लीला हलवले

१९१३ – रविंद्रनाथ टागौर यांना साहित्यासाठी नोबेल पारितोषिक मिळाले.

१९१५ – मोहनदास गांधी भारतात परतले.



१९१७ – गांधीनी साबरमती आश्रमाची स्थापना केली
१९१९ – अमृतसर येथे जालियानवाला बाग हत्याकांड
१९२० – मोहनदास गांधींनी सत्याग्रहाची मोहिम सुरु केली
१९२२ – गांधींना देशद्रोहाच्या आरोपाखाली अटक झाली व सहा वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा झाली.
१९२४ – गांधींची वैद्यकिय आधारावर तुरुंगातून सुटका झाली.
कोहाट दंगलीनंतर गांधींनी हिंदू–मुस्लिम ऐक्यासाठी २१ दिवसांचे उपोषण केले.
१९२९ – मदर तेरेसा कलकत्याला आल्या.
भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून जवाहरलाल नेहरुंची निवड
१९३० – भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने पूर्ण स्वराज्यासाठी आवाहन केले.
गांधीजींनी साबरमती आश्रमपासून ते दांडीपर्यंत मीठ मार्चचा पुढाकार केला. गुजरात मीठकराचा निषेध केला.
१९३१ – भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ध्वजाच्या केंद्रस्थानी चक्र स्विकारले.
१९४२ – भारत छोडो ठराव अखिल भारतीय काँग्रस कमिटीने पास केला आणि भारतभर सविनय कायदेभंग सुरु झाला.
१९४२ – सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली.
१९४४ – कस्तूरबा गांधी 'बा' यांचे निधन.
१९४७ – भारत स्वातंत्र्य घोषित केला. (१५ ऑगस्ट)

तू विश्वाहूनही सुंदर



दुर्गादास रोहिदास चव्हाण
बी.ए. भाग ३

माणूसकीचा धडा शिकविला
तू भारत देशा
परोपकाराचा दर्पण दाखविला
तू भारत देशा

तुझ्यामुळेच होते आम्हांला
आमच्या अस्तित्वाची जाण
अनेक रत्न पाचुंची
तू समृध्द अशी खाण

नाना आशावादी शिंपल्यांचा
तू आहेस विशाल समुंदर
नम्रता या श्रेष्ठ गुणाने
तू विश्वासहूनही सुंदर

जन्मदात्री सम पुजतो
तुला हे भारत माता
तूच आमची वाली
अन् तूच आमची त्राता

मेरी झांसी नही दुंगी...!





कु. ऋतुजा राधेशाम सोळंके
बी.कॉम. भाग ३

''मैदान-ए-जंग में मरना है,
फिरंगी से नहीं डरना है,
कहती राणी लक्ष्मीबाई,
यह वादा पुरा करना है।''

राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म मोरोपंत तांबे आणि भागीरथीबाई यांच्या पोटी उत्तर प्रदेशातील काशी येथे १९ नोव्हेंबर १९२८ झाला. बालपणी त्यांना प्रेमाने मनु म्हटले जाई. त्यांचे वडील मोरोपंत तांबे बिठूर न्यायालयात पेशवा होते. लक्ष्मीबाईचे वडील आधुनिक विचारसरणीचे होते. लक्ष्मीबाई अवघ्या ४ वर्षाच्या असतांना त्यांच्या आई भागीरथीबाई यांचे निधन झाले. त्यामुळे त्यांचा सांभाळ मोरोपंतांनी केला. त्या लहानपणापासूनच धाडसी स्वभावाच्या होत्या. लहानपणीच त्या धनुर्विद्या आत्मसंरक्षण, घोडेस्वारी शिकल्या होत्या. १८४२ रोजी त्यांचा विवाह झाशीचे राजे, राजा गंगाधर राव यांच्याशी झाला होता.

१८५३ मध्ये महाराजांचा मृत्यु झाला तेव्हा गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी यांच्या नेतृत्वाखालील ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने त्याच्या दत्तक वाराचा दावा मान्य करण्यास नकार दिला आणि लॅप्सच्या सिध्दांतानुसार झाशीचा ताबा घेतला. राणी नियंत्रण सोडण्यास तयार नव्हती आणि १८५८ मध्ये ब्रिटीशांच्या विरुध्दच्या बंडात सामील झाली. कंपनीने उठाव दडपण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. इंग्लंडमधून मजबुतीकरण परत आणले आणि आणखी अनेक शस्त्रे ओतली. ते त्यांच्या सर्व शक्तींनीशी लढले आणि त्यांच्या रणनितीमध्ये निर्दयी होते. त्यांनी नवीन नियम बनवले ज्यामुळे शिपाई बंड केल्यास त्यांना दोषी ठरवणे आणी फाशी देणे सोपे झाले. इ.स. १८५७ चा उठाव हा संपूर्ण हिंदूस्थानात झाला. त्याचप्रमाणे ५ जून १८५७ ला झाशीही शिपायांचा उद्रेक झाला. केवळ ३५ शिपायांनी इंग्रजांना पळवून लावल. या परिस्थितीत इंग्रजांच्या परवानगीची वाट न पाहता राणी लक्ष्मीबाई किल्लयावर राहण्यास गेल्या. पुढे २२ जुलै १८५७ ला ब्रिटींशांनी राणींना झाशीची अधिकारसुत्रे हाती घेण्यास सांगीतले. राणी पुन्हा राज्यकर्त्या झाल्या होत्या. परंतू अतिशय बिकट परिस्थितीत त्यांची हाती राज्यकारभार आला होता. मनुष्यबळ नव्हते आणि खजीनाही रिकामाच होता.

३ एप्रिलच्या मध्यरात्री राणी लक्ष्मीबाई सारंगी घोडीवर स्वार होवून दामोदररावास पाठीशी बांधून किल्यावरुन खाली उडी मारुन काल्पी या ठिकाणी गेल्या. कोंच, काल्पी च्या या पराभवानंतर त्या रावसाहेब पेशव्यां–बरोबर ३०–३१ मे १८५८ रोजी ग्वाल्हेरला आल्या. त्यानंतर सैन्याची कवायत नियमित चालू ठेवली. सैन्यांमध्ये फिरुन, सैनिकांची चौकशी करीत इंग्रजांना रोखण्यासाठी कशाप्रकारे मोर्चे बांधणी करावी याविषयी चर्चा केली. ब्रिटींशानी त्वरित हल्ला चढवला. लक्ष्मीबाईंनी रणांगणात धाव घेतली. लक्ष्मीबाई तलवारीच्या सपासप वार करीत समोर येणाऱ्या सैन्याला कापून काढत होत्या. सैन्यही लक्ष्मीबाईकडे पाहून त्वेषाने लढले. वयाच्या २३ व्या वर्षी मरण स्विकारले. शुर राणीला रणांगणात वीर मरण आले. 'मै मेरी झांशी नही दुंगी' आजही हे वाक्य ऐकले अंगात एक वीज संचारते. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी आपल्या झाशीबद्दल काढलेले उद्‌गार आजही तितकेच जागृत आहेत.

'खूब लडी मर्दानी वो तो झांसी वाली राणी थी'

ब्रिटीशाविरुध्द मी का लढलो भगत सिंह



कु. अस्मिता पांडूरंग चव्हाण
बी.ए. भाग ३

भगतसिंग विद्यार्थीदशेतच स्वातंत्र्य चळवळीत ओढले गेले. त्यांनी विद्यार्थी संघटना उभारली पुढे ते अतिशय क्रांतीकारण चंद्रशेखर आझाद यांच्या संपर्कात आलेत व कट्टर देशभक्ती अशा युवकांची नवजवान भारत की संघटना उभारली. त्यांची ही चळवळ पंजाब दिल्ली उतरप्रदेश महाराष्ट्र परसले. बघता बघता देशातील विविध भागातून युवक त्यांना भेटायला येवू लागले आणि त्यांच्या भेटीने भारावून गेले. ते देशभक्त त्यागी देशप्रेमी होते. त्यांना या देशात सुराज्य निर्माण कराचे होते. त्यांना समाजवादी क्रांती शोषण विरहीत समाज जातिभेद मुक्त भारत त्यांना निर्माण करायचा होता.

ते म्हणायेच सशस्त्र क्रांती शिवाय या देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही या देशात रशियन क्रांतीच्या धरतीवर उठाव करण्याच्या तयारीत होते. पण हे विचार ते पूर्ण करु शकले नाहीत. इंग्रज अधिकारी सँडर्स यांच्या खुनात अटक झाली व २३ मार्च १९३१ मध्ये लाहोर येथे त्यांना राजगुरु आणि सुखदेव यांच्यासोबत जुलमी इंग्रज सरकारने फाशीची शिक्षा दिली.

भगतसिंग हे खरे देशभक्त होते. त्यांनी आपल्या देशाला वाचविण्यासाठी खुप संघर्ष केला आणि आपल्या वयाच्या २२ वर्षी आनंदा फाशीची शिक्षा स्विकारली. भगत सिंग आजच्या पिढीतील तरुणांसाठी एक सर्वात मोठा आदर्श आहे त्यामुळे त्यांचे नाव शहीद झालेल्या वीरां मध्ये सर्वात प्रथम घेतले जाते. भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग यांनी ब्रिटीश सरकारशी लढा देण्यासाठी कित्येक देशभक्त एकत्र आले. ज्यांची शैली गांधीवादी नव्हती.

जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर लाला लजपत राय यांचा मृत्यु झाला. यामुळे भगतसिंह यांना मोठा धक्का बसला. म्हणून भगत सिंग यांना ब्रिटीश सरकारचा राग आला. लाला लजपतराय यांचा मृत्यूचा बदला घेण्याचे ठरविले. हा बदला पूर्ण करण्यासाठी त्यांना सर्वात प्रथम जनरल सौंडर्स ला मारायचे होते. भगतसिंग आणि राजगुरु या दोघांनी सॉन्डर्सवर धडक घातली. सुखदेव यांनी त्यांना मदत केली सॉन्डर्सला मारल्यानंतर भगत सिंह ने विधान सभेच्या संसद भवनावर बॉम्ब फेकला. या कृत्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली.

भगतसिंह लहानपणापासून हुशार होते. ते लहान असतांनाचा वीरांचे खेळ खेळत असत. त्यांच्या मनामध्ये लहानपणापासूनच देशप्रेमाची भावना भरलेली होती. भगतसिंगने आपले प्राथमिक शिक्षण आपल्या गावातच पूर्ण केले. त्यांनी आपल्या वयाच्या १४ व्या वर्षापासून पंजाबमधील क्रांतीकारक संस्थामध्ये काम करण्यास सुरुवात केली. भगत सिंह कॉलेज मध्ये शिकत असतांना त्यांनी भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित करण्याची शपथ घेतली. या भारतभूमीवर अनेक महान नेत्यांचा वीरांचा जन्म झाला आहे. या सर्व नेत्यांना तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या देशातही आणि समाजासाठी कार्य करतांना आपला प्राणांचे बलिदान दिले आहे. अशाच महान वीरांपैकी एक अमर क्रांतीकारी वीर होते ते म्हणजे शहीद भगतसिंह. ज्यांनी भारत देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात हसता हसता आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

भगत सिंह यांना हिंदी, उर्दू, पंजाबी आणि इंग्रजी भाषेच्या व्यतिरिक्त बंगाली देखील येत होती. वयाच्या १४ व्या वर्षीच गुरुद्वारात नानकासाहेब येथे अनेक लोकांना ठार मारण्याच्या विरोधाच्या आंदोलनात सहभागी झाले नंतर ते युवा क्रांतीकारी चळवळीत सामील झाले आणि ब्रिटीश सरकारच्या हिंसक मार्गाने पाडाव करण्यसाठी विचाराचे समर्थक झाले. इटलीच्या एका गटापासून प्रेरीत होवून भगतसिंह ने मार्च १९२६ मध्ये नवजवान भारत स्थापन केली. नंतर ते हिंदूस्थान सोशलिस्ट रिपब्लिक संघाचे सदस्य देखील झाले. या संघात चंद्रशेखर आझाद, अशफाखउल्ला खान, रामप्रसाद बिस्मीलाँ या सारखे दिग्गज होते. डिसेंबर १९२८ मध्ये भगतसिंह आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरु यांनी ब्रिटीश अधिकारी जॉन साँडर्सला लाहोर येथे गोळ्या घाळून ठार केले. ब्रिटीश अधिक्षक जेम्स कॉटच्या आदेशावरुन लाला लजपत राय यांच्या वर लाठीचार्ज करुन जबर जखमी केले. त्यांमुळे लाला लजपत राया यांचा मृत्युचा बदला घेण्यासाठी



तुम मुझे खुन दो मै तुम्हे आजादी दुंगा....



कु. श्वेता संतोष राठोड
बी.ए. भाग ३

त्यांनी जेम्स कॉटला ठार मारायचे ठरविले होत. परंतू ऐनवेळी सँडर्स पुढे आल्यामुळे तो ठार झाला. या नंतर त्यांनी देशाला ब्रिटीशांच्या तावडीतून स्वातंत्र्य करण्यासाठी साहसाने ब्रिटीश सरकारचा सामना केला त्यांनी दिल्ली सेंट्रल असेंबली मध्ये बॉम्ब हल्ला करुन पळून जाण्याचा प्रयत्न देखील केला नाही. त्यासाठी त्यांना आणि त्यांचा दोन सहकारी राजगुरु आणि सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी फाशीची शिक्षा देण्यात आली. त्यावेळी त्यांचे वय अवघे २३ वर्षाचे होते. त्यांच्या त्यागाला आजतागयत स्मरत आहे. अमर शहीद भगतसिंहांचे नाव भारतीयांसाठी अनोळखी नाही. एवढ्या लहान वयातच त्यांनी देशभक्ती , आत्मबलीदान, साहस यांचे एक उदाहरण ठेवले आहे. एक सामान्य व्यक्ती आपल्या जीवनात याची कल्पनाही करु शकत नाही. भगत सिंहाचे योगदान या महान कार्यात अद्वितीय आहे. यासाठी भारत युगे–युगे भगतसिंहाचा ऋणी राहील. त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये एक अगाध अध्ययन शीलता तसेच अद्‌भूत तर्कशक्तीचे रसायन होते. त्यांच्या कडून विविध न्यायालयात दिली गेलेली भाषणे घ्याची साक्ष देतात. हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. तरी त्यांचे अंतिम ध्येय स्वातंत्र्य हेच होते.

भारताच्या उज्वल भविष्याचे दृष्टे अमर शहीद भगत सिंह यांचा आदर्श आपल्या देशवासियांना प्रेरीत करत राहील.

भगतसिंह म्हटले की, एका सर्वसामान्यपणे मनात येत ती हसत हसत फासावर जाणाऱ्या क्रांतिकारकाची प्रतिमा.... पण भगतसिंह म्हणजे केवळ तेवढच नाही. भगत सिंह म्हणजे सशस्त्र क्रांतीला वैचारिक अधिष्ठान देणारा राजकीय विचारवंत, जाणीवपूर्वक हौतात्मय स्विकारुन भारताच्या स्वातंत्र्य चळवळीची माहिती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवणारा वीर.

भगतसिंहाच्या क्रांतीकार्यासोबतच त्यांच्या विचार व कर्तुत्वाचा आढावा घेणारे प्रेरक चरित्र सर्वांनी वाचले पाहिजे हीच अपेक्षा....

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म जानेवारी २३, १८९७ रोजी ओडिशा मधील कटक शहरात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ आणि आईचे नाव प्रभावती होते. जानकीनाथ बोस हे कटक शहरातील नामवंत वकील होते. आधी ते सरकारी वकील म्हणून काम करत होते पण नंतर त्यांनी आपली स्वतःची वकिली सुरू केली होती. कटक महापालिकेत ते काही काळ काम करत होते. तसेच बंगालचे विधानसभेचे सदस्य ही होते. इंग्रज सरकारने त्यांना रायबहादूर हा किताब दिला होता. प्रभावती देवींच्या वडिलांचे नाव गंगानारायण दत्त होते. दत्त घराणे हे कोलकात्यातील एक श्रीमंत घराणे होते. प्रभावती व जानकीनाथ बोस ह्यांना एकूण १४ मुले होती. त्यात ६ मुली व ८ मुलगे होते. सुभाषचंद्र त्यांचे सहावे अपत्य व पाचवे पुत्र होते. आपल्या सर्व भावांपैकी सुभाषला शरदचंद्र अधिक प्रिय होते. शरदबाबू हे प्रभावती व जानकीनाथ ह्यांचे दुसरे पुत्र होते. सुभाष त्यांना मेजदा म्हणत असत. शरदबाबूंच्या पत्नीचे नाव विभावती होते.

शिक्षण व विद्यार्थी जीवन :

लहानपणी, सुभाष कटक मध्ये रॅवेन्शॉ कॉलिजिएट हायस्कूल नामक शाळेत शिकत होते. ह्या शाळेत त्यांच्या एका शिक्षकाचे नाव वेणीमाधव दास होते. वेणीमाधव दास आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे स्फुल्लिंग जागवत. त्यांनी सुभाषमधली सुप्त देशभक्ती जागृत केली. वयाच्या १५व्या वर्षी, सुभाष गुरूच्या शोधात हिमालयात गेले हाते. गुरूचा हा शोध असफल राहिला. त्यानंतर स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचून, सुभाष त्यांचे शिष्य बनले. महाविद्यालयात शिकत असताना, अन्यायाविरूद्ध लढण्याची त्यांची प्रवृत्ती झाली. कोलकात्यातील प्रेसिडेंसी महाविद्यालयात इंग्रज प्राध्यापक ओटेन हे भारतीय विद्यार्थ्यांशी उर्मटपणे वागत असत. म्हणून सुभाषने महाविद्यालयात संप पुकारला होता.

१९२१ साली इंग्लंडला जाऊन, सुभाष भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. परंतु इंग्रज सरकारची चाकरी करण्यास नकार देऊन त्यांनी राजीनामा दिला व ते मायदेशी परतले.

स्वातंत्र्यलढ्यात प्रवेश व कार्य :

कोलकात्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, देशबंधू चित्तरंजन दास ह्यांच्या कार्याने प्रभावित झालेल्या सुभाषची, दासबाबूंबरोबर काम करण्याची इच्छा होती. इंग्लंडहून त्यांनी दासबाबूंना पत्र लिहून, त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

रविंद्रनाथ ठाकूर ह्यांच्या सल्ल्यानुसार भारतात परतल्यानंतर ते सर्वप्रथम मुंबईला जाऊन महात्मा गांधींना भेटले. मुंबईत गांधींजी मणिभवन नामक वास्तु मध्ये वास्तव्य करत. तेथे २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी आणि सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.

गांधींजीनी देखील कोलकत्याला जाऊन दासबाबूंबरोबर काम करण्याचा सल्ला दिला. मग सुभाषबाबू कोलकात्याला आले व दासबाबूंना भेटले. दासबाबूंना त्यांना पाहून फार आनंद झाला. त्याकाळी, गांधींजीनी इंग्रज सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन चालवले होते. दासबाबू बंगालमध्ये ह्या आंदोलनाचे नेतृत्व करत होते. त्यांच्याबरोबर सुभाषबाबू ह्या आंदोलनात सहभागी झाले.

१९२२ साली दासबाबूंनी काँग्रेस अंतर्गत स्वराज पक्षाची स्थापना केली. विधानसभेच्या आतून इंग्रज सरकारला विरोध करण्यासाठी, कोलकाता महापालिकेची निवडणूक, स्वराज पक्षाने लढवून, जिंकली. स्वतः दासबाबू कोलकात्याचे महापौर झाले. त्यांनी सुभाषबाबूंना महापालिकेचे प्रमुख कार्यकारी अधिकारी बनवले. सुभाषबाबूंनी आपल्या कार्यकाळात महापालिकेची काम करण्याची पद्धतच बदलून टाकली. कोलकात्यातील रस्त्यांची इंग्रज नावे बदलून, त्यांना भारतीय नावे दिली गेली. स्वातंत्र्यलढ्यात प्राणार्पण केलेल्या क्रांतिकारकांच्या कुटुंबीयांना महापालिकेत नोकरी मिळू लागली.

लवकरच, सुभाषबाबू देशातील एक अग्रेसर युवा नेता म्हणून ओळखले जाऊ लागले. पंडित जवाहरलाल नेहरूंसह, सुभाषबाबूंनी काँग्रेस अंतर्गत इंडिपेंडन्स लिगची स्थापना केली. १९२८ साली जेव्हा सायमन कमिशन भारतात आले, तेव्हा काँग्रेसने त्याला काळे झेंडे दाखवले होते. कोलकात्यात सुभाषबाबूंनी ह्या आंदोलनाचे नेतृत्व केले. सायमन कमिशनला उत्तर देण्यासाठी, काँग्रेसने भारताच्या भावी घटनेचा आराखडा तयार करण्यासाठी आठ सदस्यांची समिती नेमली. पंडित मोतीलाल नेहरू ह्या समितीचे अध्यक्ष होते तर सुभाषबाबू त्याचे एक सदस्य. ह्या समितीने नेहरू रिपोर्ट सादर केला.

पूर्ण स्वराजच्या भूमिकेशी तडजोड मान्य नव्हती. अखेर वसाहतीचे स्वराज्याची मागणी मान्य करण्यासाठी इंग्रज सरकारला एक वर्षाची मुदत देण्याचे ठरले. जर एका वर्षात इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही, तर काँग्रेस पूर्ण स्वराज्याची मागणी करेल असे ठरले. इंग्रज सरकारने ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे, १९३० साली काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षते खाली लाहोरला झाले, तेव्हा असे ठरवले गेले की जानेवारी २६ हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जाईल.

जानेवारी २६, १९३१च्या दिवशी, कोलकात्यात सुभाषबाबू तिरंगी ध्वज फडकावत एका विराट मोर्चाचे नेतृत्व करत होते. तेव्हा पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यात ते जखमी झाले. सुभाषबाबू तुरूंगात असताना, गांधींजीनी इंग्रज सरकारबरोबर तह केला व सर्व कैद्यांची सुटका करण्यात आली. परंतु सरदार भगतसिंग आदि क्रांतिकारकांची सुटका करण्यास इंग्रज सरकारने नकार दिला. भगतसिंगांची फाशी रद्ध करावी ही मागणी गांधींजीनी इंग्रज सरकारकडे केली. सुभाषबाबूंची इच्छा होती, की ह्याबाबतीत इंग्रज सरकार जर दाद देत नसेल, तर गांधींजीनी सरकारबरोबर केलेला करार मोडावा. पण आपल्या बाजूने दिलेला शब्द मोडणे गांधींजीना मान्य नव्हते. इंग्रज सरकारने आपली भूमिका सोडली नाही व भगतसिंग आणि त्यांच्या साथीदारांना फाशी देण्यात आले. भगतसिंगांना वाचवू न शकल्यामुळे सुभाषबाबू, गांधींजी व काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर फार नाराज झाले.

२२ जुलै १९४० रोजी मुंबई येथे सुभाषचंद्र बोसांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशी भेट झाली होती. दोघांमध्ये देशाचे स्वातंत्र्य आणि देशातील जातीयता व अस्पृश्यता यावर चर्चा झाली. आपल्या सार्वजनिक जीवनात सुभाषबाबूंना एकूण अकरा वेळा कारावास भोगावा लागला. सर्वप्रथम १९२१ साली त्यांना सहा महिन्यांचा कारावास भोगावा लागला.

१९२५ साली गोपीनाथ साहा नामक एक क्रांतिकारी, कोलकात्याचे पोलीस अधीक्षक चार्लस टेगार्ट ह्यांना मारण्याच्या प्रयत्नांत होता. पण त्याने चुकून अर्नेस्ट डे नामक एका व्यापारी इसमाला मारले. ह्यासाठी त्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली. गोपीनाथ फाशी गेल्यावर सुभाषबाबू जाहीरपणे जोरात रडले. त्यांनी गोपीनाथचा पार्थिव देह मागून घेऊन त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. ह्यावरून इंग्रज सरकारने अर्थ लावला की सुभाषबाबू ज्वलंत क्रांतिकारकांशी संबंध तर ठेवतातच, परंतु तेच ह्या क्रांतिकारकांचे स्फूर्तिस्थान आहेत. ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवताच, त्यांना अनिश्चित कालखंडासाठी म्यानमारच्या मंडाले कारागृहात बंदिस्त करून टाकले.

नोव्हेंबर ५, १९२५च्या दिवशी, देशबंधू चित्तरंजन दासांचे कोलकाता येथे देहावसान झाले. सुभाषबाबूंनी त्यांच्या मृत्यूची बातमी मंडालेच्या कारागृहात रेडियोवर ऐकली.



मंडाले कारागृहातील वास्तव्यात सुभाषबाबूंची तब्येत बिघडली. त्यांना क्षयरोगाने ग्रासले. परंतु इंग्रज सरकारने तरीही त्यांची सुटका करण्यास नकार दिला. सरकारने त्यांची सुटका करण्यासाठी अट घातली की त्यांनी औषधोपचारासाठी युरोपला जावे. पण औषधोपचारानंतर ते भारतात कधी परत येऊ शकतात हे सरकारने स्पष्ट केले नाही. त्यामुळे सुभाषबाबूंनी सरकारची अट मानली नाही. अखेर परिस्थिती इतकी कठीण झाली की कदाचित तुरूंगातच सुभाषबाबूंचा मृत्यू ओढवेल असे वाटू लागले. इंग्रज सरकारला हा धोकाही पत्करायचा नव्हता. त्यामुळे सरकारने अखेर त्यांची सुटका केली. मग सुभाषबाबू औषधोपारासाठी डलहौसी येथे जाऊन राहिले.

युरोपातील वास्तव्य :

१९३३ पासून १९३६ पर्यंत सुभाषबाबूंचे युरोप मध्ये वास्तव्य होते. युरोप मधील वास्तव्यात सुभाषबाबूंनी आपल्या तब्येतीची काळजी घेतानाच, आपले कार्यही सुरूच ठेवले. त्यांनी इटलीचे नेते मुसोलिनी ह्यांची अनेकदा भेट घेतली. मुसोलिनीने त्यांना, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले. आयर्लंडचे नेते डी व्हॅलेरा सुभाषबाबूंचे चांगले मित्र बनले.

भारतरत्न पुरस्कार :

१९९२ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मरणोपरान्त भारतरत्न प्रदान करण्यात आले होते. परंतु सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या एका जनहितयाचिकेचा आधार घेऊन नेताजींना दिलेला हा पुरस्कार परत काढून घेण्यात आला. त्या याचिकेत नेताजींच्या मृत्यूचा कुठलाही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोपरान्त 'भारतरत्न' पुरस्कार देणे अवैध आहे असा युक्तिवाद करण्यात आलेला होता. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने नेताजींना देण्यात आलेला हा पुरस्कार परत घेण्यात आला. दिलेला भारतरत्न पुरस्कार परत घेण्याची इतिहासातली ही एकमेव घटना आहे.

दुसऱ्या जागतिक महायुद्धातील जपानच्या पराभवानंतर, नेताजींना नवा रस्ता शोधणे जरूरी होते. त्यांनी रशियाकडून मदत मागायचे ठरवले होते. ऑगस्ट १८, १९४५ रोजी नेताजी विमानातून मांचुरियाच्या दिशेने जात होते. ह्या प्रवासादरम्यान ते बेपत्ता झाले. ह्या दिवसानंतर ते कधी कुणाला दिसलेच नाहीत.ऑगस्ट २३, १९४५ रोजी जपानच्या दोमेई वृत्त संस्थेने जगाला कळवले की, ऑगस्ट १८ रोजी नेताजींचे विमान तैवानच्या भूमीवर अपघातग्रस्त झाले होते व त्या दुर्घटनेत खूपच भाजलेल्या नेताजींचे इस्पितळात निधन झाले. अपघातग्रस्त विमानात नेताजी सुभाषचंद्रांसह त्यांचे सहकारी कर्नल हबिबूर रहमान होते.

भारतीय राष्ट्रवादाचा उदय



कु. सेजल गोपाल राठोड
बी.ए. भाग ३

राष्ट्रवाद ही लोकांद्वारे व्यक्त केलेली विचारधारा आहे ज्यांना त्यांचे राष्ट्र इतर सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे असा ठामपणे विश्वास आहे. श्रेष्ठत्वाच्या या भावना सहसा सामायिक वांशिक, भाषा, धर्म, संस्कृती किंवा सामाजिक मूल्यांवर आधारित असतात. निव्वळ राजकीय दृष्टीकोनातून, राष्ट्रवादाचा उद्देश देशाच्या लोकप्रिय सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याचा आहे स्वतःवर राज्य करण्याचा अधिकारआणि आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेद्वारे निर्माण होणाऱ्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक दबावांपासून त्याचे संरक्षण करणे. या अर्थाने, राष्ट्रवादाला जागतिकतेचा विरोधी म्हणून पाहिले जाते.

राजकीयदृष्ट्या, राष्ट्रवादी राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे, स्वतःचे शासन करण्याचा अधिकार सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्रवाद्यांच्या श्रेष्ठत्वाच्या भावना सामान्यतः सामायिक वांशिक, भाषा, धर्म, संस्कृती किंवा सामाजिक मूल्यांवर आधारित असतात. गरज पडल्यास लष्करी आक्रमणाद्वारे इतर राष्ट्रांवर वर्चस्व गाजवण्याचा अधिकार त्यांच्या देशाला आहे, असे अतिराष्ट्रवादी मानतात. राष्ट्रवादाच्या विचारधारा जागतिकीकरणाच्या आणि आधुनिक जागतिकीकरणाच्या चळवळीच्या विरुद्ध आहेत. आर्थिक राष्ट्रवाद एखाद्या राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला परकीय स्पर्धेपासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करतो, अनेकदा संरक्षणवादाच्या सरावाद्वारे. त्याच्या टोकापर्यंत पोहोचलेला, राष्ट्रवाद हुकूमशाही आणि विशिष्ट वांशिक किंवा वांशिक गटांच्या समाजातून बहिष्कृत होऊ शकतो.

आज, राष्ट्रवाद ही सामान्यतः एक सामायिक भावना म्हणून ओळखली जाते कारण ती सार्वजनिक आणि खाजगी जीवनावर किती प्रमाणात प्रभाव टाकते, आधुनिक इतिहासातील सर्वात महान, निर्धारक घटकांपैकी एक म्हणून कार्य करते.

वासुदेव बळवंत फडके आद्य क्रांतिकारक



कु. पल्लवी ज्ञानेश्वर परांडे
बी.ए. भाग ३

राष्ट्रवादाचा इतिहास :

आपला देश "सर्वोत्कृष्ट" मानणारे लोक नेहमीच अस्तित्त्वात आहेत ही सामान्य भावना असूनही, राष्ट्रवाद ही तुलनेने आधुनिक चळवळ आहे. लोकांना त्यांच्या मूळ भूमीबद्दल आणि त्यांच्या पालकांच्या परंपरांबद्दल नेहमीच आसक्ती वाटत असली तरी, 18 व्या शतकाच्या अखेरीपर्यंत राष्ट्रवाद व्यापकपणे मान्यताप्राप्त भावना बनला नाही. 18 व्या शतकातील अमेरिकन आणि फ्रेंच क्रांती ही राष्ट्रवादाची पहिली प्रभावी अभिव्यक्ती मानली जाते. 19व्या शतकात, राष्ट्रवाद लॅटिन अमेरिकेतील नवीन देशांमध्ये घुसला आणि मध्य, पूर्व आणि आग्नेय युरोपमध्ये पसरला. 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात आशिया आणि आफ्रिकेत राष्ट्रवादाचा उदय झाला.

20 व्या शतकापूर्वीचा राष्ट्रवाद :

राष्ट्रवादाची पहिली खरी अभिव्यक्ती इंग्लंडमध्ये 1600 च्या मध्यातील प्युरिटन क्रांतीदरम्यान झाली. 17 व्या शतकाच्या अखेरीस, इंग्लंडने विज्ञान, वाणिज्य आणि राजकीय आणि सामाजिक सिद्धांताच्या विकासामध्ये जागतिक नेता म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केली होती. 1642 च्या इंग्रजी गृहयुद्धानंतर , कॅल्व्हिनिझमची प्युरिटन कार्य नैतिकता मानवतावादाच्या आशावादी नीतिमत्तेमध्ये विलीन झाली .

बायबलच्या प्रभावाने, इंग्रजी राष्ट्रवादाची एक अभिव्यक्ती उदयास आली ज्यामध्ये लोकांनी त्यांच्या कथित मिशनची तुलना प्राचीन इस्रायलच्या लोकांशी केली . अभिमानाने आणि आत्मविश्वासाने सुजलेल्या इंग्रजांना असे वाटू लागले की, संपूर्ण जगात सुधारणा आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या नव्या युगाची सुरुवात करणे हे त्यांचे ध्येय आहे. इंग्लिश कवी आणि विचारवंत जॉन मिल्टन यांनी 1667 च्या त्यांच्या उत्कृष्ट कृती "पॅराडाईज लॉस्ट" मध्ये इंग्लिश लोकांच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांचे वर्णन केले होते जे तोपर्यंत "इंग्लंडच्या स्वातंत्र्याचा दृष्टीकोन "अंतहीन युगांपासून साजरा केला जात होता. स्वातंत्र्य," पृथ्वीच्या सर्व कोपऱ्यात.१८व्या शतकातील इंग्लंडचा राष्ट्रवाद, जॉन लॉक आणि जीन जॅक रुसो यांच्या " सामाजिक करार " राजकीय तत्त्वज्ञानात व्यक्त केल्याप्रमाणे , उर्वरित शतकात अमेरिकन आणि फ्रेंच राष्ट्रवादावर प्रभाव पडेल.



क्रांतीचा पाया :

आपल्या अंथरुणाला खिळलेल्या मरणासन्न आईला भेटण्यासाठी फडक्यांनी रजा मागितली असता त्यांच्या इंग्रज अधिकाऱ्याने टाळाटाळ केली. फडके रजा मिळून घरी जाईपर्यंत त्यांच्या आईचा स्वर्गवास झालेला होता. संतप्त झालेल्या फडक्यांनी आपली सरकारी नोकरी सोडून दिली व त्यानंतर ब्रिटिश सरकारच्या धोरणांविरुद्ध जाहीर भाषणे देण्यास सुरुवात केली. १८७० च्या दशकात पडलेल्या दुष्काळाकडे सरकारने केलेले दुर्लक्ष पाहून त्यांनी स्वतः दुष्काळग्रस्त भागात जाऊन तेथील लोकांना मदत केली व त्याच वेळी सरकार उलथवून देण्याची भाषा करण्यास सुरुवात केली.

सशस्त्र क्रांती :

इ.स. १८७९ नंतर वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याला सुरुवात झाली. त्यांनी दौलतराव नाईक यांच्या मदतीने लोणीजवळ धामारी गावावर पहिला दरोडा टाकला. यामध्ये त्यांना फक्त तीन हजार रुपये मिळाले. २५ ते २७ फेब्रुवारी १८७९ रोजी लोणी व खेड या गावांवर दरोडा टाकून लूटमार केली. ५ मार्च १८७९ रोजी जेजुरीजवळ वाल्हे गावावर दरोडा टाकला. या लुटीत त्यांना चार बंदुका, तीनशे रुपये व शंभर रुपयाचे कापड मिळाले. यानंतर त्यांनी सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव करण्याची तयारी सुरू केली. सुरुवातीला त्यांनी पुणे, मुंबई व इतर शहरातील सुशिक्षित व धनाढ्य भारतीयांकडे मदतीची मागणी केली परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. फडके अक्कलकोट स्वामी समर्थांकडे आशीर्वाद मागण्यासाठी गेले वासुदेव बळवंत फडके हे दत्त उपासक होते. त्यांनी दत्तमहात्म्य हा सात हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला. तसेच स्वरचित दत्त स्तोत्र ही वासुदेव बळवंत फडके यांनी लिहिले दत्तोपासक असलेले वासुदेव बळवंत फडके स्वामी समर्थ महाराजांचे निस्सीम भक्त होते.

स्वामी समर्थ आणि वासुदेव बळवंत फडके यांची भेट अक्कलकोटला झाली वासुदेव बळवंत फडके हे स्वामी महाराजांना शरण गेले आणि आपली तलवार काढून स्वामी समर्थ महाराजांसमोर ठेवली. आपली कार्ययोजना आणि मनोदय सांगितला. स्वामी महाराजांच्या हातून तलवार मिळावी आणि क्रांतीकार्यास आशीर्वाद मिळावा, अशी त्यांची इच्छा होती.स्वामी समर्थ त्रिकालद्रष्टे होते. वासुदेव बळवंत फडके यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाले की, हम जानते है | नेक काम है |, असे सांगत एका सेवेकऱ्याला समोर ठेवलेली तलवार नेऊन झाडावर टांगून ठेवण्यास सांगितले. स्वामी समर्थांना उद्देशून म्हणाले की. अभी वक्त नही हैं | तुम्ही आरंभीलेले कार्य चांगले असले, तरी क्रांतीकार्याला यश येणार नाही, असे स्वामी म्हणाले.स्वामींनी सांगितले सध्याचा काळ संबंधित परिस्थितीला साथ देणार नाही व तुला काळाप्रमाणे थांबावे लागेल योग्य वेळ आल्यानंतर देश क्रांतीचे काम करावे पांडवांच्या बरोबर भगवान श्रीकृष्ण सुद्धा होतेच परंतु पाडवांच्या बरोबर काळाचे सहकार्य नव्हते त्यामुळे पांडवांना खूप कष्टातून जावे लागले म्हणून योग्य वेळ आणि योग्य परिस्थिती येताच तू देश क्रांतीचे काम करावे असे श्री स्वामी समर्थ यांनी सांगितले होते मात्र, प्रांरभिलेल्या कार्यात फडके माघार घेऊ शकत नव्हते. अखेर वासुदेव बळवंतांनी ती तलवार घेतली. स्वामींना साष्टांड दंडवत घातले आणि पुढील प्रवासी निघून गेले [४] फडक्यांनी मग महाराष्ट्रातील तथाकथित मागासलेल्या जातींमध्ये मदत शोधली. मातंग, रामोशी, धनगर, कोळी आणि इतर अनेक समाजातून त्यांनी तरुण घेतले व त्यांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देऊन आपल्या 'सैन्यात' भरती केले. अशा काहीशे सैनिकांसह त्यांनी इंग्रज सरकारविरुद्ध अधिकृतरीत्या युद्धाची घोषणा केली. शिरुर आणि खेड तालुक्यातील सरकारी खजिन्यावर धाड टाकून फडक्यांच्या सैन्याने आपला चरितार्थ चालवला. त्यानंतर त्यांनी थेट पुण्यावर चाल केली आणि काही दिवसांकरता शहरावर कब्जा मिळवला. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला चढवून इंग्रज सरकारचे लक्ष विकेंद्रित करण्याच्या त्यांच्या चालीला यश मिळाले नाही आणि इंग्रज सरकारने भारतातील हा पहिला सशस्त्र उठाव चिरडण्याचा चंग बांधला. घानूर गावाजवळ झालेल्या हातोहातच्या लढाईनंतर भारतीयांत फितुरी लावण्यासाठी सरकारने फडक्यांना पकडून देण्याबद्दल इनाम जाहीर केले. याला प्रत्युत्तर म्हणून फडक्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पकडून देणाऱ्यास त्याहून मोठे इनाम जाहीर केले! याचबरोबर साप-किरड्यांना मारल्यावर मिळणाऱ्या बक्षिसाप्रमाणे प्रत्येक युरोपीय व्यक्तीला मारण्याबद्दलही त्यांनी इनाम जाहीर केले. या लढाईनंतर फडके अरब व रोहिल्यांकडून मदत मिळवण्यासाठी हैदराबाद संस्थानात गेले. तेथील



निजामाच्या सेवेत असलेल्या अब्दुल हक आणि मेजर हेन्री विल्यम डॅनियेल या अधिकाऱ्यांनी फडक्यांचा पिच्छा पुरवला आणि त्यांना परत महाराष्ट्रात पळून येण्यास भाग पाडले.

धरपकड, खटला व मृत्यू :

जुलै २३, इ.स. १८७९ रोजी विजापूर जवळील देवर नावडगी या गावाच्या बाहेर एका बौद्ध विहारामध्ये गाढ झोपेत असताना त्यांना अटक करण्यात आले व पुण्याच्या तुरुंगात ठेवले. तेथे त्याच्यावर खटला चालवण्यात आला. पुण्यातील एकाही वकिलाने त्यांचे वकीलपत्र घेण्याची तयारी दाखवली नाही. शेवटी सार्वजनिक काकांनी त्यांचे वकीलपत्र घेतले व त्यांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. उच्च न्यायालयात त्यांच्या बचावाचे काम महादेव चिमाजी आपटे यांनी केले. फाशीची शिक्षा टळून त्यांना आजीवन कारावास व तडीपारीची शिक्षा झाली. फडक्यांना येमेन देशातील एडन येथील तुरुंगात पाठवण्यात आले. तेथे एकांतवासाची शिक्षा भोगत असलेल्या फडक्यांनी एके दिवशी आपल्या कोठडीचे दार बिजागऱ्यांसकट उचकटून काढून तुरुंगातून पळ काढला. काही दिवसांनी इंग्रजांनी त्यांना परत पकडले व पुन्हा तुरुंगात टाकले. तेथे आपल्याला मिळत असलेल्या वागणुकीविरुद्ध वासुदेव बळवंत फडक्यांनी आमरण उपोषण केले व त्यांचा फेब्रुवारी १७, इ.स. १८८३ रोजी मृत्यू झाला.

आझाद हिंद सेना





कु. रुपाली जयस्वाल
बी.कॉम. भाग २

सुप्रसिध्द भारतीय पुढारी नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यासाठी सिंगापूर येथे जुलै १९४३ मध्ये उभारण्यात आलेली लष्करी संघटना.

दुसरे महायुद्ध चालू असता नेताजी सुभाषचंद्रांना ब्रिटीश सरकारने कलकत्ता येथे नजरकैदेत ठेवले होते. तेथून ते १७ जानेवारी १९४१ रोजी धाडसाने निसटले आणि अनेक अडचणींना तोंड देत जर्मनीत पोहोचले. जर्मनीत भारता-बाहेरील भारतीयांची संघटना करून, स्वातंत्र्यसेना उभी करण्याचा त्यांनी निर्धार घोषित केला व त्यासाठी जर्मन सरकारची सक्रिय सहानुभूतीही मिळवली. जर्मनी व फ्रान्समधील भारतीय नागरिक व जर्मनांच्या ताब्यातील युद्धबंदी ह्यांतून सुमारे तीन हजारांची फौज निर्माण झाली. परंतु तेथून भारत दूर असल्यामुळे नेताजींना प्रचाराखेरीज प्रत्यक्ष कृती करणे अशक्य झाले.

१९४२ च्या सुमारास युद्धास प्रारंभ :

आग्नेय आशियात १९४२ च्या सुमारास युद्धास प्रारंभ होऊन १५ फेब्रुवारी रोजी जपानने सिंगापूरचा ब्रिटिश आरमारी तळ काबीज केला. नेताजी सुभाषचंद्र सिंगापूरला पोहचण्यापूर्वी मलायी मोहिमेत जपान्यांच्या हाती सापडलेल्या ब्रिटिश सेनेतील भारतीय सैन्याधिकारी कॅप्टन मोहनसिंग ह्यांनी जपान्यांच्या आश्रयाखाली भारतीय राष्ट्र सेना स्थापन केली. होती. त्याच वेळी स्वातंत्र्य चळवळीची कार्यवाही त्वरित व्हावी, म्हणून भारतीय स्वातंत्र्य-संघ स्थापून एक कृतिमंडळही नेमले होते. त्यावर ⇨राशबिहारी बोस ह्यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. कॅ. मोहनसिंग ह्यांच्या निमंत्रणावरून बँकॉक येथील परिषदेस हजर राहण्यासाठी जर्मन व जपानी सरकारच्या मदतीने महत्प्रयासाने नेताजी जून १९४३ मध्ये सिंगापूरला जाण्यासाठी टोकिओत दाखल झाले. परंतु दरम्यान मोहनसिंग ह्यांचे जपानशी मतभेद होऊन जपान्यांनी ही सेना बरखास्त केली; परंतु भारतीय स्वातंत्र्य-संघ ही संस्था तेथे अस्तित्वात होती. नेताजींनी जपान्यांच्या मदतीने मोहनसिंगांच्या लष्करी संघटनेचे पुनरुज्जीवन करून तिला 'आझाद हिंद सेना' हे नाव देण्याचे ठरविले. २ जुलै १९४३ रोजी नेताजी सिंगापूरला गेले व लागलीच त्यांनी राशबिहारी बोस यांच्याकडून भारतीय स्वातंत्र्य-संघाची धुरा आपल्या हाती घेतली आणि ५ जुलै १९४३ रोजी औपचारिक रीत्या आपल्या आधिपत्याखाली आझाद हिंद सेनेची स्थापना केल्याचे घोषित करून'चलो दिल्ली' हे घोषवाक्यही प्रसृत केले. जपानच्या कैदेतील भारतीय युद्धबंदी, सामान्य भारतीय नागरिक व असंख्य स्त्रिया देशसेवेसाठी स्वेच्छेने ह्या सेनेत दाखल झाल्या. दोन लष्करी विभाग भरतील एवढे खडे सैन्य, जपानच्या हाती लागलेल्या ब्रिटीश शस्त्रसामग्रीच्या आधाराने सुसज्ज करण्यात आले. जगन्नाथराव भोसले, शाहनवाजखान व मेजर सैगल या भारतीय युद्धबंदी लष्करी अधिकाऱ्यांना मेजर जनरल हा हुद्दा देण्यात आला व त्यांच्या अनुक्रमे चीफ ऑफ जनरल स्टाफ व विभागीय सेनाप्रमुख म्हणून नेमणुका केल्या. नेताजी सुभाषचंद्रांनी ह्या सेनेचे सरसेनापतिपद आपणाकडे घेतले आणि स्त्रियांचे जे 'झाशीची राणी पथक' तयार करण्यात आले, त्याचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी स्वामिनाथन ह्या सुप्रसिद्ध महिलेकडे सुपूर्त केले. ह्या सर्व सैन्यास तातडीचे लष्करी शिक्षण देण्यात येऊ लागले.

२१ ऑक्टोबर १९४३ ला नेताजींनी आझाद हिंदचे तात्पुरते सरकार प्रस्थापित केल्याची घोषणा केला. जपान, इटली, जर्मनी वगैरे राष्ट्रांनी तत्काळ त्यास औपचारिक मान्यताही दिली. लष्करी संघटनेबरोबरच आझाद हिंदच्या तात्पुरत्या सरकारने नागरी शासनव्यवस्थेतही लक्ष केंद्रित केले आणि काही मुलकी खाती उघडली. त्यांतील अर्थ, प्रसिद्धी, लष्कर-भरती, आरोग्य व समाज-कल्याण, पुरवठा, गृहबांधणी, वाहतूक इ. विशेष महत्त्वाची होती. पैसा, साधनसामग्री व सेनासंख्याबळ यांचे सर्वंकष संयोजन करण्यात येऊ लागले. स्वत: नेताजींनी जनतेचे सहकार्य मिळावे म्हणून सभा घेतल्या आणि नभोवाणीवरून भाषणे दिली. थोड्याच दिवसांत आझाद हिंद सेनेस जपानी सेनेचा दर्जा प्राप्त झाला. व ती कार्यन्वित झाली. नेताजीच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वामुळे व स्वातंत्र्याच्या उच्च ध्येयामुळे भारतीय सैनिकांची संख्या तीस हजारांच्या वर गेली. पुढे त्या सेनेची गांधी, नेहरू, आझाद अशी तीन पथकांत विभागणी करण्यात आली. ह्या पथकांतील निवडक लोकांचे एक स्वतंत्र पथक 'नंबर एक गनिमी पथक' ह्या नावाने तयार करण्यात आले व ते शाहनवाजखान ह्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करू लागले हेच पथक पुढे 'सुभाष –पथक' म्हणूनही लोकप्रिय झाले.

आझाद हिंद सेना जरी युद्धासाठी सज्ज झाली, तरी जपानी अधिकारी तिला आपल्या बरोबरीची समजण्यास तयार नव्हते. त्यांचे मत असे होते की, तिच्यातील बहुतेक सैनिक ब्रिटिशांच्या नोकरीतील भाडोत्री सैनिक असल्याने ते जपान्यांप्रमाणे जिद्दीने लढणे शक्य नाही. म्हणून त्यांची स्वतंत्रच पथके ठेवावीत. परंतु हे मत नेताजींना अमान्य होते. त्यांना आपल्या सैन्याबद्दल आत्मविश्वास होता. त्यांनी आपले सैन्य जपान्यांबरोबर मुद्दाम धाडले. आझाद हिंद सेनेचा पराक्रम पाहून जपान्यांचेही पुढे मत बदलले. १९४४ च्या मार्च महिन्यात जपान्यांनी हिंदुस्थानच्या ईशान्य सीमेवर चढविलेल्या हल्ल्यात भाग घेण्यासाठी ह्या सेनेतील काही पथके धाडण्यात आली. सीमेवरील इंफाळ येथे झालेल्या लढाईत ह्या सैन्यातील काही पथकांनी चांगली कामगिरी बजाविली. १९४४ च्या मे महिन्यात शाहनवाजखान ह्यांच्या नेतृत्वाखाली एका पथकाने भारतीय हद्दीत प्रवेश करून मोडोक हे ठाणे जिंकले. ब्रिटिशांच्या मोठ्या फौजेला व विमानमाऱ्याला न जुमानता ते जवळजवळ महिनाभर लढले. ह्या वेळी कॅप्टन सूरजमल ह्यांच्या हाताखाली एक जपानी पलटणही देण्यात आली होती. मोडोकप्रमाणे इतर लढायांतही ह्या सेनेने चांगले पराक्रम केले. एक मोक्याचे ठिकाण जिंकण्याची आज्ञा होताच, लेफ्टनंट मनसुखलाल व मूठभर सैनिकांनी जिवाची पर्वा न करता ती टेकडी जिंकली व आपण जपानी सैनिकांपेक्षा कोणत्याही प्रकारे कमी नाही हे सिद्ध केले. ह्या युद्धात मनसुखलाल ह्यांना अनेक जबर जखमा झाल्या, तरी त्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केलेच. आझाद हिंद सेनेच्या इतर पथकांनीही अशीच उत्तम कामगिरी बजावली. परंतु अखेर शत्रूचे प्रचंड संख्याबळ, विमानदल आणि शस्त्रसामग्री, तसेच जपानी सैनिकांनी घेतलेली युद्धक्षेत्रातील माघार ह्यांमुळे सुभाष पथकास नाइलाजाने माघार घ्यावी लागली. शिवाय अपुरा शस्त्र-व अन्न-पुरवठा, रसद मिळण्यातील अडचणी, जपान्यांचे लहरी सहकार्य इत्यादींमुळेही लढाई थांबविणे ह्याशिवाय त्यास दुसरा पर्याय नव्हता. ही पीछेहाट चालू असतानाच ब्रिटिशांनी विमानांतून पत्रके टाकली व ब्रिटिश सैन्यात परत या, अशी लालूच दाखविली. पण एकाही सैनिकाने त्यास भीक घातली नाही किंवा आझाद हिंद सेनेशी बेइमानी केली नाही, ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. भारत-सीमा पार करून पुढे ब्रह्मदेशात आगेकूच करणाऱ्या ब्रिटिश व भारतीय सैन्याला आझाद हिंद सेनेची पथके शरण आली. २ मे १९४५ रोजी रंगून पडल्यावर थोड्याच दिवसांत पुढे जपानने शरणागती पतकरली. नेताजी त्या वेळी सिंगापूरहून विमानाने टोकिओला जात असता अपघात होऊन मृत्यू पावले असावेत, असे म्हणतात. आझाद हिंद सेनेच्या पुष्कळ अधिकाऱ्यांना व सैनिकांना कैद करण्यात येऊन भारत सरकारविरुद्ध बंड केल्याचा आरोप त्यांच्यावर लादण्यात आला. शाहनवाजखान, सैगल आदी अधिकाऱ्यांवर कोर्टापुढे खटले भरण्यात आले. तथापि भारतीयांच्या यासंबंधीच्या प्रक्षुब्ध लोकमताच्या जाणिवेने ब्रिटीश सरकारने या आधिकाऱ्यांच्या शिक्षा माफ केल्या (३ जानेवारी १९४६).

आझाद हिंद सेनेचे सरसेनापती म्हणून सुभाषचंद्रांना भारतीय जनता प्रेमाने, मानाने व आदराने 'नेताजी ' ,म्हणू लागली; त्यांनी दिलेली 'जय हिंद'ही घोषणा आजही सर्वतोमुखी झाली आहे. प्रत्यक्ष युद्धात जरी ही सेना पराजित झाली असली, तरी तिचे उद्दिष्ट, तीमागील प्रेरणा आणि जिद्द व थोड्या अवधीत तिने केलेली कामगिरी, यांबद्दल भारतीय नागरिकांच्या मनात आदराचे स्थान आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात आझाद हिंद सेनेच्या अल्पकालीन पण स्फूर्तिदायक इतिहासास काही आगळे व महत्त्वाचे स्थान आहे.

भारताची राष्ट्रीय प्रतिज्ञा



कु. श्रुती सुनिल बेहेरे
बी.ए. भाग २

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि
विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता
माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करेन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा
आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन
आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव
यांच्याशी निष्ठा राखण्याची
मी प्रतिज्ञा करीत आहे.
त्यांचे कल्याण आणि
त्यांची समृद्धी ह्यांतच माझे
सौख्य सामावले आहे.

प्रस्तुत भारताची राष्ट्रीय प्रतिज्ञा'पिडीमारी वेंकट सुब्बा राव' यांनी लिहीली आहे. हा सारांश प्रतिज्ञा नावाच्या मराठी भाषेतील एका कविता/गद्याचा आहे.ही एका व्यक्तिचे देश आणि देशबांधवांवरल प्रेम आणि निष्ठा व्यक्त करते. तसेच सामाजिक जबाबदारी याबद्दलचे विचार व्यक्त करते. देशाच्या उज्वल भविष्यासाठी योगदान देण्याची इच्छा व्यक्त करते.

भारत जो जगातील सातव्या क्रमांकाचा देश आहे. एक सुंदर भौगोलिक स्थितीत वसलेला आहे. उत्तरेला हिमालयाने वेढलेला, पुर्वेला बंगालचा उपसागर आणि पश्चिमेला अरबी समुद्र यांच्यामध्ये हिंदी महासागरचा वास आहे. अशी माझ्या अंदाजे १३९ कोटी लोकांची निवासस्थाने असलेल्या जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला तसेच प्राचीन संस्कृतीपैकी एक असलेल्या अशा माझ्या भारत मातेची प्रचिती आहे.

सर्वप्रथम या राष्ट्रीय प्रतिज्ञेमधून अनेक मुल्यांचा अभ्यास करण्यासच नव्हे तर ते मुल्ये प्रत्यक्ष कृतीमध्ये रुजविण्याचं देखील उत्तम अनुभव याद्वारे घेवू शकतो. त्यापैकीच काही उदाहरण खालीलप्रमाणे :–

१. राष्ट्रप्रेम / राष्ट्रीयत्व / राष्ट्रवाद :

भारत माझा देश आहे या ओळींमधुन या भारतभूमीवर असणारे प्रगल्भ प्रेम अर्थातच राष्ट्रप्रेम दिसून येते.

भा – (तेज) + रत – (रममाण)

आपल्या देशावर प्रेम करणे आणि त्याचा आदर करणे. त्याच्या उन्नतीसाठी कार्य करणे. त्याची विविधता आणि वारसा साजरा करणे हे नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे.

२. बंधूभाव :

सारे भारतीय माझे बांधव आहे या ओळींतून बंधूत्वाची भावना लक्षात येते.भारतामध्ये प्राचीन काळापासुन बंधुत्व व भ्रातृभाव समाजात रुजविण्याच्या दृष्टीने अनेक प्रयत्न झाले. मुख्यत्वे संताच्या कृती–उक्तीतून ही बंधूत्वाची प्रेरणा समाजाला मिळत गेली. या संदर्भात आवर्जुन उल्लेख करावा लागेल तो म्हणजे वारकरी संप्रदायाचा. संतांच्या अभंगवाणीतून प्रकटणारी बंधूत्वाची भावना ही मुख्यत्वे आध्यात्मिक पातळीवरती होती. एवढेच नव्हे तर स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेमध्ये माझ्या बहिणी आणि बंधूनो.... या शब्दांनी सुरु झालेल्या त्यांच्या भाषणासाठी ते फार प्रसिध्द आहेत. एवढच नव्हे तर आप – ल्यातील एक उदाहरण घेता येईल. आपल्या महाविद्यालया–तील अनेक विद्यार्थी हे भिन्न जातीचे, धर्माचे, पंथाचे, वर्णाचे असून देखील त्यांच्यामध्ये बंधूत्वाची, भावना आपल्या निदर्शनास येते.

३. विविधतेत एकता :

भारत हा एक असा देश आहे. जिथे वेगवेगळ्या भाषा बोलणारे वेगवेगळे पदार्थ खाणारे, विविध पोशाख परिधान करणारे, विविध धर्माचे, विविध संस्कृतीचे, वंशाचे, परंपरेचे लोक राहतात. समृध्दीने नटलेल्या कृषीप्रधान देशात विविध व धनधान्याचे डौलदार पीक नाच करतांना दिसतात.

४. सौजन्य :

या भारतमातेच्या कुशीमध्ये राहणाऱ्या सर्व मानवजातीशी मनुज हा सौजन्याने तथा आदराने वागण्याचे वचन देतो.

५. निष्ठा आणि कर्तव्य :

देश आणि देशबांधवांशी निष्ठा राखण्याची आणि त्यांचे कल्याण तसेच समृध्दीसाठी प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा भारतीय नागरीक करतो. तसेच पालक, वडीलधाऱ्या गुरुंना आदर करण्याचे वचन देते.

वरिलप्रमाणे आपण प्रतिज्ञेचा अर्थ समजू शकतो पण मला असे वाटते की, खरंच भारत माझा देश आहे अस आपण म्हणतो पण या देशाबद्दल किती जागरुक व कर्तव्यनिष्ठ आहोत व आपलं या देशावर किती प्रेम आहे हे आपल्या वर्तनातून व कृतीतून दिसते. आपण मिळालेल्या ज्ञानाचा जर आपल्या मातृभूमीला उपयोग होत नसेल तर ती विद्या व्यर्थ आहे. पण आजची स्थिती पूर्णपणे विरुध्द आहे. ज्या आई बाबाच्या मुले उच्च शिक्षीत होतात. त्या आई बाबाला वृध्दाश्रमाची वाट दाखवून

अतिशय आरामातील आयुष्य परदेशात व्यतीत करणारी कर्तव्यदक्ष मुलांची उदाहरण आपण पाहू शकतो. भारताला सोन्याचा धुर निघणारी चिडीया म्हटल जायचं. आज ही अवस्था फक्त बोलण्यापुरतीच मर्यादीत राहीली कशी ? तर येथे थुंकू नये असा फ लक असतो तेथेच आपण जावून थुंकतो. कुठं गेल आपलं कर्तव्य ? जेव्हा आपण अतिशय अभिमानाने एखादी गोष्ट सांगतो ही जमीन माझी आहे, ती बघ माझी १० लाखांची गाडी, माझी गाडी, गाडी, साडी या गोष्टी अभिमानाने जीवापलीकडे जपतो मग हीच आस्था 'भारत माझा देश आहे' असे म्हणतांना जाते कुठे ? ज्या वेळी आपण आपल्या देशातील अगदी छोट्यातल्या छोट्या गोष्टीकडे आदर भावाने, प्रेम भावाने ही गोष्ट माझी आहे असे म्हणून पाहू तेव्हाच त्या गोष्टी बद्दल मनात आस्था निर्माण होईल.

आज बंधूता ही नष्ट होतांना दिसत आहे. भाऊ भावाचा नाही राहील कुठे हरवली ही बंधूता. एवढच नव्हे तर विविधतेत नटलेल्या या देशाला काय जाणे कुणाची दृष्ट लागली जातीवरुन धर्मावरुन एकमेकांच्या जीवघेण्या इतपत प्रयत्न सुरु आहेत. एकमेकांविरुध्द कटकारस्थाने रचण्यात आज मग्न दिसताहेत.

शालेय प्रार्थनेतून देखील ही प्रतिज्ञा आता लुप्त होत चालली आहे. आपल्या प्रतिज्ञाचा विसर तर पडणार नाही याचा मला प्रश्न पडतो. या भारताचं भविष्य फार धोक्यात आहे. अस वाटायला लागल. यावर थोडा प्रत्येकाने विचार केल्यास ही मुल्यानूरुप प्रतिज्ञा व भारत देश व देशाचे भविष्य आपण वाचवू शकतो. उज्वल घडवू शकतो. हिच अभिव्यक्ती व्यक्त करते.



उचललेस तू मीठ मूठभर ब्रिटीश साम्राज्याचा खचला पाया



कु. पायल उल्हास राठोड
बी.ए. भाग ३

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्या दरम्यान, झालेला मिठाचा सत्याग्रह हा, भारतातील तत्कालीन ब्रिटिश शासनाने मिठासारख्या जीवनावश्यक गोष्टीवर लावलेल्या कराच्या विरोधात इ.स. १९३० साली घडलेला सत्याग्रह होता. यालाच दांडी सत्याग्रह असेही म्हणतात.

१४ फेब्रुवारी १९३० रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने जनतेला गांधीजींच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग करण्याचा आदेश दिला. मिठाचा सत्याग्रह याच चळवळीचा भाग होता.

दांडी यात्रा आणि सत्याग्रह :

मिठाच्या सत्याग्रहाची सुरुवात दांडी यात्रेने झाली. ही दांडी यात्रा (मोर्चा) साबरमती आश्रमापासून १२ मार्च १९३० रोजी सुरू झाली. गांधीजींच्या बरोबर त्यांचे ७८ निवडक अनुयायी होते. त्यात सरोजिनी नायडू, इला भट यांचा समावेश होता. यात्रा पुढे निघाली, तसतशी सहभागी लोकांची गर्दी वाढतच गेली. ही यात्रा २४ दिवस चालली आणि तिच्यातील लोक ३८५ कि.मी. पर्यंत पायी चालले. यात्रा दांडी येथे समुद्रकिनारी ६ एप्रिल १९३०ला पोहोचली. त्या दिवशी जेव्हा सकाळी साडे सहा वाजता गांधीजींनी चिमूटभर मीठ उचलून कायदेभंग केला, तेव्हा कायदेभंगाच्या मोठ्या प्रमाणावरील चळवळीची ती सुरुवातच ठरली. दांडीनंतर गांधीजी मीठ बनवत आणि सभांमध्ये भाषणे करत ते समुद्र किनाऱ्याने दक्षिणेकडे जात राहिले. दांडीच्या दक्षिणेला २५ मैलांवर असलेल्या धारासणा या ठिकाणी मिठाचा सत्याग्रह करण्याचे काँग्रेस पक्षाने ठरवले. पण त्यापूर्वीच ४-५ मे १९३० दरम्यानच्या रात्री गांधीजींना अटक करण्यात आली.दांडी यात्रा आणि धारासणा येथील सत्याग्रह यामुळे सर्व जगाचे लक्ष भारतीय स्वातंत्र्यलढ्याकडे वेधले गेले. मिठाचा सत्याग्रह म्हणजे असहकार चळवळीचा एक भाग होता. प्रत्यक्षात मिठावरचा कर हे केवळ निमित्त होते. गांधींना त्या मिषाने

लोकसंघटन आणि लोकजागृती साधायची होती. मिठावरील कराच्या विरोधातील हे आंदोलन पुढे वर्षभर सुरू राहिले. गांधीजींची तुरुंगातून सुटका आणि लॉर्ड आयर्विन यांच्याशी दुसऱ्या गोलमेज परिषदेतील चर्चा झाल्यावर हे आंदोलन थांबले. मिठाच्या सत्याग्रहाच्या आंदोलनाच्या दरम्यान ६०,०००हून अधिक भारतीय तुरुंगात गेले.

ओरिसातील मिठाचा सत्याग्रह :

दांडी येथील मिठाच्या सत्याग्रहापूर्वीच ओरिसात उत्पादित होणाऱ्या मिठावर ब्रिटिशांनी बसवलेल्या करामुळे तिथे १९२९ सालापासून आंदोलन सुरूच होते. तिथे मीठ तयार करण्यावर बंदी घालण्यात आल्यामुळे वातावरण तापलेले होते. गांधीजी दांडीला पोचण्यापूर्वीच ओरिसामधील लोकांनी मिठाचे उत्पादन सुरू ठेवण्याचा निर्धार केला. कटक येथे ओरिसाच्या वेगवेगळ्या भागातून स्वयंसेवक जमा झाले. मिठाच्या सत्याग्रहाबद्दल जाहीर सभा घेण्यात आल्या. या सभेत भाषणे करणाऱ्यांना ब्रिटिश सरकारने अटक करून तुरुंगात टाकले. ६ एप्रिलला गोपबंधू चौधरी आणि आचार्य हरिहर दास यांच्या नेतृत्वाखाली २१ सत्याग्रहींच्या तुकडीने स्वराज आश्रम, कटक येथून इंचुरी येथे मिठाच्या सत्याग्रह करण्यासाठी पायी जाण्यास सुरुवात केली.[३] ९ एप्रिलला चांडोल येथे गोपबंधू चौधरी यांना अटक झाली. तरी यात्रा सुरूच राहिली. १३ एप्रिलला इंचुरी येथे पोचलेल्या हजारो सत्याग्रहींनी मूठभर मीठ हातात घेऊन कायदेभंग केला. सत्याग्रहींच्या तुकड्या मीठ हातात घेऊन कायदा मोडत. पोलीस त्यांना अटक करत. मग सत्याग्रहींची पुढची तुकडी पुढे येत असे. सर्व तुरुंग भरून गेले तरी आंदोलनात नवीन लोक सहभागी होतच होते. इंचुरीमधील सत्याग्रहात महिलांची संख्या लक्षणीय होती. काही निदर्शने महिलांनी आयोजित केली होती. शेवटी सर्व सत्याग्रहींची तुरुंगातून सुटका झाली, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी हजारो लोक जमले होते.

मिठाच्या सत्याग्रहाने स्वातंत्र्य लढ्याला मोठे बळ मिळाले.जग बदलणाऱ्या १० महत्त्वपूर्ण आंदोलनात या सत्याग्रहाचा समावेश टाईम नियतकालिकाने केला आहे.

दे दी हमे आझादी,
बिना घड्ग बिना ढाल....
साबरमती के संत,
तूने कर दिया कमाल.....

नामदार गोपाळकृष्ण गोखले



कु. तृप्ती गणेश काळे
बी.ए. भाग ३

नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे भारतामधील ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध कायदेशीर राजकारणाच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचा पाया घालणाऱ्या राजकीय व सामाजिक नेत्यांपैकी एक होते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे आघाडीचे नेते व भारत सेवक समाज या संस्थेचे संस्थापक होते. मोहनदास करमचंद गांधी हे गोखल्यांचे शिष्य समजले जातात. 1885 ते 1905 राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतरचा पहिला कालखंड होता. तो मवाळमतवादी कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळातील मवाळ मतवादी गटाचे अग्रणी नेते म्हणून गोपाळकृष्ण गोखले हे ओळखले जातात. राजकारणाला आध्यात्मिकरणाचा विचार त्यांनी मांडला. एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादी राजकीय विचारवंतांच्या साखळीमध्ये एक महत्त्वाचे विचारवंत म्हणून गोपाळकृष्ण गोखले हे ओळखले जातात. भारतातील इंग्रजी सत्ता म्हणजे दैवी वरदान आहे असे मानणाऱ्या गोपाळ कृष्ण गोखले यांनी सनदशीर राजकारणाला तात्त्विक आणि व्यावहारिक मान्यता दिली. महात्मा गांधींनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात करताना गोपाळकृष्ण गोखले यांना आपले गुरू मानले. गोपाळ कृष्ण गोखले हे कुशल राजकारणी होते. राजकारणाच्या प्रति त्यांचा दृष्टिकोण उदारमतवादी होता. राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर घटनात्मक मार्गाचाच अवलंब केला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

राजकीय प्रवास

बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ कृष्ण गोखले या दोघांचा राजकीय प्रवास एकाच व्यासपीठावरून सुरू झाला. लोकमान्यांना जहालवादी राजकारण मान्य होते तर गोखलेंनी मवाळवादाचा मार्ग स्वीकारला. त्यांनी लोकशिक्षण, अस्पृश्यता/जातिनिर्मूलन, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य यांच्याशी संबंधित समाजकार्य केले. तत्कालीन इंग्रजी शासकांना समजेल अशा प्रकारे त्यांनी समाज सुधारणा मांडल्या आणि त्या मान्य करून घेतल्या.



राष्ट्रवाद



कु. वर्षा सुदाम पवार
बी.ए. भाग ३

'कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रात जेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याची योग्य पाठराखण होऊ लागते, तेव्हाच ते राष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनते' असे १८व्या शतकात 'इमॅन्युएल काण्ट' नावाच्या एका जर्मन तत्ववेत्त्याने म्हटले होते. हा काण्ट म्हणत असे, की कोणत्याही व्यक्तीच्या मनात स्वत:च्या काही उपजत प्रवृत्तींविरुद्ध जो संघर्ष सुरू असतो, त्यातूनच त्या व्यक्तीच्या आशा-आकांक्षांना एक नैतिक आशय प्राप्त होतो. म्हणजे व्यक्तींच्या अनुभूतींमधूनच जगण्यासाठीची नैतिक मूल्ये आणि नीतिमत्ता ही जन्म घेत असतात. व्यक्ति-व्यक्तींच्या अशा अनुभूतींसाठी समाजात व्यक्तिस्वातंत्र्य असणे गरजेचे असते. व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेला जेव्हा सामूहिक स्वरूप प्राप्त होते, तेव्हा त्यातूनच राष्ट्रस्वातंत्र्याच्या अस्मितेचा जन्म होतो. आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या अस्मितेलाच 'राष्ट्रवाद' असे म्हणतात.

राष्ट्रवादाचा उदय प्रथम युरोपमध्ये झाला. युरोप मध्ये राष्ट्रवादाच्या विकास करण्यापूर्वी, लोक धर्म अथवा एखाद्या विशिष्ट नेत्या ऐवजी त्यांच्या राष्ट्रांबाबत साधारणपणे निष्ठावंत असतात. राष्ट्रवाद ही संकल्पना प्रथम जोहान गॉटफ्रीड हडर यानी वापरली.मार्क्सवाद राष्ट्रवादाच्या कोणत्याही सिद्धांत प्रदान करण्यात अयशस्वी झाला. जगातील कामगारांना एक व्हा असे म्हणणारे मार्क्स आणि एंजल्स असे म्हणत होते की कामगारांना कोणताहि देश नसतो.अगदी जवळजवळ अर्धा शतक औद्योगिकीकरण आणि कृषी अर्थव्यवस्था नंतर तिसऱ्या जगातील बहुतेक देशांमध्ये राष्ट्रवाद लढाई मध्ये पायचीत आहे. एकूणच मार्क्सवादी असे मानतात की भांडवलशाहीच्या विकासात राष्ट्रवादाचे योगदान जास्त आहे. राष्ट्रवाद राष्ट्रवाद ही व्यापक संकल्पना असून काळातील बदला प्रमाणे राष्ट्रवाद या संकल्पनेत बदल होत जातात भौगोलिक एकता असलेल्या प्रदेशात वस्ती करणारा वांशिक लोकसमुदाय हा एक राष्ट्राचा भाग असतो राष्ट्रवादी एक मानसिक भावना आहे ज्या माध्यमातून एका विशिष्ट भागात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये एकात्मतेची भावना निर्माण केली जाते.

राष्ट्रवाद ही एक विचारधारा आहे जी राष्ट्र किंवा राष्ट्र-राज्याप्रती निष्ठा, भक्ती किंवा निष्ठा यावर जोर देते आणि असे मानते की अशा जबाबदाऱ्या इतर वैयक्तिक किंवा गट हितांपेक्षा जास्त आहेत.

इ.स. १९०२ साली त्यांची निवड केंद्रीय मध्यवर्ती कायदेमंडळावर झाली, आणि ते नामदार झाले. या निवडीचा त्यांनी पूर्णपणे उपयोग केला आणि विविध समस्यांना तसेच प्रश्नांना वाचा मिळवून दिली. या दरम्यान त्यांच्यातील क्षमतेची दखल घेऊन तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांनी नामदारांना १९०९ सालच्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्यासाठी ते इंग्लंड येथे वास्तव्य करून होते. त्या दरम्यान त्यांनी तेथील पार्लमेंटच्या सदस्यांना भेटून भारतातील समस्या आणि प्रश्न त्यांच्या कानी घातले आणि त्याकारणी त्यांचा पाठिंबा मिळविण्यात यशस्वी झाले. इ.स. १८८९ मध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावर केलेल्या पहिल्या भाषणापासून त्यांचा काँग्रेसशी संबंध प्रस्थापित झाला. इ.स. १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. १९०११ मधे त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे म्हणून पाहिले विधेयक इम्पीरियल कौन्सिल मधे मांडले.

नामदार गोखले यांच्या स्मरणार्थ पुणे शहरात 'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पालिटिक्स ॲन्ड इकानामिक्स' नावाची संस्था स्थापन करण्यात आली आहे. आसामी इतिहासकार डॉ. सूर्यकुमार भुयां यांनी गोखले यांच्या निधनानंतर आसामी भाषेत १९१६-१७ या काळात लिहिलेल्या गोखल्यांच्या पहिल्या चरित्राचे मराठी भाषांतर ९४ वर्षांनी म्हणजे २०११ साली मराठीत आले. हे भाषांतर विद्या शर्मा यांनी केले आहे.

राष्ट्रीय गीत : वंदे मातरम्



यश हिवराळे
बी.ए. भाग २



वंदे मातरम् बंकीमचन्द्र चट्टोपाध्याय द्वारा संस्कृत बांग्ला मिश्रीत भाषेत रचलेले हे गीत त्यांच्या १८८२ मध्ये प्रकाशीत झालेल्या 'आनंद मठ' मध्ये लिहीले होते. या उपन्यासमध्ये हे गीत भावनन्द नावाच्या संन्यासी द्वारा गाईले गेले आहे. या गीताचे गायन करण्यासाठी ६५ सेकंद चा वेळ लागतो. सन २००३ मध्ये बीबीसी वर्ल्ड सर्व्हिस द्वारा आयोजित एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणात ज्यामध्ये त्यावेळचे सर्वात प्रसिध्द दहा गाण्यांची निवड करण्यासाठी जगभरातून जवळपास ७००० गाणे निवडल्या गेले आणि बी बी सी नुसार १५५ देश / बेटांच्या लोकांनी या मध्ये मतदान केले. ज्यामध्ये हे गीत दुसऱ्या स्थानावर होते.

सन १८७०–८० च्या दशकात ब्रिटीश शासकांनी सरकारी समारोहांमध्ये 'गॉड, सेव्ह द क्वीन' गीत गाणे अनिवार्य केले होते. इंग्रजांच्या या आदेशाने बंकीमचन्द्र चॅटर्जी यांना खुप वाईट वाटले जे त्यावेळेसचे सरकारी अधिकारी होते आणि म्हणूनच त्यांनी १८७६ मध्ये याचा विकल्प म्हणून संस्कृत आणि बांग्ला मिश्रीत एका नवीन गीताची रचना केली ज्याचे शिर्षक होते – 'वन्दे मातरम्'

बंगालमध्ये चालत असलेल्या स्वाधीनता आंदोलना दरम्यान अनेक मोर्च्यांमध्ये उत्साह भरण्यासाठी हे गीत गायले जावू लागले. ब्रिटीश सरकार याच्या लोकप्रियतेमुळे भडकली आणि त्यांनी यावर प्रतिबंध लावण्याचा विचार सुरु केला. सन १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशन मध्ये गुरुदेव रविन्द्रनाथ टागौर यांनी हे गीत गायले. पाच वर्षा नंतर म्हणजेच सन १९०१ मध्ये कलकत्त्यामध्ये झालेल्या आणखी एका अधिवेशनात श्री चरणदास यांनी हे गीत पुन्हा गायले. सन १९०५ च्या बनारस अधिवेशनामध्ये या गीताला सरलादेवी चौधरींनी स्वर दिला.

काँग्रेस अधिवेशनाशिवाय स्वातंत्र्य आंदोलनाच्या वेळेस हे गीत गायल्या गेल्याचे बरेच उदाहरण आहेत. लाला लजपतराय राय यांनी लाहौरहून ज्या जनरल चे प्रकाशन सुरु केले होते. त्याचे नांव वंदे मातरम ठेवले. इंग्रजांच्या गोळ्यांना बळी पडून जीव गमावणाऱ्या स्वातंत्र्याच्या प्रेम मातंगिनी हाजरा च्या जीभेवर शेवटचे शब्द वंद मातरम हेच होते. सन १९०७ मध्ये मॅडम भिकाजी कामा यांनी जेव्हा जर्मनीतील स्टूटगार्ड मध्ये तिरंगा फडकविला तेव्हा त्याच्या मध्यात 'वंदे मातरम' हे शब्द लिहीले होते. आर्य प्रिंटींग प्रेस,लाहौर तसेच भारतीय प्रेस देहरादून येथून प्रकाशीत काकोरीचे शहीद पं.रामप्रसाद बिस्मील यांचे प्रतिबंधित पुस्तक 'क्रांती गीतांजली' मध्ये पहिले गीत 'मातृ – वंदना' वंदे मातरम् हे होते ज्यामध्ये त्यांनी केवल या गीतामधील दोन पद घेतले होत आणि त्यानंतर या गीताच्या प्रशस्तीमध्ये वंद मातरम शीर्षक ने एक स्वरचीत उर्दु गजल दिली होती. जे त्या कालखंडातले असंख्य अनाम हुतात्म्यांच्या आवाजाला अभिव्यक्ती देते

स्वाधीनता संग्राममधील या गीताच्या निर्णायक भागीदारी असूनही जेव्हा राष्ट्रगानच्या चयनाची गोष्ट आली तेव्हा वंदे मातरम् च्या जागेवर रवीन्द्रनाथ ठाकुर द्वारा लिखीत व गायल्या गेलेले गीत जन गण मन ला प्राधान्या दिल्या गेले. हे गीत आनंद मठ या उपन्यासामध्ये लिहीलेले आहे. जवाहर नेहरुच्या अध्यक्षतेच्या खाली एक समिती गठीत करण्यात आली त्यांनी या संपूर्ण गीताचा अभ्यास करुन सुरुवातीचे दोन कडवे राष्ट्रीय गीत म्हणून मान्य केले कारण त्यामध्ये मातृभूमीची प्रशंसा केलेली होती. अशा प्रकारे रवीन्द्रनाथ ठाकुरच्या जन–गण–मन अधिनाय जय हे ला राष्ट्रगान राहू दिले आणि मोहम्मद इकबालच्या समुदाय सुर 'सारे जहाँ से अच्छा' सोबत बंकीमचन्द्र चॅटर्जी द्वारा रचित प्रारंभीचे दोन पदांना राष्ट्रीय गीतची स्विकृती मिळाली.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉ. राजेंन्द्रप्रसाद यांनी संविधान सभेत २४ जानेवारी १९५० ला 'वंदे मातरम्' ला राष्ट्रीय गीतच्या स्वरुपात स्विकार करण्यासंबंधी वक्तव्य वाचले ज्याला सर्वांनी स्विकार केले.



हिंदी विभाग

मेरी माटी मेरा देश



कु. प्राची सुनिल बुट्टीकर
बी.कॉम. भाग २

मातृभूमी, अपना देश ही हमारी पहचान होती है । हर व्यक्ती का जीवन उसके देश से जुडा होता है, जिसकी मिट्टी पर वह खडा होता है । भारत हमारी मातृभूमी हमारे पवित्र स्थान रखती है । मिट्टी हमारे जीवन का आधार होती है । हम सभी उसी मिट्टी से बने हुये है और उस मिट्टी में लिपटे रहते है । मिट्टी ही हमे आहार प्रदान करती है । जीसके बिना हमारा जीवन संभव नही है ।

भारत विविधता में बोया हुआ एक देश है और यह विविधता उसकी मिट्टी में भी प्रकट होती है । भारत की मिट्टी के अनेक प्रकार है – कानौनी, लाल, मिट्टीलोई, बालू, कच्ची, बारेन आदी । हर प्रकार की मिट्टी का अपना महत्व होता है । उसमें अपनी खासीयतें होती है । यही विविधता हमारे देश को खेती–बाडी–उद्योग आदि में भी आवश्यक सहाय्यक होती है ।

भारतीय संस्कृती में मिट्टी का विशेष महत्व है । हमारे पूर्वजो ने मिट्टी को देवी माँ की भांती पुजा है और उसे अपने जीवन में अत्याधिक महत्व दिया हे । मिट्टी से बने अनेक आवश्यक उपकरण, घर, खिलोने आदि हमारी संस्कृती की महत्वपूर्ण हिस्सा माना जाता है । भारत की मिट्टी में अद्वितीय जैव विविधता होती है । यहाँ पर विभीन्न प्रकार के वन्यजीव, पक्षर, जानवर आदि पाये जाते है । हमारे देश के अलग अलग क्षेत्रों में विभीन्न प्रकार की वनस्पतीयाँ उगती है जो हमारे पर्यावरण को संतुलित रखने की महत्वपूर्ण भूमिका निभाते है ।

मिट्टी का समाज में विशेष महत्व होता है । किसान जन जीवन में मिट्टी के बिना कुछ भी संभव नहीं होता । भारतीय संस्कृती में कई पर्वो और संस्कृती त्यौहारों में भी मिट्टी का महत्वपूर्ण योगदान होता है । जैसे दिवाली में मिट्टी के दिपक, होली में रंगो की मिट्टी आदि ।

मेरी माटी मेरा देश हमारे देश के विविधता, सांस्कृतिक धरोहर, जैव विविधता और समाज में अपनी महत्वपूर्ण भूमिका की चर्चा करता है । हमे अपनी मिट्टी की सुरक्षा करनी चाहिए । उसके साथ मेल करके उसके संरक्षण में भागीदारी बनाना चाहिए ताकी हम आनेवाली पिढीयों को एक स्वच्छ, हरीत और समृध्द देश का आनंद उठाने का अवसर प्रदान कर सके ।

मेरी माटी मेरा देश,
मिठी बोली वाला देश ।

निली छत सोनी धरती,
काली मिट्टी इस के केश ।

जितने धर्म उतने रंग,
फुलवारी सा इसका वेश ।

परचम हो अपना उपर,
चाहे कोई हो प्रदेश ।

देते गीता या कुरान
इंसानियत भरा संदेश ।

– स्वरंचित काव्यपंक्ती

हमारा मिट्टी हमारा देश



मुन्नव्वर फातेमा अ. मन्नान
बी.एस्सी. भाग १ (बायो.)

मेरी माटी मेरा देश एक महत्वपूर्ण एवं गौरवपूर्ण विषय है। हमारा देश भारत अपनी अनूठी संस्कृति, विविधता और समृद्धि के लिए प्रसिद्ध है। हमारे देश की समृद्ध विरासत और प्राचीन इतिहास हमें अपने देश पर गर्व महसूस कराता है।

हमारी मिट्टी जो हमारी भूमि का निर्माण करती है वह हमारे जीवन का एक महत्वपूर्ण हिस्सा है। हमारी मिट्टी जो हमारी भूमि का निर्माण करती है वह हमारे जीवन का एक महत्वपूर्ण हिस्सा है। हमें भोजन, फल और सब्जियाँ मिलना आवश्यक है। इसके साथ ही हमारे देश में विभिन्न विरासतों का मिश्रण भी है, जो हमारे देश की पहचान बनाते हैं।

हमारे देश में अनेक भाषाएँ, धर्म, जातियाँ और संस्कृतियाँ समाहित हैं और इसमें एकता का भी भरपूर भंडार है, जो हमारे देश की विशेषता है। हमारे देश में कई खेलों और कलाओं की परंपरा है, जैसे क्रिकेट, हॉकी, भारतीय संगीत, नृत्य आदि। यहां के महान वैज्ञानिकों, लेखकों और कलाकारों ने अपने कौशल से दुनिया को प्रेरित किया है।

हम सभी को अपने देश की देखभाल करने में भूमिका निभानी है और जिस तरह हमारा घर जहां हम रहते हैं वह हमारा है और हम इसकी अत्यधिक देखभाल करते हैं, उसी तरह देश में जहां हम रहते हैं हमारी भूमि की भी अच्छी तरह से देखभाल की जानी चाहिए।

इस प्रकार, हमारे देश में उपलब्ध मिट्टी हमारा सबसे मूल्यवान संसाधन है और हमारा देश भारत हमारी गरिमा और कृतज्ञता की कहानी है। हमें प्रेम और समर्पण के साथ अपने देश के विकास में योगदान देना चाहिए।

माटी को नमन वीरों को वंदन



मिसबा शेख शफी
बी.एस्सी. भाग – १ (बायो.)

कर रहे आज हम सब दिल से
माटी को नमन, वीरों को वंदन

दोनो ही शान देश की
दोनो पर गर्व करता है मेरा वतन

चंदन है इस देश की माटी
जिसका रक्षा करते है वीर जवान

आओ मिलकर नमन करे इस माटी को
इसकी महिमा बडी है महान

जन्मे है ऐसे वीर सपुत इस माटी में
इस माटी का कण कण कोहीनुर है

हर वीर सपुत देश का इस माटी पर
अपना तन-मन वारता है

आये चाहे किसी देश से मेरे देश के
वीरो से दुश्मन हारते है

देश के वीर शहीदों पर हर
भारतवासी को नाज है

अपने साहस और शौर्य से जिन्होंने
हरदम रखी इस माटी की लाज है

देश की माटी को नमन
देश के वीरों को वंदन



भारतीय स्वतंत्रता संग्राम की महत्वपूर्ण घटनाएँ



कु. श्रृती सुनिल बेहरे
बी.ए. भाग – २

भारत को आजाद कराने में कुछ महत्वपूर्ण घटनाओं ने भूमिका निभाई थी. आइये इस लेख के माध्यम से उन घटनाओं के बारे में अध्ययन करते हैं

भारत को आजाद हुए 72 साल हो चुके हैं. परन्तु क्या आप जानते हैं कि ऐसे कौन से सबसे महत्वपूर्ण घटनाएं हैं जिनके कारण भारत को आजादी मिली.

ब्रिटिश, भारत में राजनीतिक सत्ता 1757 में पलासी के युद्ध के बाद जीत गए. यही वो समय था जब अंग्रेज भारत आए और करीब 200 साल तक राज किया. क्या आप जानते हैं कि 1848 में लॉर्ड डलहौज़ी के कार्यकाल के दौरान ही यहां अंग्रेजों का शासन स्थापित हुआ था.

The Activity was organized by Department of Botany on **14th October 2023** for B.Sc. II Semester III students to aware and motivate students about biodiversity of flora in botanical garden for plant identification and their medicinal and ecological importance by studying them. Visit was guided by Dr. M. M. Dhore Head Department of Botany and Prof. P. V. Gadkar.

➢ **World wetland day 2024**

World wetland day 2024 on theme Wetlands and human wellbeing celebrated by department of botany on **2nd February 2024** at department of botany (UG Lab), which reminds us that our health is dependent on the health of wetlands. The event takes place under the guidance of respected Principal Dr. A. R. Ladole. The event had in attendance Dr. M. M. Dhore Head, Dept. Of Botany, Dr. S. M. Deosthale, Prof. P. V. Gadkar, Dr. P. S. Lachure, non teaching staff as well as B.Sc. I year students of Botany. Total 30 participants were present on this event

➢ **Flower arrangement and flower show competition**

Competition was organized by Department of botany and cultural program committee on **10th February 2024.** Respected Sub divisional officer Shri. Khadse DVSPM President Shri Vijaykumarji Bang, Secretary Dr. Abhay Patil and Principal Dr. A. R. Ladole inaugurated the competition. Total 20 Participants were present on this event.

➢ **Botanical Model Competition 2024**

Competition was organized by department of botany on **28th February 2024** at department of botany (UG Lab) on the occasion of National science day. The event took place under the guidance of respected Principal Dr. A. R. Ladole. The event had in attendance Dr. M. M. Dhore Head, Dept. Of Botany, Dr. S. M. Deosthale, Prof. P. V. Gadkar, Dr. P. S. Lachure, non teaching staff as well as B.Sc. I, B.Sc. II and B.Sc. III year students of Botany. Total 23 students participated in the competition. Students presented various models on subject botany, out of 23 participants 3 winners of competition were announced. First prize was given to Ku. Munnawar Fatema B.Sc. I, Second to Ku. Misbah Shaikh and third prize to Ku. Priya Burkunde of B.Sc. III.

One Day International Conference on 'Global Perspectives in Higher Education: Issues, Challenges & Remedies'

The Multidisciplinary International Conference was organized on Global Perspectives in Higher Education: Issues, Challenges & Remedies on 9th March 2024 in association with MungsajiMaharaj Mahavidyalaya, Darwha, and Arts & Commerce College Bori Arab. Around 1064 participants forwarded their registrations for the said conference from across and beyond the country. We received 565 research papers from various research scholars and faculties. Hon'ble Shri. Vijaykumarji Bang presided over the Inaugural session, Dr R.S. Pradhan (Nepal), Dr D.R. Sharma (Nepal) and Dr Syed Azharuddin (Sambhajinagar) were the resource speakers for the international Conference.

इतिहास विभाग अहवाल

इतिहास विभागातील वार्षिक कार्यक्रमाची भूमिका प्रभावीपणे निभावण्यासाठी, इतिहास विभाग अंतर्गत दि. १२ ऑक्टोबर २०२३ रोजी इतिहास अभ्यास मंडळाचे उदघाटन करण्यात आले. सदर मंडळात या वर्षाचे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अक्षदा पवार (अध्यक्ष), दुर्गादास चव्हाण व इतर अन्य विद्यार्थ्यांची नियुक्ती करण्यात आली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रा.डॉ.ए.डी.जाधव यांनी आपत्ती व्यवस्थापन या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.डॉ.आर.आर. वानखडे तर प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा.डॉ. व्ही.के. जाधव, प्रा.डॉ.व्ही.आर. रोटे सर यांनी भूषविले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५६ व्या इतिहास अधिवेशनात दि. २ मार्च २०२४ रोजीच्या सत्रातील प्रमुख वक्ता म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा.पी.व्ही.गावंडे यांचा सन्मान करण्यात आला. सदर सत्रात शहीद भगतसिंग लिखीत : नये नेताओ के अलग अलग विचार या विषयावर त्यांनी मांडणी केली. सदर व्याख्यानाचे उपस्थितांनी स्वागत व कौतुक केले.

भारतीय लोकशाहीचा उत्सव अर्थात लोकसभा निवडणूक २०२४ करिता भारत सरकार पुरस्कृत मतदान जागृती अभियान 'चुनाव का पर्व : देश का गर्व' निमित्ताने इतिहास विभाग अंतर्गत आभास पध्दतीने 'मतदार ई–शपथ' कार्यक्रम राबविण्यात आला. बी.ए.भाग तीन मधील विद्यार्थ्यांनी या आभास पटलावरील अभियानात सक्रीय सहभाग नोंदवून भारतीय लोकशाही बळकट करण्याचा निर्धार केला. लोकसभा निवडणूकीत प्रथमच मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभियानामुळे धर्म, जात, पंथ, भाषा विरहीत मुक्त वातावरणात मतदान करण्याची प्रेरणा मिळाली.

भारत सरकार पुरस्कृत 'संकल्प से सिध्दी' अभियान अंतर्गत महिला सक्षमीकरण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर इतिहास विभागाने सदर अभियानात आपला सक्रीय सहभाग नोंदविण्यासाठी बी.ए. भाग दोन मधील विद्यार्थ्यांसाठी महिला अधिकार ई–शपथ' कार्यक्रमाचे आभासी पध्दतीने आयोजन केले. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भारत सरकारच्या आभासी माध्यमावर महिलांच्या अधिकारावर गदा आणणाऱ्या कोणत्याही वर्तनास, भाषेस वा इच्छेस बळी न पडण्याची शपथ घेतली.

– शारीरिक शिक्षण विभाग –



कु. भाग्यश्री रवी चव्हाण बी.एस्सी. भाग १ मध्ये शिकणाऱ्या या खेळाडूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर महाविद्यालय जुदो स्पर्धा मध्ये ४८ किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले आहे. तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर महाविद्यालय २१ किलोमिटर हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे आणि दहा हजार मिटर धावणे स्पर्धा मध्ये रौप्य पदक प्राप्त केले आहे. त्यामुळे तिला विद्यापीठाचा कलर कोट प्राप्त झाला आहे.



साबीर अक्रम चव्हाण बी.ए. भाग १ मध्ये शिकणाऱ्या या खेळाडूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर महाविद्यालय जुदो स्पर्धा मध्ये ६६ किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले असुन त्याची निवड अखिल भारतीय विद्यापीठासाठी जुदो स्पर्धा करिता झाली आहे. आणि त्याने विद्यापीठाचा कलर कोट प्राप्त झाला आहे.



सागर दिनेश जाधव बी.एस्सी. भाग १ मध्ये शिकणाऱ्या या खेळाडूने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर महाविद्यालय जुदो स्पर्धा मध्ये ६० किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले असुन विद्यापीठाचा कलर कोट प्राप्त झाला आहे. तसेच त्याने वेस्ट झोन आंतर विद्यापीठ जुदो स्पर्धेत ६० किलो वजन गटात रौप्य पदक प्राप्त केले आहे आणि त्यामुळे त्याची पुढे निवड अखिल भारतीय विद्यापीठ जुदो स्पर्धे करिता झाली व त्यात त्याने पाचवा क्रमांक प्राप्त केला, सदर स्पर्धा पंजाब येथील अमृतसर येथे झाली होती. पूर्ण भारतातून त्याने पाचवा क्रमांक प्राप्त केल्यामुळे त्याची खेलो इंडिया आंतर विद्यापीठ जुदो स्पर्धा गुवाहाटी आसाम येथे झाली आणि त्या स्पर्धेत सुध्दा त्याने पाचवा क्रमांक प्राप्त केला ही बाब संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि आपल्या महाविद्यालयासाठी खूप मोठी गोष्ट आहे.



प्रा.संजय मोटे रसायनशास्त्र विभागचे प्राध्यापक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती ची मुला–मुलींची जुदो टीमचे मॅनेजर म्हणून काम केले तसेच त्यांनी पंजाब अमृतसर येथे वेस्ट झोन आंतर विद्यापीठ जुदो स्पर्धा आणि अखिल भारतीय विद्यापीठ स्तर जुदो स्पर्धा पंजाब अमृतसर येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती टीमचे व्यवस्थापक म्हणून कार्य केले असता त्यांच्या अंतर्गत मार्गदर्शनाखाली संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला एक रौप्य पदक जे सागर दिनेश जाधव आपल्या महाविद्यालयाचा विद्यार्थी याने जिंकले ही अतिशय महत्वाची बाब आहे. त्याकरिता त्यांना विद्यापीठाने कलर कोट देवून सन्मानित केले आणि त्यांच्या अंतर्गत मार्गदर्शनाखाली सागर जाधवने रौप्य पदक प्राप्त केल्यामुळे त्यांचा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या द्वारे सत्कार करण्यात आला.



कु. साक्षी कांबळे बी.ए. भाग १ मध्ये शिकणाऱ्या या खेळाडूने नुकत्याच नागपूर येथे झालेल्या सुवर्ण महोत्सव राज्य स्तरीय जुदो स्पर्धा मध्ये यवतमाळ संघाचे प्रतिनिधीत्व करुन स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे. यापूर्वी तिने राज्यस्तरीय स्पर्धेत रौप्य पदक आणि कांस्यपदक प्राप्त केले आहे. तसेच नागपूर येथील विदर्भस्तरीय जुदो खासदार चषक स्पर्धेत तिने रौप्य पदक प्राप्त केले आहे.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ कलर कोट चे मानकरी महाविद्यालयीन विद्यार्थी व प्रशिक्षक प्रा. डॉ. आर.एम.कदम

कनिष्ठ महाविद्यालय भाषानिहाय संपादक मंडळ



प्रा.एच.आर.देशपांडे
(पर्यवेक्षक)





प्रा. पी.एम. दिवे
(एच.एस.सी.व्होकेशनल प्रमुख)

मराठी



प्रा. जी.पी. खंडारे



प्रा. सी.एन.खिराडे

हिन्दी



प्रा. डी.जी.चौधरी



प्रा.आर.जी.मेश्राम

इंग्रजी



प्रा.सी.टी.जोगीया



प्रा.धीरज एन.राहुतिया

विद्यार्थी संपादक मंडळ

मराठी विभाग



कु. अंजली ठाकरे
१२ वा (कला)

हिन्दी विभाग



कु. युक्ति राठोड
१२ वा (विज्ञान)

इंग्रजी विभाग



कु. नंदनी राठोड
१२ वा (कला)

कनिष्ठ महाविद्यालय मराठी विभाग

राष्ट्रवादाचा उदय आणि विकास



कु. युक्ती ज्ञानेश्वर राठोड
वर्ग १२ (अ) वा विज्ञान

१.१ प्रास्ताविक :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि विकास होऊ लागला. ब्रिटीश सत्तेविरुद्ध जनतेच्या मनामध्ये असंतोष निर्माण होऊन त्याचा परिणाम म्हणजे आपण पारतंत्र्यात असून आपण पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वतःचे एक राष्ट्र, सरकार स्थापन केले पाहिजे. त्यासाठी ब्रिटिशांना प्रथम भारतातून घालवून दिले पाहिजे अशी जाणिव जनतेमध्ये होऊ लागली. जनतेमध्ये निर्माण होणारी राष्ट्रवादाची भावना ब्रिटिशांना आवडणारी नव्हती. त्यांनी भारतीयांमध्ये निर्माण होणाऱ्या राष्ट्रवादी भावनेला विरोध करण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर लिखाण केले. कुपलँड हा अधिकारी म्हणतो "Indian Nationalism was the child of the British Raj, and the British authorities blassed its cradle." थोडक्यात त्याच्या मतानुसार 'भारतीय राष्ट्रवाद इंग्रज सत्तेचे अपत्य आहे' अशीच भूमिका जॉन स्ट्रॅचीने केंब्रिज विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांसमोर बोलताना घेतली होती. तो म्हणतो, ''भारतासंबंधी सर्वप्रथम व सर्वात आवश्यक जाणून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे 'भारत' अस्तित्वात नाही आणि कधीही नव्हता.'' याच्याही पुढे जाऊन त्याने असे भाकीतही केले की, ''भारत कधीही एक राष्ट्र बनणार नाही'' (India will never become a United Nation) ब्रिटिशांच्या या वैचारिक मांडणीला विरोध करण्यासाठी सुशिक्षित भारतीय आपल्या गौरवशाली इतिहासाकडे वळले आणि त्यातून भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखनाला सुरुवात झाली.

ब्रिटिशांच्या सामाजिक–आर्थिक धोरणांमुळे तसेच त्यांनी येथे निर्माण केलेली आधुनिक व्यवस्थेमुळे भारतीय राष्ट्रवादाच्या उदयास चालना मिळाली.

१.२ विषय विवेचन

१.२.१ 'राष्ट्रवाद' संकल्पना

प्रास्ताविक

राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद या संकल्पना परस्परांशी संलग्न आहेत. विशिष्ट भू–प्रदेशात कायमस्वरुपी वस्ती करून राहणाऱ्या लोकांचा समुदाय जेव्हा सार्वभौम सरकार स्थापन करतो, तेव्हा त्यास राज्य म्हणतात. अशा राज्यातील लोकांना आपल्या प्रदेशाविषयी प्रेम, अभिमान वाटतो तेव्हा त्यास 'राष्ट्र' असे म्हणतात. राष्ट्राविषयी प्रेम, निष्ठा, अभिमान असणे यास राष्ट्रीयत्वाची भावना म्हणतात.

राष्ट्र (Nation)

राष्ट्र या संकल्पनेचा उदय युरोपमध्ये झाला. राष्ट्र या शब्दाला इंग्रजी भाषेत छरींळेप हा शब्द आहे. Nation हा शब्द Natus (जन्म/वंश) या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. Natus किंवा Natio या अर्थ एकाच वंशात जन्मलेले लोक राष्ट्र निर्माण करू शकतात.

व्याख्या

'राष्ट्र' या संकल्पनेच्या विविध विचारवंतानी विविध व्याख्या केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

१. प्रा गार्नर :

राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक एकता असलेला समूह होय. अशा समूहातील लोक आपल्या वैचारिक व मानसिक जीवनाची व आचारांची एकता टिकविण्याचा जागरूकतेने व चिकाटीने प्रयत्न करतात.

२. बर्जेस :

राष्ट्र म्हणजे भौगोलिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र म्हणतात.

३. लिकॉक :

वांशिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात.

४. एम. हॅसर :

समान भाषा किंवा समान वंश यामुळे नव्हे, तर लोकांच्या एकत्रित राहण्याच्या इच्छेतून राष्ट्र निर्माण होते.

५. हॅन्स कोहोन :

राष्ट्र म्हणजे निश्चित अशा भूप्रदेशावर वास्तव्य करणारा लोकसमुदाय की जो स्वतःस स्वतंत्र सार्वभौम सत्ताधारी राज्यात परावर्तित करण्याची इच्छा बाळगतो. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत कार्य करतो आणि आपण सर्व एक आहोत अशी समान भावना बाळगतो.

✤ भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे

१. प्रेरणा–प्रतिक्रिया संघर्ष

परंपरागत भारतीय इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रवादाची वाढ म्हणजे इंग्रजांच्या संस्था, साधनसामग्री आणि संधीमुळे मिळालेल्या प्रेरणेने झालेल्या भारतीय प्रतिक्रियेचा परिणाम म्हटले आहे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास काही मर्यादेपर्यंत त्याची प्रतिक्रिया ह्यांचा परिणाम म्हणजे भारतीय राष्ट्रवाद.

२. ब्रिटिश सत्तेचा प्रभाव :

ब्रिटिश शासकांनी भारतावर आपली पकड मजबूत करण्यासाठी भारतीयांचे सर्वच क्षेत्रात शोषण करण्याचे आणि आधुनिक पद्धतीचे बदल करण्याचे धोरण अवलंबले. त्यांनी प्रशासनाचे आधुनिकीकरण घडवून आणले. परिणामी राष्ट्रवादाला चालना मिळाली.

३. भारताचे राजकीय ऐक्य

ब्रिटिश सत्तेचे संपूर्ण भारतावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नियंत्रण होते. इंग्रजी सत्तेने संपूर्ण भारतावर राजकीय ऐक्य लादले. एकच सत्ता, समान कायदेव्यवस्था, एकच प्रशासनव्यवस्था यामुळे भारत एकछत्री अमलाखाली आणला. ब्रिटिशांनी भारताचा बहुतेक भाग एका राजकीय व्यवस्थेअंतर्गत ठेवून सर्व प्रदेशांमध्ये एककेंद्री व एकसंघ प्रशासन व्यवस्था निर्माण केली. परिणामी भारतीयांमध्ये 'एकता' व 'राष्ट्राभिमानाची' भावना निर्माण झाली.

४. इंग्रजी शिक्षणाचा परिणाम

इंग्रजांनी आपल्या प्रशासनाच्या सोयीसाठी इंग्रजी शिक्षण देण्याचे धोरण स्वीकारून शाळा सुरू केल्या. भारतीय तरुणांची पाश्चात्त्य जगताशी ओळख होऊन त्यांना स्वातंत्र्य, लोकशाही, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीयता या संकल्पनांची तोंडओळख झाली. शिवाय सर्व भारतीयांना संपर्क भाषा म्हणून इंग्रजीचे महत्त्व समजून आले.

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील संत, महात्मे, समाजसुधारक, राजकिय नेते, क्रांतीकारक यांचे योगदान....



कु. अंजली विनोद ठाकरे
वर्ग १२ वी (कला)

भारतीय स्वातंत्र्याबद्दल लिहितांना अंगावर शहारे विचारांना धार आणि लेखणीला वेग आपोआपच येतो. एके काळी भारताला सोने की चिडीया म्हटले जायचे, भारत देश ध्रुवाच्या ताऱ्याप्रमाणे चमकायला. एका कवीने एका ठिकाणी म्हटले आहे.

प्यारा रे प्यारा देश माझा प्यारा
चमके हा ध्रुवाचा तारा...
ऋषी मुनी वाणी जन्मली येथे,
गंगा गोदा कृष्णा वाहती येथे....
अति पवित्र पावन हो भुमी,
वाहाते ममता तुषार रे....

अशा या पवित्र भारत भुमीला ब्रिटीशांनी बेचिराख करुन टाकले होते. सामान्य माणसांच्या हक्क हिरावून घेवून गुलामगिरी लादली होती. इथला माणूस ब्रिटीशांच्या गुलाम गिरीत गुदमरून गेला होता. यामुळेच भारतीय माणूस कधी आपण या ब्रिटीशांच्या साखळदंडातून मुक्त होवू याची चातकासारखी वाट पाहत होता आणि यातूनच भारत मातेच्या कुशीतून एक एक रत्न जन्माला येवू लागले. ब्रिटीशांच्या विरुध्द सामान्या माणसाच्या मनात आग धगधगत होती. याचीच प्रचिती म्हणून अधुनमधून ज्वालामुखीचा उद्रेक व्हावा तसा ब्रिटीशांविरुध्द उद्रेक होत होता याची पहिली ठिणगी पडली ती बराकपूरच्या छावणी मध्ये मंगल पांडे यांनी ब्रिटीश अधिकाऱ्याला गोळ्या झाडून ठार केले आणि तेथूनच १८५७ च्या उठावाला सुरुवात झाली.

इथुन जी स्वातंत्र्य लढ्यासाठी क्रांतीकारकांनी मशाल पेटवली ती १९४७ पर्यंत कधीच विझली नाही. शेवटी याच मशालीच्या तेजाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला. भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून येथील महात्म्यांनी, नेत्यांनी, क्रांतीकारकांनी आपले आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवले. त्यामध्ये बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण गोखले, गो.ग. आगरकर, रासबिहारी बोस, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, पंडित जवाहरलाल नेहरु असे कितीतरी नेते भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटीशांविरुध्द लढले. कित्येक क्रांतीकारक फासावर चढले.... त्यामध्ये शहीद भगतसिंग, राजगुरु, सुखदेव असे कितीतरी सांगता येतील. ज्या वीरांनी भारत मातेच्या यज्ञकुंडात प्राणांची आहुती दिली आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सिंहाचा वाटा उचलला. भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालेले नाही यासाठी स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच असे ठणकावून सांगणारे लोकमान्य टिळक, तुम मुझे खुन दो, मै तुम्हे आजादी दूंगा असे गर्जून सांगणारे सुभाषचंद्र बोस, करा किंवा मरा असा टोकाचा संदेश देणारे महात्मा गांधी अशा अनेक महात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. इन्कलाब जिंदाबाद अशा घोषणा देवून भारत मातेसाठी फासावर जाणारे भगतसिंग, राजगुरु, सुखदेव अशा कितीतरी क्रांतीकारकाचे योगदान स्वातंत्र्य लढ्यात अमुल्य आहे. अनेक क्रांतीकारकांनी तुरुंगवास भोगला.

राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्रभाव निर्माण करण्याचे कार्य टिळकांनी हाती घेतले. स्वराज्याचे बीज सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी केसरी आणि मराठा वृत्तपत्रे सुरु केली. याच वृत्तपत्रातून त्यांनी 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का ?' 'सत्ता करणे म्हणजे सुड घेणे नव्हे' असे खुन होतात ? 'पुनश्च हरि ओम' हे लेख विशेष गाजले. टिळकांनी आपल्या लेखणीला शस्त्र बनवले आणि याच लेखनीने भारतीय तरुणात ज्वाज्वल्य देशभक्ती निर्माण केली.

त्याचप्रमाणे गांधीजींचे देशांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांच्या शिवाय भारतीय स्वांतत्र्य लढा पूर्ण होवूच शकत नाही. गांधीजींनी अनेक सत्याग्रह केले. त्यामध्ये चंपारण्य सत्याग्रह, मॉटेंग्यु चेम्पफोर्ड कायद्या विरुध्द सत्याग्रह, अहमदाबाद येथे गिरणी कामगारांचा संप केला. त्याचप्रमाणे दांडी यात्रा सुध्दा केली. अशा अनेक चळवळीतून महात्मा गांधीनी भारतीय स्वातंत्र्याचा पाया भक्कम तयार केला.



महात्मा गांधी



कु. हर्षदा सुदाम राठोड
वर्ग ११ वी (कला)

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचे वडील राजकोट येथे दिवाण होते. त्यांची आई एक धार्मिक स्त्री होत्या आणि स्वातंत्र्य लढ्यात महत्वपूर्ण भूमिका घेवून आणि देशाला स्वातंत्र्य करण्यात भाग घेतल्यामुळे त्यांना राष्ट्रपिता म्हणतात. हे नाव त्यांना सर्वप्रथम नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दिले. महात्मा गांधी मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यावर इंग्लंड गेले होते. जिथे त्यांनी न्यायशासनाचा अभ्यास केला. नंतर त्यांनी ॲडव्होकेट म्हणून काम करण्यास सुरुवात केली. नंतर बॅरीस्टर म्हणून भारतात परतले आणि मग मुंबईत वकील म्हणून काम करु लागले.

महात्मा गांधी यांना त्यांच्या एका भारतीय मित्राने कायदेशीर सल्ला घेण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत बोलावले होते. इथूनच त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. दक्षिण आफ्रिका गेल्यावर त्यांना एक विचित्र प्रकार अनुभवायला मिळाला. त्यांनी बघितले की कशा प्रकारे भारतीयांशी भेदभाव केला जात आहे. एकदा गांधीजींना स्वतः एका ब्रिटीश गोऱ्या वर्णाच्या माणसाने ट्रेन मधून बाहेर काढले होते कारण गांधीजी त्या ट्रेन मध्ये प्रथम श्रेणीतून प्रवास करत होते. त्या काळात गोर माणसंच फर्स्ट क्लास मधून प्रवास करणं आपल्या हक्क समजायचे. गांधीजींनी या घडलेल्या गोष्टवरुन प्रतिज्ञा घेतली की ते काळे आणि भारतीय लोकांसाठी लढतील. त्यांनी तिथे राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनासाठी सुधार केले त्यासाठी काही चळवळी केल्या दक्षिण आफ्रिकेमध्ये चळवळीच्या दरम्यान त्यांना सत्य आणि अहिंसा समजले.

महात्मा गांधी भारतात परत आल्यावर त्यांना तशीच परिस्थिती दिसली जशी त्यांना दक्षिण आफ्रिकेमध्ये दिसली होती. १९२० मध्ये त्यांनी नागरी, अवज्ञा चळवळ सुरु केली आणि ब्रिटीशांना आव्हान दिले १९३० मध्ये असहकार चळवळ ची स्थापना केली आणि १९४२ मध्ये त्यांनी ब्रिटीशांना भारत सोडून जाण्यास सांगितले. स्वातंत्र्याच्या चळवळत ते अनेक वेळा तुरुंगात देखील गेले. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळावे आणि १९४७ मध्ये भारत स्वातंत्र्य झाला. परंतू नाथुराम गोडसे नावाच्या व्यक्तीने ३० जानेवारी १९४८ रोजी ते संध्याकाळच्या प्रार्थनेसाठी जात असतांना महात्मा गांधी यांची गोळ्या घालून हत्या केली. शेवटी त्यांच्या मुखातून 'हे राम' शब्द निघाले व महात्मा गांधीचे आवडीचे भजन निघाले होते.

रघुपती राघव राजा राम, पतीत पावन सीता राम,
ईश्वर अल्लाह तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान...

महात्मा गांधीजी त्याच्यासाठी समर्पक शब्द आहे. 'महामानव' गांधीजी स्वतःला नेहमी 'एक सामान्य माणूस' मानत असत. त्यांनी आपल्या हातून घडलेल्या चुका प्रामाणिकपणे कबूल केल्या आणि कोणताही कमीपणा न बाळगता त्या सुधारण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करत होते.

महात्मा गांधीच्या कोणताही गोष्टी मोजमाप करण्यासाठी मानदंड वापरला जातो. मानवतेचे मापन करण्यासाठी वापरला जाणारा मानदंड म्हणजे महात्मा गांधीजी होय. महात्मा गांधीजींनी कोणतेही काम करतानां मानवजातीचा विचार केला. ते वकीलीचा व्यवसाय करण्यासाठी गेले होते. लोकांना समाजात समान वागणूक हवी, असे आग्रहपूर्वक सांगणारे महात्मा गांधीजी कचराकुंडी साफ करण्याचे काम करायला स्वतः सदैव पुढे येत होते. सर्व जाती जमातीतील जनतेने एकदिलाने राहावे. यासाठी ते जीवनभर झटले. एका प्रार्थनासभेत त्यांची भीषण हत्या झाली. गांधीजी देहाने हयात नाही, पण त्यांच्या अलौकीक कार्याने ते अमर झाले आहे.

देशप्रेम



कु. उर्मिला दिनेश डवले
वर्ग ११ वा (कला)

आम्ही भारतीय देशाचे खरे मावळे,
या मातीसाठी आम्ही जगावे-मरावे,
अशोक, राणा, शिवाजी-संभाजी सांगुण गेले
या मातीचे ऋण याच जन्मी कसे फेडावे ?

आम्ही सारे भारतीय याच मातीत संतान
तिच्या रक्षणासाठी सदैव आमचे तत्पर प्राण
रक्तांच्या नात्या पलीकडे आहे तिचेच मरण
तिच्या साठीच आम्ही करावे सर्वस्व अर्पण

डोंगर, पर्वत, नदी, नाले, हिमालय, वन,
तीन बाजुंनी अथांग सागरांचे भुषण
जिव-जंतु, विविध पक्षी, वनस्पती प्राणी
हेच आहे प्रत्येक मावळ्याचे खरे धन

तिच्या अस्तित्वातच आमचे सरंक्षण
म्हणून नैसर्गिक संपत्तीचे जतन
थांबववो अनाप-रानाप खनिजांचे दोहन
भारतीयांना मग मिळेल शुध्द वातावरण

सर्व भारतीय मध्ये बंधूभाव कायम असावा,
शिल्लक कारणासाठी काही नसावा दुरावा,
आपल्या कर्तुत्वाने देशाचा विकास करावा,
अंधश्रध्दा, मृतरुढी, मनभेदाचा त्याग करावा.

हक्कापेक्षा अधिक महत्व कर्माला द्यावे,
भू-मातीचे ऋण नि:स्वार्थ मनाने फेडावे,
याच्या पेक्षा काय आगळे वेगळे करावे,
देशप्रेमाचे हेच आमचे खरे ध्येय असावे.

ज्ञान आरोग्य ऐश्वर्य, शांती, समाधान,
न्याय बंधुत्व व सौख्य मनात, विराजमान,
प्रत्येक मावळाने बाळगावे हेच प्रण,
भारत देशचं असणारा मग विश्वात महान.

जय हिंद ! जय भारत !

राष्ट्रीय एकात्मता



कु. अनुराधा रामपाल झळके
वर्ग ११ वा (विज्ञान)

धगधगता एकात्मतेचा वारा वाहतो आहे
या आपुल्या भारत भूमीच्या मातीवरती
विविधतेने नटलेला, हा भारतदेश असे आपुला

हिंदू, शीख, बुध्द, इसाई
अन राहतात कोणी बेगडे
भाषा असती अनेक बहुती
असती अनेक त्यांची चाली रिती

कोणी लढती भारत भूच्या रक्षणासाठी
आणि कोणी पर भूमीच्या बुजच्या लोकांसाठी
कुठे सांडते रक्त देश सेवेसाठी अन कोणी काही
तो रक्त कोणी पर भूमीच्या स्वार्थी लोकांसाठी
कुठे गुलाब, पुष्प बरसते अन कुठे दगडांचे
घाव लागती

कोणी ठोकीती गोळी कुणा देश रक्षणासाठी
अन कोणी ठोकिती गोळी आपुल्याच लोकांवरती
राष्ट्रासाठी कोणी झेलतो दगडांची ही मार,
अन स्वार्थासाठी कोणी घालतो पैशाची ही माळ.

हवा आता बदल असा
राष्ट्रीय एकात्मते मध्ये
आपुल्या पुन्हा सूर वाहवा
आपल्या राष्ट्रीय गीतेचा

मेरी मिट्टी मेरा देश

तनझिम शेख अशपाक
वर्ग ११ वा

भारत को आजाद हुये ७५ वर्ष पुरे होने वाले है । इस १५ अगस्त २०२३ को हम अपना ७६ वा स्वतंत्र दिवस मनाने वाले है । स्वतंत्रता दिवस से पहले हमने अभी को छोडो अभियान की वर्षगांठ मनाई है, जो की ८ अगस्त को मनाई जाती है । भारत छोडो आंदोलन की वर्षगांठ के उपलक्ष में भारत के प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी ने 'मेरी माटी मेरा देश' अभियान को सुरु करने का निर्णय लिया है । भारत की आजादी में लाखो लोगो का योगदान शामील है । लेकीन हम उनमे से कुछ चुनिदा लोगो को ही जानते है । इस बात से प्रेरित होकर भारत के प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी ने 'मेरी माटी मेरा देश' अभियान सुरु किया है । इस अभियान के अंतर्गत भारत की आजादी के लिए शहीद होनेवाले प्रत्येक स्वतंत्रता सेनानी को श्रध्दांजली दी जायेंगी । यह अभियान पंचायत, ग्राम, शहर सब जगह पर कार्यक्रम आयोजित किये गये है ।

इस कार्यक्रम में प्रथम चरण यह होगा की भारत के एक एक गांव से मिट्टी लाई जायेंगी । इस मिट्टी को दिल्ली के कर्तव्य पथ पर बनी अमर वाटीका में उपयोग किया जायेगा । यह अमर वाटिका हमारे देश के नागरिकों का देश के प्रति समर्पझ का भाव व्यक्त करेगी । इसके अलावा हमारे देश के सभी स्वतंत्रता सेनानियों को श्रध्दांजली दी जायेगी । एक एक स्मारक पट्टी निर्माण कर उस पर भारत की आजादी में सर्वोत्तम बलिदान देनेवाले स्वतंत्रता सेनानी का नाम अंकीत किया जायेगा । इस अभियान की अंतर्गत वसुधा कार्यक्रम का आयोजन किया जायेगा । जिसमें ७५ स्वदेशी पौधे दिल्ली के कर्तव्य पथ पर लगाये जायेंगे । मेरी माटी मेरा देश यह अभियान ९ अगस्त से १५ अगस्त तक चलाया जायेंगा । इस कार्यक्रम के अंतर्गत 'वसुधा वंदन' का कार्यक्रम भी आयोजित किया जायेगा । इस कार्यक्रम के तहत प्रत्येक ग्राम पंचायत तथा गांव में स्वदेशी प्रजातियों के ७५ पौधे लगाये जायेंगे । इसकी जिम्मेदारी राज्यों में ग्रामीण विकास और पंचायती राज विभाग को सौपी जायेंगी । इसके माध्यम से अभियान का प्रभाव साकार होगा और स्थानीय स्वदेशी वृक्षों को प्रोत्साहन किया जायेगा ।

'मेरी माटी मेरा देश' के तहत स्कूलों मे विभीन्न कार्यक्रम आयोजित किये जायेंगे । इसमें विद्यार्थीओंको वृक्षारोपण, लेखन, चित्रकला और कई सांस्कृतिक कार्यक्रमोंमें भाग लेने का मौका मिलेगा । इससे उनमें देशभक्ती और मातृभूमी के प्रति प्रेम की भावना को जागृत किया जायेगा । यह एक अभियान का नारा है, जिसका उद्देश भारत के प्रत्येक नागरिक में अपने देश के प्रति देशभक्ती और अतुट प्रेम की भावना को स्थायी बनाया है ।

'मेरी माटी मेरा देश' कार्यक्रम हमारे देश के विकास और समृध्दी के लिये एक महत्वपूर्ण पहल है । यह कार्यक्रम भारतीय समाज को अपने मुल्य और सांस्कृतिक के प्रति संवेदनशील बनाने का एक प्रयास है और साथ ही देश की भूमी की संरक्षण एवं प्रदूषण मुक्त वातावरण को बनायें रखने का उद्देश रखता है । यह कार्यक्रम भारतीय नागरिकां को उनके राष्ट्रभक्ती और देश प्रेम के प्रति समर्पित बनाने का एक जरुरी कदम है ।

भारत - विविधता में एकता



कु. युक्ति ज्ञानेश्वर राठोड
वर्ग १२ (अ) वा विज्ञान

भारत एक लोकतांत्रिक और गणतांत्रिक देश है । जहाँ देश की जनता को देश की बहेतरी के लिये फैसले लेने का अधिकार है । भारत इस कथन के लिये एक प्रसिध्द देश है 'विविधता में एकता' क्योकि विविन्न जाती, धर्म, संस्कृती और परंपरा के लोग एकता के साथ रहते है ।

भारत सबसे बडे लोकतंत्र और विश्व की सबसे प्राची सभ्यता के लिये प्रसिध्द है । चीन के बाद यह दुनिया की अधिक जनसंख्या वाला देश है । ये महान योध्दाओ का देश है । जैसे महाराणा प्रताप, लाल बहादूर शास्त्री, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्रजी बोस, भगत सिंह, लाला लजपतराय आदि । देश के लिये सभी महान नेता गाँवो से आये और देश को आगे की और ले गये । इन लोगो ने कई वर्षो तक संघर्ष किया और अंग्रेजी शासन से देश को आजाद कराया ।

यह एक समृध्द देश है जहाँ साहित्य, कला और विज्ञान के क्षेत्र में महान लोगो ने जन्म लिया जैसे रविंद्रनाथ टैगोर, प्रेमचंद, सी.व्ही.रमण, जगदीशचंद्र बोस, एपीजे अब्दुल कमला, कबीरदासजी आदि । भारत के ऐसे महान लोगों ने देश को गौरांवित किया है ।

Biography of SARDAR VALLABBHAI PATEL

Pranoti Gajanan Wankhade
11th Commerce

Today is the history of that one man who is one in millions who bought us all together kutch to konima, Kargil to Kanyakumari. If we are traveling freely, it is because of Iron Man of India 'Sardar Vallabhbhai Patel' who thought of India as My Family My responsibility.

Born on Vallabhbhai Jhaverbhai Patel on 31st October 1875 in Nadiad, Gujarat to Father Jhaverbhai Patel and Mother Ladbai.

After studying Law in England returned India in 1913 & Practiced law in Ahmedabad and become one of the city's most successful barristers.

Intially Vallabhbhai Patel not much interested in the independence movement.

A meeting with Mahatma Gandhi in 1917 changed his views leaving his law practice Patel Committed himself to the Independence struggle.

Patel was the first deputy prime minister of india and the first home minister of Independent India. He was awarded 'Bharat Ratna' posthumously in 1991 from 2014. His birthday celebrated as "National Unity Day". His notable works include Kheda district faced Plague Scarcity of food and also crop failures by 1918.

The British Government refused to exempt the land revenue Patel led the agitation of the farmers and Zamindars to get tax exemption.

Patel joined Gandhi's Non cooperation movement (1920) & traveled around west India to recruit 300000 members in 1923. While Gandhi was in prison Patel led the Satyagraha movement in Nagpur. When the British banned Hoisting of Indian Flag he succeded in obtaining the consent to hoist the flag publicly and also got the prisoners released from 1924-28. Patel was chosen the president of the Municipal committee of Ahmadabad during these years he implemented several sanitations.

He also worked towards several social reforms including prohibition of untouchability casteism alcoholism etc.

In 1928, the Government raised the land revenue at a time when the farmers in Bardoli were already facing extreme scarcity of food when farmers refused to pay the taxes the Govt. arrested farmers and seized their lands many satyagrahas were under taken and after 6 months Patel carried on his negotiations with the government and as a result government returned the seized lands and the implementation of increased tax was postponed. The success of the Bardoli Satyagraha earned him the name fo Sardar he participated in Dandi March Salt Satyagraha. and quit India movement British gave two choices to the Indian Princely states. They could either join Indian or Pakistan or stay independent as the home Minister he tectful negatiated and succeeded in Intergrating over 560 states to the Indian Union because of his effort today India stands as integrated Nation world tallest statue of 182 meter called statue of Unity was build to pay tribute to this great man.

NATIONAL INTERGRATION

Pranoti Gajanan Wankhade
11th Commerce

National integration is the togetherness and oneness felt by the citizens (even though different in caste, creed, religion, culture, language and region, etc). Sardar Patel's effort for the national integration is completely uncompromising in order to make a one nation that is India.

Unity in diversity

India is a great example of unity in diversity and it is multi-cultural, multi-ethnic and multi-lingual country. The preamble of our Constitution states India is a Secular country. It gives its citizens the freedom to practice any religion of their own choice. People belonging to different culture and religions, shares common platform to understand each other's cultural and religious beliefs which in turn fosters the feeling of mutual trust and harmony.

National integration is a harmonious situation which binds the people of the country together; as a nation is built by its people and so, we must live in unity for the development of our country. Communalism is the greatest challenge and that needed to be reduced which will only happen when we change our mentality.

Emergence & Development of Nationalists

Ku. Shraddha R. Sontakke
11 A (Science)



Nationalism is a belief, creed or political ideology that involves an individual identifying with, or becoming attached to, one's nation. Nationalism involves national identity, by contrast with the related construct of patriotism, which involves the social conditioning and personal behaviors that support a state's decisions and actions. Davies, The rise and development of Nationalism There are two main perspectives on the basis that, from a political or social perspective, there is no such thing as origin and nationalism. From time immemorial, nationalism has been described as a reflection of the ancient and evolutionary tendency for humans to organize themselves into distinct groups based on birth and lineage. A modern perspective describes nationalism as a recent phenomenon that requires the structural conditions of modern society to exist for others.

Nationalism first emerged in Europe. Before the development of nationalism in Europe. People were generally loyal to their nation rather than to a religion or a particular leader. The concept of nationalism was first used by Johann Gottfried Huder. Marxism failed to provide any theory of nationalism. Marx and Engels, who called the workers of the world to unit were saying that the workers have no country. Even after almost half a century of industialization and agricultural economy nationalism is in the middle of the battle in most countries of the third world. All in all, Marxists believe that nationalism has contributed more to the development of Capitalism. Nationalism is a broad concept and the concept of nationalism changes of time. An ethnic group inhabiting a geographically unified area. A once existing population is a part of a nation.

Nationalism is an idea and movement that holds that the nation should be congruent with the state. As a movement, it presupposes the existence and tends to promote the interests of a particular nation, especially with the aim of gaining and maintaining its sovereignty (self-governance) over its perceived homeland to create a nation-state. It holds that each nation should govern itself, free from outside interference (self-determination), that a nation is a natural and ideal basis for a polity, and that the nation is the only rightful source of political power. It further aims to build and maintain a single national identity, based on a combination of shared social characteristics such as culture, ethnicity, geographic location, language, politics (or the government), religion, traditions and belief in a shared singular history, and to promote national unity or solidarity. Nationalism, therefore, seeks to preserve and foster a nation's traditional culture. There are various definitions of a "nation", which leads to different types of nationalism. The two main divergent forms identified by scholars are ethnic nationalism and civic nationalism.

Beginning in the late 18th century, particularly with the French Revolution and the spread of the principle of popular sovereignty or self determination, the idea that "the people" should rule is developed by political theorists. Three main theories have been used to explain the emergence of nationalism:

NEED AND IMPORTANCE HAR GHAR CAMPAIGN



Ku. Anjali Vinod Thakare
12th Arts

Har Ghar Tiranga Campaign 2023 is started from August 13th to 15th, 2023 for the celebration of Independence Day 2023.

The Har Ghar Tiranga campaign, an integral part of the Azadi ka Amrit Mahotsav, urges individuals to bring the Indian National Flag, affectionately known as the Tiranga, into their homes and hoist it with pride on the occasion of India's 77th year of independence. This initiative not only fosters a personal connection to the flag but also symbolizes our collective commitment to nation-building. The Har Ghar Tiranga Campaign 2023 aims to evoke patriotism among the masses and enhance awareness about the significance of the Indian National Flag.

The campaign resonates as a powerful reminder of our unity and love for our nation. The Har Ghar Tiranga campaign encourages all citizens of the country to hoist the tricolour flag at their homes. In India, there have been various initiatives and campaigns aimed at promoting patriotism and a sense of national pride among citizens. These initiatives often involve the display of the Indian national flag and encouraging people to connect with the country's identity and values.

The "Har Ghar Tiranga" campaign holds significant importance in fostering a stronger connection between the Indian National Flag (Tiranga) and the citizens of India. The campaign's core significance lies in its endeavour to bring the flag into the personal spaces of individuals and families, thereby bridging the gap between the formal and institutional relationship with the flag and fostering a more personal and emotional connection.

Hoisting the flag collectively as a nation during the 76th year of India's independence symbolizes unity, patriotism, and a shared commitment to nation-building. It reinforces the idea that every citizen has a role to play in the progress and development of the country.

SARDAR VALLABBHAI PATEL

(Political Leader)



Ku. Nandini Suresh Rathod
12th Arts

Education and Career :

In childhood, every one among his family and friends circle regards him as an unambitious child. But, he secretly has a dream of becoming a barrister. Furthermore, after completing his matric level education he furthered his dream and started studying the law.

Besides, he stayed away from his family so that he could dedicate himself completely to his studies to fulfill his dream. After some time he completed his studies and become a lawyer and started practicing law.

But, he was not satisfied and want to climb the ladder of success. So, he planed to study further and travels to England to study law further and become a barrister. Moreover, things go as plan and his papers arrived. But, Patel's elder brother also has a dream to study further in England and convinced him to let him go instead of him.

As both the brother have the same initials and his brother can use the same documents to travel and study in England. So, Patel let his brother travel to England in his place as he could not deny his request.

After that, he continued his practice and applied for the course again and finally get the chance to fulfill his dream at 36 years of age. Besides, it was a 36 months course but he completed it in just 30 months. After that, he returned to India as a barrister.

After his return, he settled in Ahmadabad and became the most successful barrister there. Besides, Patel wanted to earn good for his family as he wishes to provide top-class education to his children and he continually worked in this direction.

Iron Man of India :

The life journey of Sardar Patel is inspiring to all. Moreover, he worked against all odds to achieve his goals without much support and guidance from his family. Also, he helped his brother to achieve his goal and took great care of his family and always motivated and supported his children in all phases of life.



Most noteworthy, he played a crucial role in bringing the people of the country together to fight for the Independence of the nation. Furthermore, his aura was so strong that he was able to unite the people of the country against a common cause without much bloodshed.

That's why we refer to him as the iron man of India. In addition, he takes part in the various freedom struggle and also inspired others around him to join the same. Besides, he had good leadership qualities and led several movements successfully. And eventually, he was given the title of the Sardar (Chief or leader).

To conclude, we can say that the efforts of Sardar Patel to achieve his goal and the effort he put in that direction are truly inspiring. Also, he is an inspiration to not only the people of that era but also to the youth of today. Besides, in true sense, he is a self-made man.



राष्ट्रीय प्रेम



कु. हर्षदा सुदाम राठोड
वर्ग ११ (कला)

अभिनंदन तेरा वंदन है

गर्व है देश को तुम पर
तुम बन गए देश की शान हो ।

घुटने न टेके दुश्मन के आगे,
तुम देश की आन-बान हो ।

झुकने न दिया देश का मस्तिक,
तुम देश के अभिमान हो ।

दुश्मन के दिल को दहलाने वाले,
तुम सिंह समान हो ।

अपनी वीरता का परचम लहराने वाले,
तुम नई आशाओं का आसमान हो ।

अभिनंदन करता सारा जग तेरा वंदन,
बन गए तुम वीर महान हो....
बन गए तुम वीर महान हो....

कनिष्ठ महाविद्यालय

वार्षिक अहवाल २०२३-२४

बापूरावजी बुटले कला,नारायणराव भट वाणिज्य व बापूसाहेब पाटील विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळविण्याच्या दृष्टीने प्राचार्य डॉ.ए.आर.लाडोळे, पर्यवेक्षक प्रा.हेमंत देशपांडे व सहकारी प्राध्यापक वृंदांच्या मार्गदर्शनामध्ये विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

महाराष्ट्र शासनाचे 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान महाविद्यालयामध्ये राबविण्यात आले. त्यामध्ये महावाचन चळवळ, राष्ट्रीय एकात्मता, विविध सण आणि पेहराव, बँक व्यवहार, कर्ज व व्याज प्रणाली मार्गदर्शन, स्वयं रोजगार व्यवसाय, मोफत आरोग्य तपासणी शिबीर (हिमोग्लोबीन), व्यापार उद्योग मार्गदर्शन असे विविध उपक्रम राबविण्यात आले. मतदान जागृती उपक्रमांतर्गत रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा महाविद्यालयामध्ये घेण्यात आल्या. तसेच पालक सभेचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याबरोबरच शैक्षणिक प्रगती होण्याच्यादृष्टीने विद्यार्थ्यांकडून प्रत्येक विषयाची (वर्ग ११ वी व १२ वी) कसुन तयारी करुन घेतली जाते. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम आहे. सत्र २०२३-२४ चा शाखानिहाय निकाल खालीलप्रमाणे –

H.S.C. बोर्ड परिक्षा * शाखा निहाय टक्केवारी

वाणिज्य - **98%**

विज्ञान - **92%**

कला - **86%**



बँक व्यवहार, कर्ज व व्याज प्रणाली या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. विजय रोटे, मंचावर उपस्थित पर्यवेक्षक प्रा.हेमंत देशपांडे, प्रा.कु.चव्हाण, प्रा.बढे



स्वयंरोजगार, व्यापार व उद्योग या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ.डी.डी.निलावार मंचावर उपस्थित पर्यवेक्षक प्रा.हेमंत देशपांडे, प्रा.कु.चव्हाण, प्रा.बढे, प्रा. खंडारे व विद्यार्थी



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत महावाचन चळवळीमध्ये वाचन महाविद्यालयीन विद्यार्थी व प्रा. जी.पी.खंडारे

महाविद्यालयातील विविध विभागातील उपक्रमांचे क्षणचित्रे २०२३-२४



मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी साहित्योपासक मंडळाचे उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ.स्मिता देशमुख, प्राचार्य कॅप्टन व्ही.एल. खळतकर, प्रा.डॉ.रुपेश कन्हाडे, प्रा.डॉ.सौ.अपर्णा पाटील व उपस्थित मान्यवर



मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी भाषा गौरव दिन निमीत्त प्रतिमा पुजन करतांना कार्यक्रम अध्यक्ष कॅप्टन व्ही.एल.खळतकर मंचावर उपस्थित डॉ.वानखडे, डॉ.सौ.पाटील, डॉ. जाधव, डॉ. कन्हाडे, प्रा.जयगावकर, प्रा. गायकवाड



गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या विविध कोर्स अंतर्गत हस्तभरतकलेचे प्रशिक्षण देतांना डॉ.सौ. गावंडे मॅडम व लाभार्थी विद्यार्थी



गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या एकदिवसीय कार्यशाळेतंर्गत बंगाली मिठाई बनविण्याचे प्रशिक्षण देतांना प्रा.कु.मौसमी इंगळे व प्रा.मिनाक्षी इंगळे व लाभार्थी विद्यार्थी



प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित तपासणी शिबीरांतर्गत रक्तगट, रक्तदाब आणि हृदयाचे ठोके तपासतांना डॉ.कु.लाभसेटवार मॅडम व डॉ. नरेंद्र मनवर तसेच लाभार्थी विद्यार्थी



प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित क्षेत्र अभ्यास भेटी अंतर्गत विठाळा येथील सेरीकल्चर प्रोजेक्टबद्दल माहिती जाणून घेतांना महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी



रसायनशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन. उपस्थित प्राचार्य डॉ.लाडोळे, कॅप्टन खळतकर, डॉ. वानखडे, डॉ. जाधव, डॉ. मोटे व महाविद्यालयीन विद्यार्थी



रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजित जनरल ॲप्टीट्यूड टेस्ट (GAT) देतांना बि.एससी. भाग ३ चे विद्यार्थी



जीवशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित World Ozone Day निमीत्त उद्बोधन करतांना प्रा.पी.व्ही.गडकर व मंचावर उपस्थित डॉ. वानखडे, डॉ. ढोरे व डॉ. देवस्थळे



जीवशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित Hands of training Program अंतर्गत Herbarium Technique चे निरीक्षण करतांना विद्यार्थी व उपस्थित विभाग प्रमुख प्रा.डॉ. एम.एम. ढोरे



भौतिकशास्त्र विषयाअंतर्गत व सायन्स क्लब द्वारा आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त सी.व्ही.रमण यांची जयंती उत्साहात साजरी करतांना प्राचार्य डॉ. लाडोळे, डॉ. व्ही.के.जाधव व इतर प्राध्यापक वृंद तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी



भौतिकशास्त्र विषयाअंतर्गत गट चर्चा करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी व परिक्षण करतांना विभागप्रमुख डॉ.व्हि.के.जाधव,डॉ.पी.एम.चांडक व डॉ.जी.एस.जयगांवकर



राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित भारतीय संविधान दिनानिमीत्त मार्गदर्शन करतांना विभागप्रमुख डॉ. अजय जाधव व मंचावर उपस्थित प्राचार्य डॉ.लाडोळे, कॅप्टन खळतकर, डॉ.व्ही.के.जाधव व डॉ. रुपेश कन्हाडे



राष्ट्रीय छात्र सेना व राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने आयोजित मतदार नोंदणी व मतदान जागृती प्रभात फेरीसाठी उपस्थित एन.सी.सी.कॅडेटस् व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विभाग प्रमुख डॉ.अजय जाधव



एन.सी.सी. विभागाच्या वतीने राबविण्यांत आलेल्या विविध उपक्रमांतर्गत एक कॅडेट एक झाड योजना यशस्वी अंमल बजावणी करतांना एन.सी.सी.कॅडेटस् व एन.सी.सी. प्रमुख लेफ्टनंट डॉ. अजय जाधव

महाविद्यालयातील विविध विभागातील उपक्रमांचे क्षणचित्रे २०२३-२४



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्धापन दिनानिमीत्त राष्ट्रध्वजाला मानवंदना देतांना अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग, सचिव श्री श्यामभाऊ पाटील, कोषाध्यक्ष श्री रघुराजसिंह चौहान, सदस्या श्रीमती मीनाताई पाटील, प्राचार्य डॉ.अरविंद लाडोळे, डॉ.आर.एम.कदम, लेफ्टनंट डॉ.ए.डी.जाधव



भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या निमीत्ताने राष्ट्रध्वजाला मानवंदना देतांना अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग, उपाध्यक्ष श्री प्रदिपभाऊ मेहता, सचिव श्री श्यामभाऊ पाटील, कोषाध्यक्ष श्री रघुराजसिंह चौहान, डॉ. अशोक नालमवार, श्री कैलाश बाजोरिया प्राचार्य डॉ.अरविंद लाडोळे, डॉ.आर.एन.कऱ्हाडे, लेफ्टनंट डॉ.ए.डी.जाधव



शासनाच्या करिअर कट्टा या उपक्रमातंर्गत महाविद्यालयाने उत्कृष्ट कामगिरी करत तीन पारितोषीक पटकविले. त्याबद्दल आनंद साजरा करतांना सन्मानीय डी.व्ही.एस.पी. मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक वृंद



GLOBAL PERSPECTIVES IN HIGHER EDUCATION : या मुख्य विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये स्मरणीकेचे प्रकाशन करतांना उपस्थित अतिथी गण व व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष आयोजन समितीचे पदाधिकारी व उपस्थित मान्यवर



GLOBAL PERSPECTIVES IN HIGHER EDUCATION : या मुख्य विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संबोधीत करतांना डी.व्ही.एस.पी. मंडळाचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग व मंचावर उपस्थित मान्यवर तसेच अतिथीगण



GLOBAL PERSPECTIVES IN HIGHER EDUCATION : या मुख्य विषयावर आयोजित केलेल्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये उद्घाटन सत्राला उपस्थित असलेले डॉ.आर.एस.प्रधान नेपाळ, डॉ.प्रदिप मेहता, श्री रघुराजसिंह चौहान व प्राचार्य डॉ. व्ही.बी.राऊत, प्राचार्य डॉ.ए.आर. लाडोळे



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** चे उद्घाटन करतांना प्रा.संजय खडसे, संस्थेचे अध्यक्ष श्री विजयकुमारजी बंग, कोषाध्यक्ष श्री रघुराजसिंह चौहान, श्री सुधीर देशमुख, डॉ.एम.एम. ढोरे, डॉ.सौ.अपर्णा पाटील



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** अंतर्गत 'मी जीजाऊ बोलतेय' हे एकपात्री नाटक सादर करतांना महाविद्यालयीन विद्यार्थीनी व उपस्थित रसिक विद्यार्थी



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** अंतर्गत देशभक्तीपर गीतावर समुह नृत्य करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** मध्ये 'टाकाऊ पासुन टिकाऊ' वस्तुचे बनविण्याचे स्पर्धेचे पाहणी करतांना अतिथी प्रा.संजय खडसे व कोषाध्यक्ष श्री रघुराजसिंह चौहान, श्री सुधीर देशमुख, डॉ. एस.एम. देवस्थळे व डॉ. नरेंद्र मनवर



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** अंतर्गत 'रांगोळी स्पर्धेचे ' परिक्षण करतांना सौ. मंजु बनगिनवार, सौ. पदमावार डॉ.सौ.अपर्णा पाटील, डॉ.कु.लाभसेटवार, डॉ.कु.सोनपरोते, डॉ.कु.जगताप



महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव **BNB Talent 2023-24** अंतर्गत खेळ व क्रिडा स्पर्धेमध्ये लांब उडी मध्ये सहभागी स्पर्धक व निरीक्षण करतांना परिक्षण व उपस्थित महाविद्यालयीन विद्यार्थी



सण-उत्सव पेहराव कार्यक्रम अंतर्गत सहभागी विद्यार्थीनी व उपस्थित पर्यवेक्षक प्रा. हेमंत देशपांडे, प्रा.कु.ए.व्ही.चव्हाण, प्रा.जी.पी.खंडारे, प्रा.बी.जे. बढे, प्रा.डी.एन.राहुतिया व प्रा.कु.तिजारे मॅडम



मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानातंर्गत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन व उपस्थित डॉ. मनिष राठोड, प्रा.डॉ.देवस्थळे, पर्यवेक्षक प्रा. हेमंत देशपांडे, प्रा.सी.टी.जोगीया, प्रा. खंडारे, श्री अल्हाटे व उपस्थित लाभार्थी विद्यार्थी



सावित्रीबाई फुले जयंती निमीत्त सावित्रीचा वेश परिधान करुन प्रतिमा भेट देतांना विद्यार्थीनी व उपस्थित प्रा.कु.ए.व्ही.चव्हाण, प्रा.जी.पी.खंडारे, प्रा.बी.जे. बढे, प्रा.सी.एन.खिराडे व इतर